सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | सोमवार, २० एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक ४३ | पाने १२ | किंमत रु. ८/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



योगी अरविंद आणि लोकमान्य टिळकांच्या कळकळीने केलेल्या प्रतिपादनानुसार स्वामी विवेकानंदांचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करण्याचा तसेच राष्ट्रजीवनाच्या विशाल क्षितिजावर ते प्रवाहित करण्याचे महत्कार्य रामकृष्ण मठ आणि हिंदूंच्या पुनरुत्थानास्तव कटिबद्ध झालेल्या रा. स्व. संघामार्फत चालते आहे.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

# ३४ मुलींची विक्री आणि धर्मांतर?

## ● यवतमाळ जिल्हा हादरला; बहुतांश मुली अल्पवयीन ● जोडप्याला ताब्यात घेऊन चौकशी सुरू

◆ **राळेगाव, १९ एप्रिल**

नाशिकमध्ये उघडकीस आलेले 'कार्पोरेट जिहाद' आणि अमरावती जिल्ह्यातील परतवाड्यातील 'लव्ह जिहाद'नंतर यवतमाळ जिल्ह्यात मुलींची विक्री आणि धर्मांतर केल्याचे खळबळ माजविणारे प्रकरण उघडकीस आले आहे. राळेगाव परिसरातील ३४ मुलींची विक्री करून त्यांचे धर्मांतर करण्यात आल्याची तक्रार १९ एप्रिल रोजी भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहान यांनी राळेगाव पोलिस ठाण्यात दिली. या तक्रारीमुळे यवतमाळ जिल्हा हादरून गेला आहे.

राळेगावात मानवी तस्करी होत असल्याचे समोर आले असून पोलिसांनी आरोपी मजहर कुरेशी याला एका महिलेसह ताब्यात घेतले आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्यासह पोलिस, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने पोलिस ठाणे परिसरात दुपारपासून उपस्थित होती. या घटनेनंतर आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके व भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. चौहान राळेगावात तळ ठोकून आहेत. केळापूर, मोहदा, वडकी, कळंब परिसरातून जवळपास ३४ हिंदू मुली बेपत्ता झाल्या. यापैकी बऱ्याच मुली अल्पवयीन आहेत.



राळेगाव येथील पोलिस ठाण्यासमोर जमलेली नागरिकांची गर्दी

या प्रकरणात मानवी तस्करी करणारी टोळी कार्यरत असल्याचे सांगितले जात आहे. त्यांनी या मुली देहविक्री किंवा अन्य अनैतिक कामासाठी विकल्या असाव्यात, तसेच या मुलींचे धर्मांतरसुद्धा करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. मंत्री डॉ. उईके आणि ॲड. चौहान यांनी अपर पोलिस अधीक्षक थोरात यांची भेट घेऊन संबंधित घटनांची कल्पना दिली होती. तसेच या प्रकरणात तत्काळ कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीसुद्धा त्यांनी केली होती.

राळेगाव पोलिसांनी चक्रे फिरवून मजहर कुरेशी याला त्याच्या पत्नीसह ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. मात्र, पोलिसांकडे सादर केलेली ऑडिओ क्लिप एक वर्ष जुनी असून या घटनेशी तिचा काहीही संबंध नसल्याचे पोलिसांकडून सांगितले जात आहे. याबाबत पोलिसांना अन्य कोणतेही धागेदोरे सापडले नसून चौकशी सुरू आहे. अजूनपर्यंत कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नसला तरी या चर्चेमुळे राळेगाव परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### ऑडिओ क्लिपमुळे प्रकरण उघड

**एका तरुणीच्या तरुणासोबत झालेल्या संवादाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. यावरून हे खूप मोठे जाळे असून यात मोठ्या प्रमाणात पैसा मिळत असल्याचे सुद्धा सांगितले जात आहे. पोलिसांनी या क्लिपचा धागा पकडून तपास केला तर मोठे रॅकेट उघडकीस येईल, असे भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. चौहान यांनी म्हटले आहे.** ■

### आरोपीच्या घरावर बुलडोझर



मजहरच्या घरावर बुलडोझर चालविताना

**या प्रकरणात मजहर कुरेशी आणि एका महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. कुरेशी याच्या अतिक्रमित घरावर बुलडोझर चालविण्यात आला असून या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र आले होते.** ■

### आरोपी गुन्हेगारी प्रवृत्तीचा

**पोलिसांच्या ताब्यात असलेला मजहर कुरेशी या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमाने तीन महिन्यांपूर्वी एका व्हॉट्स ॲप ग्रुपवर हिंदू देवी-देवतांचा अपमान करणारी पोस्ट टाकली होती. बजरंग दल कार्यकर्त्यांच्या तक्रारीवरून त्याच्यावर गुन्हा दाखल केला होता. परंतु, राळेगावातील जातीय सलोखा कायम राहावा म्हणून भाजपाच्या मंडळींनीच आपसी समझोता घडवून तक्रार मागे घ्यायला लावली होती.** ■

## ज्ञानेशकुमारांच्या विरोधात नवीन नोटीस

◆ **नवी दिल्ली, १९ एप्रिल**

यापूर्वीच्या नोटीस फेटाळल्या गेल्याचा कोणताही परिणाम न होऊ देता विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांना पदावरून हटवण्यासाठी नव्या जोमाने तयारी सुरू केली आहे. यासाठी ते ज्ञानेशकुमारांच्या विरोधात नवीन नोटीस आणण्याची तयारी करीत आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

विरोधी पक्षांचे नेते सध्या चर्चा करीत असून, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी आणि द्रमुक याच्यासारख्या वेगवेगळ्या पक्षांमधील किमान पाच ज्येष्ठ खासदार, पदावरून दूर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी एक नवीन नोटीस तयार करण्यावर काम करीत आहेत.

मात्र, ही नोटीस संसदेच्या कोणत्या सभागृहात मांडली जाईल किंवा मागील वेळी केल्याप्रमाणे ती दोन्ही सभागृहांत सादर केली जाईल, हे अद्याप निश्चित झालेले नाही, असे त्या सूत्राने सांगितले. शुक्रवारी हे विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्यामुळे उत्साहित झालेले विरोधी पक्षाचे नेते या संदर्भातील नोटीसवर अधिक खासदारांच्या स्वाक्षऱ्या मिळवण्याचे प्रयत्न करीत असून, किमान २०० स्वाक्षऱ्या जमा करण्याचे उद्दिष्ट असल्याचे एका सूत्राने सांगितले.

आम्हाला एक ठाम संदेश द्यायचा आहे. मागील वर्षी आमच्या खासदारांची संख्या कमी लेखली गेली होती. हे आम्हाला सर्वप्रथम सिद्ध करायचे आहे, असे त्या सूत्राने सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### राहुल, सोनियांविरोधातील याचिकेवर आज सुनावणी

**नवी दिल्ली :** 'नॅशनल हेरॉल्ड'शी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास कनिष्ठ न्यायालयाने नकार दिला होता. या आदेशाला आव्हान देणाऱ्या ईडीच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. हा खटला न्या. स्वर्ण कांता शर्मा यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यात आला आहे. २२ डिसेंबर रोजी उच्च न्यायालयाने गांधी कुटुंब आणि इतरांना मुख्य याचिकेवर तसेच १६ डिसेंबर रोजीच्या कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या ईडीच्या अर्जावर नोटीस बजावली होती. या खटल्यात ईडीच्या तक्रारीची दखल घेणे कायद्याने अमान्य आहे. कारण, सदर तक्रार ही कोणत्याही एफआयआरवर आधारित नव्हती. गांधी कुटुंबाव्यतिरिक्त उच्च न्यायालयाने सुमन दुबे, सॅम पित्रोदा, यंग इंडियन, डोटेक्स मर्चंडाईज प्रा. लि. आणि सुनील भंडारीला नोटीस बजावली आहे. ■

# नागरिकांच्या 'तोंडचे पाणी' पळविणार नवे दर?



◆ **पुणे, १९ एप्रिल**

**राज्यातील घरगुती, औद्योगिक आणि कृषी सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दर लवकरच वाढणार आहेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने (एमडब्ल्यूआरआरए) याबाबतचा सुधारित मसुदा तयार करून राज्य सरकारकडे पाठवला आहे. नवीन दर लागू करण्यापूर्वी या मसुद्याचे प्रारूप जाहीर करून त्यावर नागरिकांच्या हरकती आणि सूचना मागवल्या जाणार आहेत. त्यानंतर होणाऱ्या सुनावणी प्रक्रियेनंतर नवीन दरपत्रक अधिकृतपणे लागू होईल.**




राज्यात दर तीन वर्षांनी जलदरांचा आढावा घेऊन त्यात वाढ केली जाते. यापूर्वी जुलै २०२२ मध्ये नवीन दर लागू करण्यात आले होते, ज्याची मुदत ३१ मार्च रोजी संपली आहे. मात्र, निवडणुकांची आचारसंहिता आणि इतर तांत्रिक कारणांमुळे प्राधिकरणाने सध्याच्या दरांना जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. आता २०२५ ते २०२८ या नवीन तीन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन जलदर निश्चित केले जाणार आहेत. वाढती पाणी चोरी, गळती, बाष्पीभवन आणि औद्योगिकीकरणामुळे सिंचन व्यवस्थेवर येणारा ताण लक्षात घेता, पाणी बचतीसाठी हे दर १० ते २० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

प्राधिकरणाकडून होणाऱ्या या दरवाढीचा थेट फटका स्थानिक स्वराज्य संस्था, कारखाने आणि शेतकऱ्यांना बसणार आहे. महापालिकांना जलसंपदा विभागाकडे जास्त दराने पैसे भरावे लागल्यास, त्याचे ओझे अप्रत्यक्षपणे पाणीपट्टीच्या रूपाने सामान्य नागरिकांच्या खिशावर पडणार असल्याचे जलतज्ज्ञांचे म्हणणे आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### दरवाढीचे निकष काय?

**जलदरांमध्ये वाढ करताना प्रशासन प्रामुख्याने महागाई निर्देशांकातील वाढ, सिंचन व्यवस्थापनाचा वाढलेला खर्च, जलप्रकल्पांची देखभाल-दुरुस्ती आणि जलसंपदा विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणारा खर्च या बाबींचा विचार करते. या सर्व खर्चांचा ताळमेळ बसवण्यासाठी दरवाढ अनिवार्य असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येत आहे.** ■

### राज्यात लागू असलेले सध्याचे पाण्याचे दर

| पाणीप्रकार | विद्यमान दर (प्रतिहजार लिटरमध्ये) |
|---|---|
| **घरगुती** (थेट धरणातून) - | ०.५५ पैसे |
| (कालव्यातून) - | १.१० रुपये |
| **औद्योगिक प्रक्रिया उद्योग** (थेट धरणातून) - | ११ रुपये |
| (कालव्यातून) - | २२ रुपये |
| **कच्चा माल** (थेट धरणातून) - | १६५ रुपये |
| (कालव्यातून) - | ३३० रुपये |



# मुनीर विश्वासघातकी

## अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांचा अहवाल

◆ **वॉशिंग्टन, १९ एप्रिल**

अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थीची भूमिका बजावणारे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्याबद्दल अमेरिकन गुप्तचर संस्थांनी गंभीर इशारा दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनासाठी मुनीर हे विश्वासघातकी असून ते अमेरिकेच्या हितसंबंधांना बाधा पोहोचवू शकतात, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. मुनीर यांचे इराणच्या उच्च लष्करी अधिकाऱ्यांशी असलेले जुने आणि घनिष्ठ संबंध ही अमेरिकेसाठी धोक्याची घंटा असल्याचे म्हटले आहे.



जनरल मुनीर यांचे इराणच्या कुड्स फोर्सचे दिवंगत कमांडर कासिम सुलेमानींशी जवळचे संबंध होते तर इराणच्या आयआरजीसी प्रमुख हुसेन सलामी यांच्याशी वैयक्तिक आणि व्यावसायिक संबंध आहेत.

एकीकडे ट्रम्प मुनीर यांना आपले 'फेव्हरेट फील्ड मार्शल' म्हणत असताना, दुसरीकडे गुप्तचर विभागाने मात्र मुनीर यांच्या दुटप्पी भूमिकेमुळे अमेरिकेच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली आहे. ◀(वृत्तसंस्था)





## जनसागर अन् ज्ञानसागर

**सोलापूर :** महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सोलापुरातून रविवारी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत असा जनसागर उसळला होता. दुसऱ्या छायाचित्रातील 'शिक्षण'रुपी ज्ञानसागरातील मुली-युवतींचे पोस्टर सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. **(छायाचित्र : केवल तिवारी)**

**सविस्तर वृत्त पान ९ वर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### रेशनकार्डधारकांसाठी सरकारची मोठी घोषणा

**मुंबई :** देशातील रेशनकार्डधारकांसाठी सरकारकडून मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयानुसार लाभार्थ्यांना आता एकाच वेळी तीन महिन्यांचे धान्य वितरित केले जाणार असून, एप्रिल, मे आणि जून या महिन्यांचे रेशन एकत्रित स्वरूपात देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अन्न व सार्वजनिक वितरण विभागाच्या माहितीनुसार, या निर्णयाचा उद्देश लाभार्थ्यांना वारंवार रेशन दुकानात जावे लागू नये तसेच उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेत आणि संभाव्य अडचणींमध्ये धान्य वितरण सुरळीत राहावे हा आहे. विशेषतः अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना याचा थेट फायदा होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, रेशन दुकानांवरील गर्दी कमी होण्यासही मदत होणार आहे. काही अहवालांनुसार, भारतीय अन्न महामंडळाच्या साठा व्यवस्थापन आणि लॉजिस्टिक सोयीसाठीही हा निर्णय उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अनेक राज्यांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाल्याचे दिसून येत असून, संबंधित लाभार्थ्यांना ठराविक कालावधीत धान्य उचलणे आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# फटाका कारखान्यातील स्फोटात २१ कामगारांचा होरपळून मृत्यू

## तामिळनाडूच्या विरुधुनगरमधील घटना, ६ गंभीर जखमी

**चेन्नई, १९ एप्रिल**

तामिळनाडूच्या विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनापट्टी परिसरात वनजा फटाका कारखान्यात रविवारी मोठा स्फोट झाला. यानंतर लागलेल्या आगीत होरपळून २१ कामगारांचा मृत्यू झाला, तर ६ गंभीर जखमी आहे. अनेक कामगार इमारतीच्या ढिगाऱ्याखाली दबले असून, मृतकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

घटनेच्यावेळी कारखान्यात ३० कामगार काम करत होते. अचानक एक स्फोट झाला आणि त्यानंतर आग भडकली. स्फोटामुळे कारखान्याची इमारत उद्ध्वस्त झाली. अग्निशमन विभाग आणि राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या कर्मचाऱ्यांनी २१ मृतदेह बाहेर काढले, तर सहा जणांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात हलविल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीनाथ यांनी दिली.



स्फोट इतका शक्तिशाली होता की कारखान्यालगतच्या इमारतींचे मोठे नुकसान झाले.

प्रशासनाने परिसर सील केला असून तपास सुरू केला आहे आणि स्फोटाच्या कारणाचा शोध घेतला जात आहे. स्फोट कारखान्याच्या एका युनिटमध्ये झाला आणि त्यानंतर लागलेली आग संपूर्ण परिसरात पसरली. काही कामगारांनी आपले जीव वाचले, पण काहींना पळण्याचीही संधी मिळाली नाही. अग्निशामक दलाच्या जवानांनी तासाभराच्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आणली.

त्यानंतर ढिगाऱ्याखालून मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू करण्यात आले. फटाके बनवत असतानाच काही चूक झाल्यामुळे ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. (वृत्तसंस्था)

> **विरुधुनगर जिल्ह्यातील कनारपट्टी येथील घटना अतिशय दुःखद आहे. मंत्री के.के.एस.आर. रामचंद्रन आणि थंगम थेन्नारासू यांना तातडीने घटनास्थळी जाऊन मदत कार्याला वेग देण्याच्या सूचना दिल्या. सर्व आवश्यक मदत सुनिश्चित करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.**
> **- एम. के. स्टॅलिन, मुख्यमंत्री, तामिळनाडू**

# आध्यात्मिक आणि वैज्ञानिक ज्ञान एकाच समग्रतेचा भाग

## रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

**कॅलिफोर्निया, १९ एप्रिल**

आपल्या भारतीय परंपरेत आध्यात्मिक आणि वैज्ञानिक ज्ञानामध्ये कोणताही फरक नाही. हे दोन्ही एकाच समग्रतेचे भाग मानले जातात, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले. ते स्टॅनफोर्ड विद्यापीठात 'थ्राईव्ह-२०२५' परिषदेत 'सायन्स, नॉलेज, सिस्टिम्स ॲण्ड सिव्हिलायझेशनल लीडरशिप' या विषयावर संबोधित करीत होते.

आम्हाला एकत्र आणल्याबद्दल आणि संवादासाठी ही जागा निर्माण केल्याबद्दल 'ग्लोबल सायन्स ॲण्ड इनोव्हेशन फोरम'चे आभार मानतो. भारतीय संस्कृतीतील ज्ञान इतरांशी सामायिक करावे आणि उर्वरित जगाकडून काही शिकावे, हा येथे उपस्थित राहण्याचा उद्देश आहे. आपल्या भारतीय परंपरेत आध्यात्मिक आणि वैज्ञानिक ज्ञानात कोणताही भेद मानला जात नाही. या दोन्ही गोष्टींना एकाच समग्रतेचा भाग म्हणून पाहिले जाते. उपनिषदांसारखे ग्रंथ केवळ भक्तिविषयक मजकूरच नव्हे, तर मानवी शरीररचना, मन, कृती व अकृती, संवेदना आणि त्यापलीकडील बाबींचेही विवेचन करतात. अनेक शतकांपासून वैज्ञानिक विचार हे आध्यात्मिक ग्रंथांच्या स्वरूपात जतन करून ठेवले होते. परिणामी, पुढील पिढ्यांच्या हातून अनेकदा या ज्ञानाची वैज्ञानिक बाजू निसटून गेली. परकीय आक्रमणे आणि दीर्घकालीन परकीय राजवटींमुळे आपल्या संस्था व परंपरांचे गंभीर नुकसान झाले. यातील बहुतांश ज्ञान दडपले गेले किंवा विस्मृतीत गेले, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

भारतातील नवीन शैक्षणिक धोरण आज भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक आणि पद्धतशीर मार्गाने पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करीत आहे. जवळपास एक हजार वर्षांपर्यंत येथील लोकांना त्यांच्या स्वतःचा वैज्ञानिक वारसा आणि बौद्धिक परंपरा विसरण्यास भाग पाडले गेले. या सांस्कृतिक वारशात वैश्विक शोधाची एक सखोल वृत्ती अंतर्भूत आहे. यात अंतराळ, विश्व आणि सूक्ष्म व स्थूल विश्वातील परस्परसंबंधांविषयीच्या प्रश्नांचा समावेश होतो. ऐतिहासिकदृष्ट्या येथे सुनियोजित शहरे, विद्यापीठे आणि प्रगत स्थापत्य अभियांत्रिकी अस्तित्वात होती. या सर्व गोष्टी उच्च दर्जाच्या भौतिक आणि वैज्ञानिक आकलनावर आधारित होत्या. नैसर्गिक जगाचे आकलन करून घेणे, त्याचा सुज्ञपणे वापर करणे आणि



त्याचवेळी त्याचे रक्षण करणे, त्याचे शोषण न करणे हीच पारंपरिक वैज्ञानिक दृष्टिकोनाची भूमिका आहे, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले.

समाजाला आकार देण्यासाठी आणि विज्ञान व ज्ञानाचा लाभ संपूर्ण मानवजातीला होईल याची खात्री करण्यासाठी शिक्षण हीच मध्यवर्ती बाब आहे. या दृष्टिकोनानुसार, वैज्ञानिक संशोधन आणि आध्यात्मिकता या दोन परस्परविरोधी शक्ती नव्हे, तर त्या एकमेकांसाठी पूरक ठरतात आणि परस्परांना समृद्ध करतात. ऐतिहासिकदृष्ट्या अनेकदा तेच विद्वान आणि अभ्यासक वैज्ञानिक संशोधन व आध्यात्मिक साधना या दोन्ही गोष्टींमध्ये मग्न असत, याद्वारे ते धर्म, संस्कृती आणि प्रज्ञा यांचा सुरेख मेळ घालत असत, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले.

कायदेशीर संरचना आणि वैज्ञानिक प्रणाली या दोन्हींचा उद्देश लोकांचे जीवन उपजीविका आणि दैनंदिन कल्याण सुनिश्चित करणे हा आहे. जेव्हा तंत्रज्ञान वेगाने पुढे दौडत असते, मात्र समाजाचा काही भाग शिक्षणाच्या बाबतीत मार्ग पडलेला असतो, तेव्हा त्याचा परिणाम म्हणून विषमता वाढत जाते. आर्थिक विकास, शिक्षणाची उपलब्धता आणि जीवनाचा दर्जा या गोष्टी एकमेकांशी सखोलपणे जोडलेल्या आहेत. यापैकी एका क्षेत्रात होणाऱ्या प्रगतीचा परिणाम इतर क्षेत्रांवरही होत असतो. एकीकडे असमानता, पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा या समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे, तर दुसरीकडे वैज्ञानिक प्रगतीचा पाठपुरवठा करणे गरजेचे आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

शिक्षण व्यवस्थेने परंपरेच्या चौकटीत राहून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला नाही, तर भूतकाळातील वैज्ञानिक उपलब्धींना केवळ अंधश्रद्धा म्हणून नाकारले जाण्याचा धोका निर्माण होतो. येथे एक खरी कसोटी आहे, ती म्हणजे अंधश्रद्धेपासून खऱ्या विज्ञानाला वेगळे करणे. यासाठी गंभीर सामाजिक आणि बौद्धिक प्रयत्नांची आवश्यकता असते. याच कारणामुळे, भारतीय ज्ञानपरंपरेला आता अग्रस्थानी आणले जात आहे. यामुळे या वारशाचे चिकित्सक पुनरुज्जीवन करून त्याला मुख्य प्रवाहात सामावून घेता येईल, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले.

### ज्ञानाचे लोकशाहीकरण होणे आवश्यक

सर्वव्यापी एकात्मतेची ही भावना आदर, नम्रता आणि संपूर्ण विश्वाकडे एक परस्परसंलग्न अखंड घटक म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण करते. ज्ञानाचे लोकशाहीकरण होणे आवश्यक आहे. ज्ञानाची निर्मिती होत आहे खरी, परंतु ते अद्याप सर्वांपर्यंत पोहोचत नाही. खऱ्या लोकशाहीकरणाचा अर्थ असा की, सर्व समुदाय, राष्ट्रे आणि संस्कृतीमधील ज्ञान सर्वांसाठी सुलभ असावे. यामुळे लोकांना अधिक समान पातळीवर आणले जाईल. (वृत्तसंस्था)

### सर्व सजीव एकाच मूळ ऊर्जास्रोतापासून

सर्व सजीव एकाच मूळ ऊर्जास्रोतापासून निर्माण झाले आहेत, या जाणिवेतूनच नम्रतेचा विकास होतो. निसर्गाला मानवी गरजा आणि लोभ पूर्ण करण्यासाठी अस्तित्वात असलेला एक गुलाम मानले जाते, तेव्हा साहजिकच त्याचे शोषण होऊ लागते. हिंदू परंपरा प्रत्येक जीवाचा आदर करायला शिकवते. ती स्वतःमध्ये, इतरांमध्ये आणि सर्व प्रकारच्या वनस्पती व प्राण्यांमध्ये तीच एक ऊर्जा किंवा ईश्वरी अंश पाहण्याचा दृष्टिकोन देते, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले.



सहा पदरी पुणे-बंगलुरू राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ चे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सांगली जिल्ह्यातील कराड शहरातून जाणाऱ्या या महामार्गाचे दृश्य

# खरातला पाच दिवसांची कोठडी

**नाशिक, १९ एप्रिल**

फसवणूक आणि लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप असलेला भोंदू अशोक खरात याच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. न्यायालयाने खरातला पाचव्या गुन्ह्यात पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून, आता २३ एप्रिलपर्यंत तो एसआयटीच्या ताब्यात असणार आहे.

पाचव्या गुन्ह्यामध्ये खरातवर लैंगिक शोषण आणि भोंदूगिरीचे आरोप आहेत. आभासी पद्धतीने रविवारी त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुनावणी दरम्यान सरकारी वकिलांनी युक्तिवादात सांगितले की, पीडित महिलेला गुंगीकारक औषधी आणि इतर पदार्थ नेमके कोठून आणून देण्यात आले, याचा शोध घेणे आवश्यक आहे. अत्याचाराच्या या घटनांमध्ये खरातला घरातील इतर कोणाचे सहकार्य लाभले होते का? याचा तपास करण्यासाठी खरातची कोठडी आवश्यक आहे. खरातचे वकील सचिन भाटे यांनी पोलिस कोठडीला विरोध दर्शवला. यापूर्वी दाखल झालेल्या चारही गुन्ह्यांतील पद्धत सारखीच आहे, त्यामुळे पुन्हा कोठडीची गरज नसल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, सरकारी वकिलांनी हा युक्तिवाद खोडून काढत प्रत्येक गुन्ह्यातील पीडिता वेगळी असून प्रत्येक प्रकरणाचा तपास स्वतंत्रपणे होणे गरजेचे असल्याचे सांगितले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरला आणि खरातला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. (वृत्तसंस्था)

# रस्त्यांवर अवजड वाहने उभी करण्यास बंदी

### रस्ता सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**नवी दिल्ली, १९ एप्रिल**

प्रशासकीय सुस्ती किंवा पायाभूत सुविधांमधील त्रुटींमुळे महामार्ग हे धोक्याचे मार्ग बनू नयेत, अशी नोंद घेत सर्वोच्च न्यायालयाने रस्ते सुरक्षा मजबूत करण्यासाठी अखिल भारतीय स्तरावरील मार्गदर्शक तत्त्वांची मालिका जारी केली. यात रस्त्यांवर अवजड वाहने उभी करण्यास बंदी घालण्याचाही समावेश आहे.

भारताच्या एकूण रस्त्यांच्या लांबीपैकी राष्ट्रीय महामार्गांचा वाटा केवळ दोन टक्के असला, तरी रस्त्यांवरील एकूण मृत्यूंपैकी जवळपास ३० टक्के मृत्यू या महामार्गांवरच होतात, असे न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. ए. एस. चांदूरकर यांच्या न्यायासनाने स्पष्ट केले.

रस्ते अधिक सुरक्षित करण्याबाबत भूपृष्ठ वाहतूक व परिवहन मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश दिला. बेकायदेशीर पार्किंक किंवा ब्लॅकस्पॉट्स (अपघातप्रवण स्थळ) यासारख्या टाळता येण्याजोग्या धोक्यांमुळे एका जरी व्यक्तीचा जीव गेला, तरी ते राज्याच्या संरक्षणात्मक व्यवस्थेचे अपयश ठरते, असे निरीक्षण न्यायासनाने नोंदवले.

बेकायदेशीर पार्किंग किंवा अपघातप्रवण स्थळांसारख्या टाळता येण्याजोग्या धोक्यांमुळे एका व्यक्तीचाही बळी गेला, तरी तो राज्याच्या संरक्षक छत्राचे अपयश ठरते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अन्वये अंतर्भूत असलेला जगण्याचा अधिकार ही केवळ एखाद्याचा जीव बेकायदेशीरपणे हिरावून घेण्याविरुद्धची हमी नाही, तर मानवी जीवनाचे जतन आणि सन्मान होईल, असा सुरक्षित वातावरणाची खात्री करण्याचा राज्यातील एक सकारात्मक आज्ञा आहे, असे न्यायालयाने १३ एप्रिलच्या आदेशात नमूद केले आहे.

**न्यायालयाने स्वतःहून घेतली दखल**

राजस्थानमधील फलोदी आणि तेलंगणातील रंगारेड्डी येथे २ व ३ नोव्हेंबर २०२५ रोजी घडलेल्या रस्ते अपघातांत ३४ जणांचा बळी गेला होता. या अपरिहार्य जीवितहानीस कारणीभूत ठरलेली संस्थात्मक निष्काळजीपणा आणि पायाभूत सुविधांमधील गंभीर त्रुटींच्या संदर्भात स्वतःहून दाखल करून घेतलेल्या एका खटल्यामध्ये न्यायालयाने हा आदेश पारित केला. (वृत्तसंस्था)

# नेपाळच्या 'त्या' निर्णयाने भारताची चिंता वाढली

### सीमावर्ती बाजारात वस्तूंची विक्री घटली

**नवी दिल्ली, १९ एप्रिल**

नेपाळच्या नवीन सरकारने परदेशातील १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर अनिवार्य सीमा शुल्क (भन्सार) लागू करण्याचा निर्णय घेतल्याने भारतीय सीमेवरील शहरात नेपाळमधून येणाऱ्या ग्राहकांची संख्या कमी झाली आहे.

सीमा शुल्क ५ टक्क्यांपासून ते ८० टक्क्यांपर्यंत असून, यामुळे भारतातून खरेदी करण्यात येणाऱ्या वस्तूंमध्ये मोठी घसरण झाली आहे. याचा सर्वाधिक परिणाम सीमावर्ती जिल्ह्यांतील व्यापाऱ्यांवर होत आहे, ज्यांचा बहुतांश व्यापार नेपाळमधील ग्राहकांवर अवलंबून आहे. उत्तराखंडमधील खटीमा येथे नेपाळ सीमेजवळ असलेल्या मेलाघाट आणि नगला तराई येथील बाजारपेठांमध्ये ग्राहकांची संख्या घटली आहे. शुद्ध तेल, साखर आणि डाळी यांसारख्या १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या दैनंदिन वस्तूंवरही सीमा शुल्क आकारले जात आहे. परिणामी, लोक आपली खरेदी मर्यादित करत आहेत किंवा त्यांनी बाजारात जाणे पूर्णपणे थांबवले आहे. सीमेला लागून असलेल्या नेपाळमधील चांदनी, दोधारा, बाबाथन आणि सुंदरनगर येथील लोक खरेदीसाठी मेलाघाट आणि नागला तराईच्या बाजारात येत असत, पण त्यांची संख्या आता कमी झाली आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास व्यापाऱ्यांना मोठे नुकसान सोसावे लागेल असे मेलाघाटमधील व्यापारी दयाशंकर यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले. (वृत्तसंस्था)

## रीलच्या नादात ट्रॅव्हल्स उलटली

# दोन वर्षीय बालकाचा मृत्यू, १७ प्रवासी जखमी



**मेहकर, १९ एप्रिल**

ट्रॅव्हल्स चालकाला रील बनवण्याचा मोह नडल्याने समृद्धी महामार्गावर भीषण अपघात घडला. रविवारच्या पहाटे ५.३० च्या सुमारास मेहकरजवळील फर्दापूर टोल नाक्यासमोर घडलेल्या या अपघातात ट्रॅव्हल्स पलटी होऊन उभ्या असलेल्या कारला धडकली. या दुर्दैवी घटनेत दोन वर्षीय बालकाचा मृत्यू झाला असून, १७ प्रवासी जखमी आहेत.

पीयूष यशपाल राठोड, असे मृत बालकाचे नाव आहे. तर अस्वद अहमद महबूब अहमद (११) रा. पुसद, सुशील खडसे, रूपचंद गजानन बावनकुळे गंभीर जखमी झाले आहेत. वैभव श्रीधर धुळे (२४) रा. पुसद, शांती संजय जाधव (३०) रा. दिग्रस, विजय बाबुराव राठोड (५०) रा. मुंबई, किरण यशपाल राठोड, आशा देवकर, किशन चव्हाण (२२), मैफूज अहमद (४८), उमीहाणी अहमद (४), योगिता रूपचंद बावनकुळे, अविनाश राठोड, राजेश चव्हाण, लवकित चव्हाण, पूजा राठोड, ध्रुवी राठोड (लहान मुलगी) हे किरकोळ जखमी झाले आहेत.



बंजारा ट्रॅव्हल्स क्रमांक एमएच २९ बीई २३३३ ही पनवेलकडून येत होती. प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्री ३ वाजता नंतर दुसऱ्या चालकाने गाडीचा ताबा घेतला. हा चालक गाडी चालवताना मोबाईलवर गाणे लावून रील (व्हिडिओ) बनवत होता. केबिनमध्ये बसलेल्या प्रवाशांनी त्याला वारंवार हटकले, तरीही त्याने दुर्लक्ष केले. मेहकरनजीकच्या फर्दापूर टोल नाक्याजवळ उतारावर गाडी असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस पलटी झाली. सदर बस तिथे उभ्या कार क्रमांक एमएच ४० ईडी १३४८ ला जाऊन जोरात धडकली.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग सहायक पोलिस निरीक्षक संदीप इंगळे, पोलिस कर्मचारी आणि एमएसएफचे जवान सह मेहकर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक संदीप बिरांजे, पोलिस उपनिरीक्षक कांचन जारवाल तत्काळ घटनास्थळी पोहोचले व जखमींना मदत केली.

टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी सुद्धा जीवाची पर्वा न करता बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. माजी आमदार पुत्र निरज रायमूलकर यांनीही अवघ्या १० मिनिटांत पोहोचून जखमींना रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात हलवण्यास मदत केली. जखमींना मेहकर येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)




## बहीणभावाच्या भाषणाच्या दोन तऱ्हा

**महिला** आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत पारित होऊ शकले नाही. मात्र या विधेयकावरील काही भाषणे अतिशय छान झाली. सर्वात महत्वाचे म्हणजे काँग्रेसच्या प्रियांका वढेरा आणि गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या भाषणात एकदुसऱ्याची प्रशंसा केली. प्रियांका यांनी गृहमंत्री अमित शाह यांचा उल्लेख उपरोधिकपणे चाणक्य असा केला. आजच्या राजकारणात चातुर्य हे काही वाईट नाही, उलट विरोधी पक्षांनीही ही कला शिकायला पाहिजे. अमित शाह तर राजनीती आणि कुटनीती यातील चाणक्य आहे. निवडणुकीच्या राजकारणात तर अमित शाह इतके पारंगत आहे की खऱ्या चाणक्यालाही शिकवू शकतील, असे प्रियांका म्हणाल्या. प्रियांका यांच्या या विधानावर अमित शाह यांनाही हसू आवरले नाही.



आपल्या भाषणात अमित शाह यांनी राहुल गांधी यांच्या भाषणाच्या शैलीवर तसेच सभागृहातील आचरणावर जोरदार हल्ला चढवला. राहुल गांधी यांनी सभागृहात भाषण कसे करायचे ते आपल्या पक्षातील वरिष्ठांकडून शिकावे, तुमच्या पक्षात खूप वरिष्ठ लोक आहेत, नसतील तर प्रियांकाकडून शिकावे, असा सल्ला अमित शाह यांनी दिला. एकप्रकारे शाह यांनी भाषण करण्याच्या प्रियांकाच्या शैलीचे कौतुक केले, तर राहुल गांधी यांना टोला मारला.

प्रियांका अतिशय संयमित पध्दतीने आणि हसतमुखाने भाषण करतात, त्यात समोरच्यावर त्या टीकाही करतात, पण त्यांनी केलेली टीका बोचरी नसते. याउलट राहुल गांधी यांचे भाषण करतांनाचे हावभाव अतिशय संतप्तपणाचे असतात. त्यांच्या भाषणातून त्वेष जाणवत असतो. राहुल गांधी आपल्या भाषणातून समोरच्या व्यक्तीला चिथावत असल्यासारखे जाणवत असते. त्यामुळेच राहुल गांधींच्या भाषणात अडथळा आणला जातो, याउलट प्रियांकाचे भाषण सुरळीतपणे होत असते, सभागृह त्यांच्या भाषणाचा आनंद घेतांना दिसतो.

### अमित शाह यांची आक्रमकता



**गृहमंत्री** अमित शाह एकीकडे प्रियांका वढेरा यांच्या भाषणशैलीचे कौतुक करत असतांना दुसरीकडे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर नाव न घेता सडकून हल्ला चढवत होते. अमित शाह यांचा खरा रोष आणि आक्षेप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल राहुल गांधी जी भाषा वापरतात त्यावर होता. त्यांच्या भाषणात अपशब्द आणि असांसदीय शब्द यांची भरमार असते. कधी ते सभागृहात डोळा मारतात, कधी फ्लाईंग किस देतात, तर कधी संसदेच्या प्रवेशाच्या मार्गावर चहापकोडे खात बसतात. विरोधी पक्षनेत्याचे हे कोणत्या प्रकारचे आचरण आहे, असा प्रश्न ते विचारत होते. संसदेचे सत्र सुरु असतांना ते परदेशात निघून जातात, सभागृहातून बाहेर जात मोदी यांच्यावर असंसदीय भाषेत टीका करतात, असे वाक्बाण शाह सोडत होते. शाह शाब्दिक हल्ला चढवत असतांना राहुल गांधी सभागृहात निर्विकारपणे बसले होते. जणू ही टीका आपल्यावर नाही तर दुसऱ्या कोणावर सुरु आहे, असा त्यांचा आविर्भाव होता.

राहुल गांधी आणि पंतप्रधान मोदी तसेच गृहमंत्री अमित शाह सभागृहात उपस्थित असले तर एक सुप्तसा तणाव जाणवत असतो. राहुल गांधींचे आक्रमक हावभाव आणि हातवारे पाहता ते संपूर्ण जगावरचा राग आपल्या भाषणातून काढत आहे, असे वाटत असते. समोरच्याला ते प्रक्षुब्ध करतात, त्यामुळे भाजपा सदस्य भडकतात, त्यांच्या संतापाचा स्फोट होतो. अमित शाह यांनी चर्चेच्या उत्तरात केलेल्या भाषणात याचा खरपूस समाचार घेतला, राहुल गांधींना त्यांची जागा आणि औकात दाखवून दिली.

### भाजपातील नवा आश्वासक चेहरा रक्षा खडसे

**महिला** आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयकावर पुढाकार घेण्याची तसेच वातावरण निर्मिती करण्याची संधी भाजपाने आपल्या काही महिला मंत्र्यांना आणि महिला खासदारांना दिली होती. भाजपाने यासाठी अन्नपूर्णादेवी, शोभा करंडलाजे यांच्यासोबत क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर आणि भाजपा खासदार बांसुरी स्वराज यांची समिती बनवली होती. भाजपा तसेच रालोआतील मित्रपक्षाच्या महिला खासदारांशी संपर्क आणि समन्वय साधण्यासोबत माध्यमांशी बोलण्याची जबाबदारी रक्षा खडसे आणि विजया रहाटकर यांच्याकडे होती. खडसे तीन कार्यकाळपासून खासदार आहेत, पण यावेळी प्रथमच भाजपाने त्यांच्या नेतृत्वगुणाचा उपयोग करुन घेतला, असे म्हणायला हरकत नाही. खरं म्हणजे त्यांच्या या गुणांची जाणिव असल्यामुळेच त्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली, हे नाकारता येणार नाही.

गुरुवारपासून संसदेचे तीन दिवसांचे विशेष सत्र बोलावण्यात आले होते, त्यामुळे मागील आठवड्यात हालचालींना वेग आला होता. बुधवारी तर दिवसभर बैठका सुरु होत्या. रालोआतील मित्रपक्षांची भूमिका निश्चित होती, घटनादुरुस्ती विधेयकाला त्याचा बिनशर्त पाठिंबा होता, पण खरी अडचण काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची होती. मतदारसंघ परिसीमनाच्या आडून महिला आरक्षणाला विरोध करण्याची त्यांची खेळी होती. शुक्रवारी घटनादुरुस्ती विधेयकावर मतदान होणार होते, पण या विधेयकाला विरोधक पाठिंबा देणार नाही, त्यामुळे दोनतृतियांश बहुमतांच्या अभावी हे विधेयक फेटाळले जाणार, याचे संकेत सकाळपासूनच मिळाले होते. त्यामुळे नवीन संसदभवनातील मकरद्वाराला लागून असलेल्या कॉरिडॉरमध्ये हालचालींना वेग आला होता. या कॉरिडॉरमध्ये राजनाथसिंह, अमित शाह, नितीन गडकरी आणि जे.पी. नड्डा यांची कार्यालये आहेत. अमित शाह यांच्या दालनात दिवसभर बैठकांचे सत्र सुरु होते. सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि अन्य मंत्री जात येत होते, या उच्चपदस्थ मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्याची संधी रक्षा खडसे यांनाही मिळाली. पण दिवसभर सुरु असलेल्या या धावपळीला यश आले नाही, लोकसभेत बहुमताच्या अभावी घटनादुरुस्ती विधेयक फेटाळले गेले, सर्वांचीच घोर निराशा झाली. महिला आरक्षणाचे विधेयक आम्ही होऊ देणार नाही, अशी धमकी राहुल गांधी यांनी दिली होती, ती त्यांनी खरी करुन दाखवली. त्यामुळे भाजपाच्या महिला खासदार संतप्त झाल्या. शनिवारी रक्षा खडसे, बांसुरी स्वराज आणि भाजपाच्या अन्य महिला खासदार राहुल गांधी यांच्या निवासस्थानासमोर निदर्शने करण्यासाठी पोहोचले, पोलिसांनी या सर्वांना ताब्यात घेतले.

काँग्रेसचा महिला विरोधी चेहरा समोर आणण्यासाठी भाजपाने या मुद्द्यावर देशव्यापी जनजागरण करण्याचा निर्णय घेतला, गुजरातची राजधानी गांधीनगरमध्ये मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासोबत रविवारी पत्रपरिषद घेण्याची जबाबदारी रक्षा खडसे यांच्यावर सोपवण्यात आली होती. महिला आरक्षणासंदर्भात पक्षाने ज्या काही जबाबदाऱ्या सोपवल्या, त्या त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडल्या. यानिमित्ताने भाजपाला एक उमदा आणि आश्वासक चेहरा मिळाला, हे मात्र खरं.

**● दिल्लीवाला**



आज पक्षाला अशा अभ्यासू, लढाऊ व निष्ठावंत महिला नेतृत्वाची गरज आहे, जी सभागृहात पक्षाची भूमिका ठामपणे मांडू शकेल आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देईल. त्या दृष्टीने मी स्वतःला सक्षम उमेदवार म्हणून आपणासमोर उमेदवारीची मागणी करत आहे.
**- रुपाली ठोंबरे**, नेत्या, राकाँ.


तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.tarunbharat.net
सोमवार, २० एप्रिल २०२६




माजी खासदार नवनीत राणा यांच्यावर दोन समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये केल्या प्रकरणी गुन्हे दाखल झाले पाहिजेत, त्यांच्यासोबतच डॉ.अनिल बोंडे यांच्यावरही गुन्हे दाखल झाले पाहिजेत, त्यांनी अमरावती प्रकरणी चुकीची माहिती दिली आहे.
**- विजय वडेट्टीवार**, काँग्रेस नेते



# संघर्षविरामातही इस्रायलचे हल्ले

## लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर ड्रोनचा मारा, १५ ठार



### भूमिगत मार्ग उद्ध्वस्त

**इस्रायलच्या संरक्षण विभागाने निवेदनात म्हटले की, संघर्षविरामानंतरही हुजबुल्लाहकडून कुरघोड्या सुरूच होत्या. त्यांनी इस्रायली सैन्य असलेल्या ठिकाणांवर हल्ल्याचे प्रयत्न केले. याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली. हल्ल्यात उत्तर लेबनॉनला जोडणारा भूमिगत मार्ग उद्ध्वस्त करण्यात आला. हे हल्ले संघर्षविरामाचे उल्लंघन नव्हते आणि ते सुरक्षेच्या कारणास्तव करण्यात आले.**

### यूएई-ब्रिटनकडून चिंता

**संयुक्त अरब अमिरात (यूएई) आणि ब्रिटनच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी प्रादेशिक परिस्थिती आणि वाढत्या तणावासंदर्भात चर्चा केली. या बैठकीदरम्यान, दोन्ही देशांनी पश्चिम आशियातील सद्यस्थिती आणि सुरक्षेवर चिंता व्यक्त केली. ब्रिटनचे परराष्ट्र सचिव इव्हेट कूपर यांना यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, प्रादेशिक घडामोडी आणि इराणने आखाती देशांवर केलेल्या हल्ल्यांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. संघर्षविरामाचे दोन्ही पक्षानी पालन करावे अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.**

**◆ बैरुत, १९ एप्रिल**

इस्रायल-लेबनॉनमध्ये दहा दिवसांचा संघर्षविराम असताना रविवारी पहाटे इस्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमधील दहशतवादी हिजबुल्लाहच्या अड्ड्यांना लक्ष्य करीत हवाई आणि जमिनी मार्गाने हल्ले चढविले. यात अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या असून, १५ नागरिक ठार, ३५ जखमी झाल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने दिली.

युरोपियन देश आणि आखातातील पाच देशांनी हल्ल्याचा निषेध केला. संघर्षविरामाला गालबोट लावण्याचा इस्रायलचा प्रयत्न असल्याची टीका त्यांनी केली.

इस्रायली सैन्याने लेबनॉनच्या दक्षिण भागात ड्रोनचा मारा केला, तसेच लष्कराने जमिनी मार्गाने तोफांचा मारा करीत गोळीबार केला. इस्रायलच्या संरक्षण विभागाने हल्ल्याची पुष्टी करताना कारवाईचे वर्णन नवीन यलो लाइनच्या दक्षिणेकडील कथित धोक्यांना दिलेले प्रत्युत्तर असे केले आहे. इस्रायलने रविवारी दोन वेगवेगळ्या हवाई हल्ल्यासोबतच हिजबुल्लाहचे नियंत्रण असलेल्या अनेक गावांवर तोफगोळ्यांचा मारा केल्याचे निवेदनात म्हटले आहे. पहिला हल्ला हिजबुल्लाहच्या लढवय्यांना लक्ष्य करून करण्यात आला. प्रत्युत्तरात हिजबुल्लाहने इस्रायली सैन्यावर ड्रोनचा मारा आणि गोळीबार केला. (वृत्तसंस्था)



पश्चिम बंगालमधील झारग्राम मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रविवारी प्रचार सभा झाली. सभा होण्यापूर्वी त्यांनी रस्त्यावरील दुकान गाठत झालमुरीचा आस्वाद घेतला. वाफविलेल्या तांदळापासून तयार केलेला हा खाद्यपदार्थ बंगालमध्ये प्रसिद्ध आहे

# श्रीनगर विमानतळावर दोन अमेरिकन नागरिक ताब्यात

## तपासणीदरम्यान सापडला सॅटेलाइट फोन



**◆ श्रीनगर, १९ एप्रिल**

श्रीनगर विमानतळावर सुरक्षा तपासणीदरम्यान दोन अमेरिकन नागरिकांकडे एक गार्मिन सॅटेलाइट फोन आढळल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. विमानतळ सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला त्यांची चौकशी केली आणि नंतर त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले.

ज्या व्यक्तीच्या सामानात हा फोन सापडला, त्याचे नाव जेफ्री स्कॉट असून तो अमेरिकेतील मोंटाना राज्याचा रहिवासी आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, विमानतळावर नियमित सुरक्षा तपासणीदरम्यान, दोन अमेरिकन नागरिकांचे सामान स्कॅन केले जात होते, तेव्हा त्यांच्या एका बॅगेत गार्मिन सॅटेलाइट फोन सापडला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना तत्काळ थांबवले आणि चौकशी केली. त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने दोघांनाही पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दोन अमेरिकन नागरिक श्रीनगरला कोणत्या उद्देशाने आले याची माहिती समोर आलेली नाही. यापूर्वीही भारतातील विविध विमानतळांवर अमेरिकन नागरिक सॅटेलाइट फोनसह पकडले गेले आहेत. परदेशी पर्यटक अनेकदा सॅटेलाइट फोनवरील बंदीबद्दल अनभिज्ञ राहून भारतात येतात. (वृत्तसंस्था)

### सॅटेलाइट फोनबाबत काय नियम आहेत?

- **थुराया किंवा इरिडियम सारखे सॅटेलाइट फोन भारतात आणण्यास सक्त मनाई आहे**
- **एखादी व्यक्ती असा फोन सोबत आणत असेल तर त्यांना विमानतळावरील सीमाशुल्क विभागाला (कस्टम्स) कळवणे आवश्यक आहे.**
- **नवीन नियमांनुसार, दूरसंचार कायदा २०२३ अंतर्गत, परवानगीशिवाय सॅटेलाइट फोन किंवा सॅटेलाइट जीपीएस उपकरण बाळगणे गुन्हा आहे**
- **भारतीय वायरलेस टेलिग्राफी कायदा १९३३ (कलम ६), भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५ (कलम २०), आणि दूरसंचार कायदा २०२३ अंतर्गत, ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि २ कोटींपर्यंत दंड (किंवा दोन्ही) ठोठावला जाऊ शकतो.**

# इटलीत दोन भारतीयांची गोळ्या घालून हत्या

**◆ रोम, १९ एप्रिल**

इटलीच्या बर्मागो प्रांतातील कोवो येथे बैसाखी उत्सवानिमित्त आयोजित एका कार्यक्रमादरम्यान गुरुद्वारा म्हणून वापरल्या जाणाऱ्या एका गोदामातून बाहेर पडत असतानाच दोन भारतीयांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली.

हा हल्ला शुक्रवारी मध्यरात्रीच्या काही मिनिटे आधी शहराच्या औद्योगिक क्षेत्रातील गुरुद्वारा माता साहिब कौर जी समोरील चौकात घडला. मृतांची ओळख पटली असून, रागिंदरसिंग आणि गुरमितसिंग अशी त्यांची नावे आहेत. हल्लेखोराने जवळ जाऊन गोळीबार केला आणि नंतर वाहनातून फरार झाला, असे वृत्तांत म्हटले आहे. अचानक झालेल्या मारहाणीचे रूपांतर रक्तपातात झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला. ही अतिशय थंडपणे केलेली पूर्वनियोजित हत्येची शक्यता असून, पोलिस अधिकारी त्या दिशेने तपास करीत आहेत. (वृत्तसंस्था)

# भारतीय जहाजांना मिळणार सुरक्षा कवच

## केंद्र सरकारकडून १२,९८० कोटींच्या सागरी विमा निधीला मंजुरी

**◆ नवी दिल्ली, १९ एप्रिल**

मध्यपूर्वेतील तणाव आणि वाढत्या विमा हप्त्यांच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने भारतीय जहाजे आणि सागरी व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी १२,९८० कोटी रुपयांच्या सरकारी हमीसह देशांतर्गत विमा निधी स्थापन करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. नवीन निधीचे नाव भारत सागरी विमा निधी असे ठेवण्यात आले आहे.

भारतीय बंदरांवरून कोणत्याही देशातून मालवाहतूक करणाऱ्या भारतीय ध्वजांकित किंवा संलग्न जहाजांना परवडणारा विमा उपलब्ध करून देणे, हे या निधीचे उद्दिष्ट आहे. या निधीमध्ये जहाजे आणि यंत्रसामग्री, माल, तृतीय-पक्ष दायित्व (संरक्षण आणि नुकसानभरपाई) आणि युद्धाशी संबंधित धोके यासह



सागरी व्यापाराशी संबंधित सर्व प्रमुख धोके समाविष्ट असतील.

केंद्र सरकारकडून जारी करण्यात आलेल्या एका अधिकृत निवेदनात म्हटले की, या विमा निधीच्या माध्यमातून विमा कंपन्या संयुक्तपणे पॉलिसी जारी करतील, ज्याची एकूण अंडररायटिंग क्षमता अंदाजे ९५० कोटी असेल. यामुळे देशांतर्गत विमा आणि जोखीम व्यवस्थापन क्षमता मजबूत होईल. (वृत्तसंस्था)

### निर्णयाचे उद्दिष्ट्ये काय?

**या उपक्रमामुळे भारताला आपली सागरी विमा प्रणाली आत्मनिर्भर बनविण्यात मदत होईल. भारतीय जहाज वाहतूक क्षेत्राच्या गरजांनुसार सागरी विमा, दाव्यांचे व्यवस्थापन आणि कायदेशीर कौशल्य देखील देशात विकसित केले जाईल. या उपक्रमासंदर्भात सरकारने म्हटले की, जागतिक तणाव आणि अनिश्चिततेमुळे सागरी व्यापारावर परिणाम झाला आहे. जहाजे आणि मालाच्या नुकसानीचा धोका वाढला आहे, ज्यामुळे विमा महाग आणि मिळवणे कठीण झाले.व्यवसायाचे सातत्य राखण्यासाठी देशांतर्गत सागरी जोखीम विमा निधीची स्थापना करण्यात आली.**

## चित्रपट वार्ता

### दीपिका देणार का परत गुड न्यूज?

**मुंबई** : बॉलिवूडमधील लोकप्रिय जोडी दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंग पुन्हा एकदा चर्चेत आली असून, त्यांच्या कुटुंबाबाबत सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्या दुसऱ्या अपत्याबाबत काही पोस्ट आणि दावे व्हायरल झाल्यानंतर चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. मात्र याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. सोशल मीडियावर फिरत असलेल्या दाव्यानुसार, दीपिका पादुकोणने एक पोस्ट शेअर केली असून त्यामध्ये त्यांच्या मुलगी दुआचा फोटो असल्याचे म्हटले जात आहे. या व्हायरल दाव्यांमध्ये असा उल्लेख आहे की, फोटोत दुआच्या हातात प्रेग्नन्सी टेस्ट किट दिसत असून त्याचा निकाल पॉझिटिव्ह असल्याचे दाखवले गेले आहे. या कथित पोस्टमुळे 'बेबी नंबर २' बाबत चर्चा सुरू झाली आहे.



### अभिजित सावंतची 'बिग बॉस...'मध्ये एन्ट्री

**मुंबई** : 'बिग बॉस मराठी'च्या सध्याच्या पर्वाचा प्रवास अंतिम टप्प्याकडे येत असताना घरातील वातावरण अधिकच भावनिक आणि उत्साहपूर्ण झाले आहे. अशातच प्रेक्षकांसाठी आणि स्पर्धकांसाठी एक खास सरप्राईज ठरलेली घटना घडली असून, गायक अभिजित सावंत याने पुन्हा एकदा 'बिग बॉस'च्या घरात एन्ट्री करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मागील पर्वाचा उपविजेता राहिलेला अभिजीत सावंत या वेळी विशेष पाहुणा म्हणून घरात दाखल झाला. त्याच्या आगमनाने घरातील स्पर्धकांमध्ये आनंद आणि उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले. अभिजितच्या पुनरागमनामुळे घरात जुन्या आठवणींनाही उजाळा मिळाला. घरात प्रवेश करताच अभिजितने आपल्या सुमधुर आवाजाने वातावरण भारावून टाकले. त्याने 'तुम बिन' या लोकप्रिय चित्रपटातील एक भावस्पर्शी गाणे सादर केले. या विशेष एपिसोडमध्ये अभिजितने केवळ गाण्याची मेजवानी दिली नाही, तर घरातील स्पर्धकांना काही मोलाचे सल्लेही दिल्याचे दिसून आले.



### वीर पहाडिया पुन्हा चर्चेत

**मुंबई** : अभिनेता वीर पहाडिया पुन्हा एकदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. तारा सुतारियासोबतच्या ब्रेकअपनंतर अवघ्या काही महिन्यांतच तो एका अज्ञात तरुणीसोबत दिसल्याने सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वीर पहाडिया अलीकडेच मुंबईतील एका रेस्टॉरंटमधून एका 'मिस्ट्री गर्ल'सोबत बाहेर पडताना दिसला. दोघेही गाडीकडे जाताना पापाराझी कॅमेऱ्यात कैद झाले. या वेळी संबंधित तरुणीने आपला चेहरा लपवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. मात्र, वीरने थांबून पापाराझींशी संवाद साधल्याचे व्हिडीओत दिसते.या घटनेचा व्हिडिओ प्रसिद्ध पापाराझी अकाउंटवरून समोर आल्यानंतर तो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये वीर काळ्या रंगाच्या स्टायलिश पोशाखात दिसत असून, त्याच्यासोबत दिसलेली तरुणी पांढऱ्या टॉप आणि निळ्या डेनिममध्ये असल्याचे दिसते.






हिंदूधर्मीयांसाठी पवित्र आणि श्रद्धेचे स्थान असलेल्या चारधाम यात्रेला रविवारपासून प्रारंभ झाला आहे. उत्तराखंडमधील गंगोत्री धामचे दरवाजे उघडल्यानंतर दर्शनासाठी झालेली भाविकांची गर्दी

# अखेर लेन्सकार्टच्या 'दृष्टिदोषा'त सुधारणा

### सांस्कृतिक प्रतीकांचा नवा 'चष्मा'

**◆ नवी दिल्ली, १९ एप्रिल**

लेन्सकार्टमध्ये टिकली आणि टिळा यावरून झालेल्या वादानंतर कंपनीच्या 'दृष्टिदोषा'त सुधारणा झाली असून, त्यांनी सांस्कृतिक प्रतीकांचा नवा चष्मा घातला आहे. लेन्सकार्टला ट्रोलिंगला सामोरे जावे लागल्यानंतर आता नियमावली बदलली आहे.

समाज माध्यमावर लेन्सकार्टच्या 'स्टाईल गाईड'मधील ११ व्या पानाचा एक स्क्रीनशॉट व्हायरल झाला. लेखिका शेफाली वैद्य यांनी हा स्क्रीनशॉट शेअर करीत खळबळजनक दावा केला होता. या दाव्यानुसार, लेन्सकार्टच्या नियमावलीत कर्मचाऱ्यांना 'हिजाब' घालण्याची परवानगी आहे. मात्र, कपाळावर 'बिंदी' (टिकली), 'टिळा' किंवा हातात दोरा बांधण्यास मनाई करण्यात आली आहे. ही पोस्ट व्हायरल झाल्यावर बराच वादही निर्माण झाला होता. अनेकांनी लेन्सकार्टला ट्रोल केले होते. ज्यानंतर आता लेन्सकार्टने नियमावलीत बदल केले आहेत.

वाढता वाद आणि ग्राहकांचा रोष पाहता, लेन्सकार्टचे संस्थापक पीयूष बन्सल यांनी 'एक्स'वर पोस्ट करत आपली बाजू मांडली. त्यांनी स्पष्ट केले की, जो दस्तऐवज व्हायरल होत आहे, तो कंपनीचे सध्याचे धोरण दर्शवत नाही. जो फोटो व्हायरल होत आहे, तो चुकीचा आहे. आमच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये धार्मिक अभिव्यक्तीवर कोणतेही निर्बंध नाहीत. (वृत्तसंस्था)

### गुलशन कुमार यांच्या भावाचे निधन

**◆ मुंबई, १९ एप्रिल**

टी-सीरीज या आघाडीच्या संगीत कंपनीचे संस्थापक दिवंगत गुलशन कुमार यांचे धाकटे बंधू दर्शन कुमार यांचे १८ एप्रिल रोजी निधन झाले. वयाच्या ७० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दर्शन कुमार हे नेहमीच प्रसिद्धीपासून दूर राहून पडद्यामागे कार्य करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. मात्र, टी-सीरीजच्या उभारणीत आणि विस्तारात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. संगीत क्षेत्रात नवोदित कलाकारांना संधी देणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच कंपनीच्या वाढीसाठी धोरणात्मक भूमिका बजावण्यात त्यांनी मोलाची जबाबदारी पार पाडली. आज टी-सीरीज ही जगातील सर्वात मोठ्या संगीत कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या यशामागे कुमार कुटुंबातील अनेक सदस्यांचे योगदान आहे. (वृत्तसंस्था)

# वायुदलाच्या 'गरुड'चे बळकट होणार पंख

- मिळणार छोटेखानी 'यूएव्ही'
- प्रतिकूल वातावरणात वापर शक्य



### १५ किमी, ६० मिनिटे उड्डाणक्षमता

**या यूएव्हीची उड्डाणक्षमता १५ किमी आणि किमान ६० मिनिटे हवेत राहण्याची आहे. याच्या नियंत्रणासाठी केवळ दोन जणांच्या चमूची गरज आहे, असे दुसऱ्या एका अधिकाऱ्याने सांगितले. ही प्रणाली जीपीएस विरहित वातावरणातही कार्यरत राहण्यास सक्षम असून, ती भारतीय प्रादेशिक नेव्हिगेशन उपग्रह प्रणालीशी सुसंगत असावी असे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

**◆ नवी दिल्ली, १९ एप्रिल**

वायुदलाच्या गरुड या विशेष दलासाठी एका छोटेखानी मानवरहित हवाई वाहन (यूएव्ही) प्रणालीच्या खरेदीची प्रक्रिया सरकारने सुरू केली आहे. ही प्रणाली अत्यंत प्रतिकूल पर्यावरणीय परिस्थितीत आणि समुद्रसपाटीपासून १६,४०० फुटांपर्यंत उंचीवरही कार्यरत राहण्यास सक्षम आहे.

ही नियोजित प्रणाली अतिशय उंचावरून पाळत ठेवण्यासाठी तसेच विविध प्रकारच्या भूप्रदेशात आणि हवामान परिस्थितीत कार्यक्षम मदत पुरवण्याच्या उद्देशाने वापरली जाणार आहे. विद्यमान प्रणालीच्या तुलनेत या प्रणालीची कार्यक्षमता आणि टिकून राहण्याची क्षमता अधिक असेल, अशी अपेक्षा असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

संरक्षण मंत्रालयाने अलिकडेच वायुदलाच्या गरुड विशेष दलासाठी सूक्ष्म मानवरहित वाहन प्रणाली खरेदी करण्यासाठी विनंतीपत्र जारी केले आहे. प्रस्तावित प्रणालीमध्ये दिवस-रात्र पाळत ठेवणे, लक्ष्याचा वेध घेणे आणि प्रत्यक्ष वेळेतील परिस्थितीची जाणीव असले या गोष्टींनाही सहाय्य करण्याची क्षमता असावी, असे अधिकाऱ्याने सांगितले. सूक्ष्म मानवरहित वाहन प्रणाली ही विशेष दलांच्या मोहिमांसाठी तयार करण्यात आलेली एक संक्षिप्त, हलकी आणि सहज वाहून नेता येण्यासारखी प्रणाली असेल, अशी कल्पना असल्याचे त्यांनी सांगितले.

वायुदलाच्या या विशेष तुकडीकडे सध्या तत्सम प्रणाली उपलब्ध आहे. मात्र, नवीन प्रणाली आधुनिक आहे आणि अत्याधुनिक वैशिष्ट्यांनी युक्त, स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेली असेल, असे या प्रकल्पाची माहिती असलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

ही प्रणाली अत्यंत प्रतिकूल पर्यावरणीय परिस्थितीत काम करण्यास सक्षम आहे. यामध्ये उणे २० अंश सेल्सिअस ते अधिक ५० अंश सेल्सिअस या श्रेणीतील तापमान आणि समुद्रसपाटीपासून १६,४०० फुटांपर्यंतची उंचीचा समावेश आहे, असे त्या अधिकाऱ्याने सांगितले. प्रस्तावित प्रणालीची रेंज वाढवण्यासोबतच तिची काठिण्य पातळीही सुधारण्याची अपेक्षा आहे. नियोजित केल्यानुसार तिचे काही प्रमुख कार्यदर्शन मापदंड अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आत्मनिर्भरतेला पर्याय नाही...

'सैन्य हे केवळ भावनेच्या बळावर नव्हे, तर भरल्या पोटातून मिळणाऱ्या बळावर चालत असते, पोट भरलेले असेल तर अधिक जोमाने आणि त्वेषाने लढत असते, हे वारंवार सिद्ध झाले आहे'- नेपोलियन बोनापार्टचे हे विधान पुढे प्रसिद्ध म्हण म्हणून रूढ झाले आहे. लष्कराच्या दिमतीला पुरेसे वित्तीय बळ नसले तर सैनिक कितीही लढवय्ये असले तरी त्यांचे पानिपत झाल्याशिवाय राहत नाही. जग गेल्या तीन वर्षांपासून युद्धांच्या अनुभवातून जात आहे. २०२३ मध्ये सुरू झालेले रशिया-युक्रेन युद्ध अजूनही थांबलेले नाही. सध्या दोन्ही देशांनी फक्त काही काळासाठी युद्धविराम घोषित केला आहे. २०२५ मध्ये सहा महिन्यांचे इस्रायल-इराण युद्ध भडकले होते. ती आग शांत होते न होते तोच, नव्याने संपूर्ण पश्चिम आशिया भयंकर संघर्षांच्या आगीत होरपळतो आहे. हा संघर्ष इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातच मर्यादित राहिला नसून त्याची झळ जगाला बसत आहे. अनेक देशांच्या अर्थव्यवस्था खिळखिळ्या झाल्या आहेत. मध्यपूर्वेतील इराण, ओमान, संयुक्त अरब अमिरात, कतार, सौदी अरेबिया, इराक, सीरिया, लेबनॉन आणि बहरीन या देशांची अपरिमित वित्तहानी झाली आहे. इराणने तर अमेरिकेसोबत लढण्याच्या हट्टापायी स्वतःवर भयंकर संकट ओढवून घेतले. हजारो निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. पायाभूत सुविधांची झालेली नासधूस तर प्रचंड आहे. अमेरिकेलाही आपली अब्रू वाचविण्यासाठी मध्यपूर्वेतील लष्करासाठी उभारलेल्या पायाभूत सुविधा गमवाव्या लागल्या आहेत. संघर्ष अजूनही थांबलेला नाही. केवळ दोन आठवड्यांसाठी थांबविण्यात आला आहे; पण संकट टळलेले नाही. अमेरिकेकडे डोनाल्ड ट्रम्प तर इराणकडे मोजतबा यांच्यासारखे हट्टी आणि विनाश ओढवून घेणारे नेतृत्व आहे. अजूनही यापैकी कुणीही मागे हटायला तयार नाही. होर्मुझच्या सागरी मार्गावर लढाऊ जहाजे नांगरून व्यापारी मार्ग बंद करून टाकला. वास्तविक पाहता संयुक्त राष्ट्र संघाच्या 'कन्व्हेन्शन ऑन द ला ऑन द सी'नुसार कोणताही देश आंतरराष्ट्रीय सागरी मार्ग एकतर्फी रोखू शकत नाही. देशांमध्ये शांततापूर्ण सहअस्तित्व आणि सहकार्याला प्रोत्साहन देणारी मानके या कायद्याद्वारे प्रस्थापित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे युनोच्या या कायद्याने हाही अधिकार दिला आहे की, एखाद्या सागरी प्रदेशातून जाण्यासाठी संबंधित देशाच्या कायद्यानुसार परवानगी आवश्यक असली तरी किंवा संबंधित देशाचे नियंत्रण असले तरी युनोच्या सागरी कायद्यानुसार प्रादेशिक जलक्षेत्रातून मुक्त आणि शांततापूर्ण प्रवासाचा हक्क सर्वच देशांना मिळाला आहे. तसेच एखादे जहाज किंवा नौका शांतता आणि सुव्यवस्थेत जोपर्यंत अडथळा आणत नाही, तोपर्यंत परवानगी न घेताही एखाद्या देशाच्या सागरी हद्दीतून बिनदिक्कत प्रवास करू शकते. विशेष म्हणजे पाणबुड्यांनाही हा अधिकार मिळतो. वाहतुकीस योग्य असलेले सागरी क्षेत्र एखाद्या देशाच्या किनाऱ्यालगत असले तरी ते पूर्णपणे सागरी प्रवासासाठी बंद केले जाऊ शकत नाही. युनोच्या या कायद्यातील कलम १७ नुसार हे स्पष्ट केले की या कायद्याच्या अधीन राहून सर्व देशांच्या जहाजांना, मग ती किनारी असोत की भूवेष्टित, प्रादेशिक समुद्रातून निर्दोष प्रवास करण्याचा हक्क प्राप्त होतो. पण, होर्मुझच्या खाडीत सध्या जे दोन देश दादागिरी करीत आहेत, त्या इराण अथवा अमेरिका यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या 'कन्व्हेन्शन ऑन द ला ऑन द सी' या कराराला मान्यता दिलेली नाही. तसाही युनोला किमान युद्धाच्या बाबतीत फार अर्थ राहिला नाही. अमेरिकेचे धोरण तर 'बळी तो कानपिळी', असे सातत्याने राहिलेले आहे. इराणवर तर कुणाचेच नियंत्रण राहिलेले नाही. होर्मुझचा सागरी महामार्ग दोन्ही देशांनी बेकायदेशीरपणे रोखून धरल्याने आशियातील बहुतांश देशांना आर्थिक फटका बसतो आहे. विशाल लोकसंख्या असलेला भारतही यातून सुटलेला नाही. पण, अशाही संकटाच्या स्थितीत भारत जवळपास वर्षभरापासून तग धरून आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये भारतावर ५० टक्के व्यापार शुल्क लादले. भारताला मित्र म्हणून संबोधणाऱ्या ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयाचे नकारात्मक परिणाम नाही म्हटले तरी निर्यातीवर झाले. रशियाकडून कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांवर कधी शंभर टक्के तर कधी ५०० टक्के व्यापार शुल्क लादण्याची धमकी ट्रम्प सातत्याने देत होते. नाही म्हटले तरी भारताला काही महिने तरी रशियाकडून तेलाची आयात कमी करावी लागली. ती पूर्णपणे थांबविलेली नव्हती. रशिया युद्धजन्य परिस्थितीचा सामना करीत असतानाही हा देश सातत्याने भारताच्या पाठीशी उभा राहिलेला आहे. एक आशादायी बाब म्हणजे भारत-अमेरिका व्यापारासंदर्भात भारताच्या केंद्रीय व्यापार मंत्रालयाने आयात-निर्याती संदर्भात जी आकडेवारी जारी केली आहे, तीत डोनाल्ड ट्रम्प काहीही बरळत असले तरी दोन्ही देशांतील व्यापार सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताची सर्वाधिक निर्यात अमेरिकेत झाली आहे. या काळात भारताने अमेरिकेत ८७.३०८ अब्ज डॉलर्स किमतीची विविध उत्पादने निर्यात केली. याचा परिणाम म्हणजे दोन्ही देशांमधील व्यापारातील तूट मोठ्या प्रमाणात कमी होण्यात मदत झाली. ऑक्टोबर २०२५ मध्ये दोन्ही देशांतील व्यापारी तूट ४९.६८ अब्ज डॉलर्स एवढी होती, तर मार्च २०२६ मध्ये ती अर्ध्यापेक्षा खाली म्हणजे २०.६७ अब्ज डॉलर्सवर आली. अर्थात आज दोन्ही देशांना एकमेकांची गरज आहे, हे सिद्ध झाले. भू-राजकीय पातळीवर मात्र, अमेरिका भारतासाठी बेभरवशाचा सहकारी असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. आणि या मुद्यावर रशिया हा खात्रीलायक मित्र म्हणून सिद्ध झाले. काहीही झाले तरी भारताला कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरूच ठेवण्याची भूमिका पुतिन यांनी घेतली. १९७१ चे युद्ध असो की कारगिलचा संघर्ष, या कथित साम्यवादी देशाने भारताला सतत मदतीचा हात दिला. दोन्ही देशांतील मैत्रीचा सेतू हा परस्पर सहकार्य आणि विश्वासावर उभा आहे. अनेक स्थित्यंतरे घडली, अनेक सरकारे आली-गेली; पण, मैत्री मात्र कायम राहिली.

रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतिन हे येत्या सप्टेंबरमध्ये भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. विशेष म्हणजे वर्षभरातील पुतिन यांचा हा दुसरा भारत दौरा असेल. रशिया-भारत वार्षिक परिषदेच्या निमित्ताने डिसेंबर २०२५ मध्ये युक्रेनशी युद्ध सुरू असतानाही पुतिन भारतात आले होते. आता सप्टेंबरमध्ये ब्रिक्स परिषदेचे यजमानपद भारताकडे आहे. या परिषदेसाठी पुतिन यांचा दौरा निश्चित असल्याचे रशियन परराष्ट्र खात्याने स्पष्ट केले आहे. रशिया मित्र आहे हे खरे; मात्र भारताने आणखी कितीकाळ रशियाच्या मदतीवर विसंबून राहावे हा प्रश्न कधी तरी विचारात घ्यावा लागेलच. रशियाचे सहकार्य लाभले नसते तर भारताची आर्थिक स्थिती आणखीनच बिकट झाली असती हेही खरे. भारतानेही यासाठी रूबल्स म्हणा की डॉलर्स, त्यात रक्कम मोजली आहे. विशेष म्हणजे संघर्षाच्या संपूर्ण काळात भारताने भू-राजकीय स्थिती अत्यंत संयमाने आणि कुशलतेने हाताळली. आशियातील अनेक देशांमध्ये वायू आणि इंधन संकट निर्माण आहे. तेलसमृद्ध इराणच्या सीमेला लागून असलेल्या पाकिस्तानात सुद्धा लॉकडाऊन करण्याची पाळी आली. जेमतेम २० कोटी लोकसंख्या असलेला देश सांभाळताना शाहबाज शरिफांच्या तोंडाला फेस आलेला असताना पंतप्रधान मोदींनी मात्र देशातील आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवले आहे. पावणे दोन महिन्यांपासून मध्यपूर्वेतील संघर्ष सुरू असतानाही पेट्रोल, डिझेलच्या किमती स्थिर आहेत. केवळ स्वयंपाकाच्या गॅसच्या किमतीत किंचित वाढ केली गेली. युक्रेन-रशिया युद्ध भरात असताना भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात प्रचंड प्रमाणात कच्चे तेल आयात केल्यानंतर ते जागतिक बाजारात विकून तयार केलेली बेगमी आता संकटाच्या काळात कामी येत आहे. पण, दीर्घकाळाचा विचार करून भारताला आज ना उद्या ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भर व्हावेच लागणार आहे, हा संदेश सध्याच्या जागतिक संघर्षाच्या काळातून मिळाला आहे. त्यामुळे पुतिन यांचे स्वागत करताना असो की अमेरिकेला दाखवणे असो; आत्मनिर्भरतेला पर्याय नाही हेच आपल्याला लक्षात ठेवावे लागेल.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# एक साप, एक राष्ट्रपती!


"एक दयाळू- कनवाळू महिला होती. एकदा तिला अर्धवट गोठलेला साप आढळला. तिला त्याची दया आली. महिलेने सापावर काही उपचार केले. थोड्या वेळात साप शुद्धीवर आला आणि त्याने पहिला चावा घेतला, त्याला वाचविणाऱ्या त्या महिलेलाच." राष्ट्रपती ट्रम्प आपल्या पहिल्या कारकीर्दीत आपल्या भाषणांमध्ये ही गोष्ट रंगवून सांगत असत. त्यांचा रोख क्युबातून अमेरिकेत येणाऱ्या निर्वासितांवर होता. पण, काही मानसतज्ज्ञांच्या मते ही बाब ट्रम्प यांनाच लागू पडते.

३ ऑक्टोबर २०१७ मध्ये अमेरिकेत एका पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले होते. त्यावर्षीचे ते सर्वाधिक खपाचे पुस्तक ठरले. त्यात सापाची ही कथा सांगण्यात आली आहे. पुस्तकाचे शीर्षक आहे- 'द डेंजरस केस ऑफ डोनाल्ड ट्रम्प.'

**२७ तज्ज्ञांचे पुस्तक :** अमेरिकेतील २७ प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञांनी हे पुस्तक लिहिले असून, त्याचे संपादन येल विद्यापीठातील श्रीमती बॅण्डी ली यांनी केले आहे. एका हाती हे पुस्तक घ्यावे आणि दुसऱ्या हाताने टीव्हीचा रिमोट हाती घेत ट्रम्प यांची विधाने ऐकावीत. पुस्तकातील प्रत्येक शब्दाचे प्रतिबिंब ट्रम्प यांच्या वागणुकीत दिसून येते. पुस्तकात श्रीमती ली यांनी एक प्रांजळ कबुली दिली आहे. हे पुस्तक तयार करताना आम्ही 'गोल्डन वॉटर रुल'चे पालन केलेले नाही. याचा अर्थ ज्या व्यक्तीबाबत हे पुस्तक लिहिण्यात आलेले आहे, त्याची मानसशास्त्रीय तपासणी न करता आम्ही हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तक लिहिणारे सारे लेखक मानसशास्त्रात एम. डी. आणि पीएच. डी. केलेले आहेत.

**सहलेखक :** राष्ट्रपती ट्रम्प, आपण कोणतेही 'डिल' म्हणजे तडजोड वा सौदा करण्यात कसे निष्णात आहोत हे सांगत असतात. याबाबत त्यांनी 'द आर्ट ऑफ द डिल' हे पुस्तकही लिहिले. या पुस्तकाचे त्यांचे सहलेखक टोनी सचवार्टस ट्रम्प यांच्याबाबत लिहितात, "स्वत:ला सुरुंग लावण्याचा त्यांचा गुण त्यांच्या भूतकाळात लपला आहे. आपल्या चुका- निर्णय याबाबत आत्मपरीक्षण करण्याऐवजी ते त्यावर तडकतात." टोनी पुढे लिहितात, कुणावरही विश्वास न ठेवणे ही त्यांची खरी समस्या आहे. आणि यामुळेच त्यांचे व आमचे म्हणजे अमेरिकेचेही पतन होईल.

**'नॉर्मल' नाहीत :** राष्ट्रपती ट्रम्प यांचे व्यक्तित्व सामान्य म्हणजे नॉर्मल नाही आणि देशाला हे सांगण्याचे कर्तव्य आपण बजावले पाहिजे असे मत जेम्स गॅलिगन यांनी या पुस्तकात नोंदविले आहे. कॅलिगन यांनी शालीन शब्दात ट्रम्प हे कसे विचित्र आहेत हेच सांगितले आहे.



**२५ वी घटनादुरुस्ती :** अमेरिकन घटनेच्या २५ व्या दुरुस्तीनुसार काँग्रेसला राष्ट्रपतींना हटविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. काँग्रेसने एक निष्पक्ष व स्वतंत्र डॉक्टरांचे पॅनेल गठित करून ट्रम्प यांच्या मानसिक अवस्थेचे परीक्षण करून ते राष्ट्रपतिपदावर राहण्यास सक्षम आहेत काय याची तपासणी करावी असे मत नॉन्थे कार्टरेल व डी मॉसबाचेर या दोघांनी पुस्तकात नोंदिविले आहे. या दोघांनी तर एक मौलिक सूचना केली आहे, प्रत्येक राष्ट्रपती-उपराष्ट्रपती निवडणुकीपूर्वी निवडणुकीतील उमेदवाराच्या मानसिक स्थितीचे मूल्यांकन करण्यात यावे आणि निवडणूक झाल्यावर विजयी होणाऱ्या उमेदवाराचे म्हणजे राष्ट्रपतीची दरवर्षी मानसिक तपासणी करण्यात यावी.

**'मोस्ट डेअरिंग बुक' :** २०१७ मध्ये हे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांच्यासोबत काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांनी लपून छपून हे पुस्तक खरेदी करून ते वाचले होते अशी माहिती नंतर समोर आली तर वॉशिंग्टन पोस्ट या दैनिकाने या पुस्तकाचे वर्णन, द मोस्ट डेअरिंग बुक या शब्दात केले होते.

**शालीनता गमावली :** राष्ट्रपती ट्रम्प आपल्या दुसऱ्या कारकीर्दीत ज्याप्रकारे वागत आणि बोलत आहेत ते या पुस्तकातील प्रत्येक पृष्ठावर त्यांच्याबाबत नोंदविण्यात आलेले अभिप्राय किती नेमके व अचूक आहेत याची खात्री देणारे आहेत. ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्रपती झाल्यानंतर माजी राष्ट्रपतींची तैलचित्रे व्हाईट हाउसमध्ये लावण्यात आलीत. तेव्हा त्यांनी आपले पूर्ववर्ती राष्ट्रपती जोसेफ बायडेन यांचे तैलचित्र न लावण्याचा आदेश दिला. माजी राष्ट्रपती बराक ओबामा यांच्याबाबत आक्षेपार्ह व्हिडीओ तयार करून ते त्यांनी आपल्या समाज माध्यमावर टाकले.

**ताज्या घटना :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी एका वाहिनीला मुलाखत दिली. मुलाखत घेणाऱ्या महिला पत्रकारास ते म्हणतात, फार वर्षांपूर्वी आपली भेट झाली होती. तेव्हा तू संदर दिसत होतीस आणि आजही तेवढीच सुंदर दिसतेस. अमेरिकन चौकशी संस्था एफबीआयचे माजी प्रमुख रॉबर्ट मुल्लर यांचे नुकतेच निधन झाले. मुल्लर हे अतिशय प्रतिष्ठित व नावाजलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनावर ट्रम्प म्हणाले, 'गुड! आय ॲम ग्लॅड. ही इज डेड'.

**लिटल रॉकेट मॅन :** उत्तर कोरियाचे राष्ट्रपती किम जोंग यांचा उल्लेख लिटल रॉकेट मॅन असा करताना ट्रम्प म्हणतात, जोंग मला म्हातारा म्हणतात. पण, मी तर त्यांना जाड्या व बुटका म्हटलेले नाही.

**युद्धाचा विषय :** साऱ्या जगाला युद्धाच्या वणव्यात लोटल्यानंतर ट्रम्प म्हणतात, आम्ही इराणमध्ये कुणाशी चर्चा करावयाची? चर्चा करण्यासाठी कुणी शिल्लकच उरलेले नाही आणि २४ तासानंतर ते म्हणतात, आमची इराणशी चर्चा सुरू आहे. चर्चा फार चांगल्या प्रकारे सुरू आहे.

**पत्रकार ते पंतप्रधान :** पत्रकार असो की देश-विदेशांचे राष्ट्राध्यक्ष वा पंतप्रधान, कुणाबद्दलही ट्रम्प आदराने बोलावयास तयार नाहीत. प्रत्येकाशी ते धमकीच्या भाषेत बोलत आहेत. युक्रेनचे राष्ट्रपती झेलेन्स्की व्हाईट हाऊसमध्ये आले असताना, आपल्या ओव्हल कक्षात ट्रम्प ज्याप्रकारे वागले, त्याची चर्चा साऱ्या जगभर झाली. पण, आता ही एक सामान्य बाब झाली आहे . प्रत्येक राष्ट्राध्यक्ष वा पंतप्रधान यांच्याशी ते अशाच प्रकारे वागू लागले आहेत. त्यांच्या तावडीतून अमेरिकेची मित्र मानली जाणारी नाटो संघटनाही सुटलेली नाही.

**उपराष्ट्रपती अलिप्त :** अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यापासून उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी एकप्रकारे स्वत:ला अलिप्त ठेवले आहे. कारण, त्यांना इराणवर हल्ला करण्याचा हा निर्णय मान्य नव्हता. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हा निर्णय ट्रम्प यांच्या गळी उतरविला असे त्यांना वाटते. यानंतर व्हान्स व नेतान्याहू यांच्यात दूरध्वनीवर फार गरमागरमी झाली असे आता समोर आले आहे. व्हान्स यांची नजर २०२८ च्या राष्ट्रपती निवडणुकीवर स्थिरावली आहे. त्यातूनच त्यांनी इराण प्रकरणापसून स्वत:ला दूर ठेवले आहे. परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो हेही युद्धाच्या निर्णयावर फार खुश दिसत नाहीत. फक्त युद्धमंत्री पीट हेगसेथ हे मात्र युद्धाच्या बाजूने असल्याचे दिसते.

**'ती'वेळ येणार... :** राष्ट्रपती ट्रम्प यांच्या चार वर्षांच्या कार्यकाळापैकी फक्त १४ महिने सरले आहेत. उर्वरित ३४ महिन्यांत ते कुणाकुणाशी युद्ध करणार हा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. त्यांना क्युबा हवा आहे, त्यांना ग्रीनलॅण्ड देश हवा आहे, त्यांना पनामा कालवा हवा आहे. ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकेतील जनमानस क्षुब्ध झाले असल्याचे दिसते. ट्रम्प असेच वागत राहिल्यास, मानसिक आजाराच्या कारणाखाली त्यांना पदावरून हटविले जाईल काय? अमेरिकेच्या काही राष्ट्रपतींना वेगवेगळ्या घोटाळ्यात राजीनामा द्यावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत. पण, मानसिक आजारासाठी आजवर कुणालाही राजीनामा द्यावा लागलेला नाही. ट्रम्प हे तसे पहिले राष्ट्रपती ठरतील काय? स्वत:लाच सुरुंग लावण्याचा त्यांचा 'गुण' हे घडवील काय? या प्रश्नांची उत्तरे ट्रम्पच देणार आहेत.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# उन्हाळ्यात पाणी पेटते पावसाळ्यात मात्र विझते!

जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत करतं पाणी, जीवनाच्या काठावर शेवटचं आचमन असतं पाणी. एवढा मौल्यवान प्रश्न असूनही तो नेहमीच उन्हाळ्यात पेटतो, पण पावसाळा येताच विझतो. या पद्धतीने पाणी प्रश्न कधीच सुटणार नाही. उलट त्यात गुंता वाढेल अन् भविष्यात शेकडो लोकांना तडफडून कदाचित मारेलही. सरकारने जलस्तर वाढावा म्हणून प्रत्येक नवीन इमारतीवर पाण्याचे पुनर्भरण करण्याची सक्ती केली आहे. ती सक्ती सर्वच इमारतींसह घरांवर करायला हवी. पाण्याचा जमिनीतून वाढत असलेला उपसा गंभीर विषय आहे. बँकेतील खात्यात जेवढी रक्कम असते त्यातील काही पैसे तसेच ठेवून उर्वरित काढावे लागतात. अन्यथा बँक दंड आकारते. निसर्गाचीही वॉटर बँक आहे. तिचेही काही नियम आहेत. जर आपण बँकेतील नियम पाळतो, तर निसर्गाने ठरविलेला दंडक का टाळतो, याचे उत्तर पाण्याची नासाडी करणाऱ्यांना तडफडत का असेना द्यावे लागेल. कारण निसर्गाचे कोर्ट खूप कठोर आहे. ते माणूस ऐकत नसल्यास कुठल्याही क्षणी त्सुनामी आणू शकते. त्यातून वाचण्यासाठी वशिलेबाजी चालत नाही. तिथे तारीख मिळत नाही, उलट थेट शिक्षा हेच ठरलेले असते.

अशा कठोर कोर्टाच्या देखरेखीखाली आपण वावरत असतानाही पाण्याची नासाडी करतो, ही बाब समजून टाळायला हवी. 'उदक तारक उदक मारक । उदक नानासौख्यदायक । उदकाचा विवेक अलौकिक आहे ॥' असे समर्थ रामदास स्वामी यांनी दासबोधात म्हटले आहे. त्यानुसार आपण काहीही करायला तयार नाही. नागपूर शहरात २०१८-२०१९ मध्ये पाणीबाणी निर्माण झाली होती. पहिल्यांदा पेंच प्रकल्प येथील कुंवारा भिवसेन जलाशयातील डेड स्टॉकचे पाणी नागपुरातील जनतेसाठी सोडण्यात आले होते. अशीच अवस्था महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर, संभाजीनगर, अमरावती, जळगाव, मनमाड, अकोला, वाशीम, चंद्रपूर यासह प्रत्येक शहरांतील आहे. वाढते शहरीकरण, पाण्याची नासाडी यामुळे पुढील काळात पाणी हाच मुद्दा लोकांसाठी रक्तदाब वाढविणारा ठरेल. यावर उपाय म्हणून आता घराघरात काम करणाऱ्या महिला कामगारांना पाण्याचे महत्त्व पटवून द्यायला हवे. कमीत कमी पाण्यात धुणी-भांडी कशी पूर्ण करायची याचे तंत्र त्यांना समजावून सांगायला हवे. नळ सुरू ठेवायचा आणि तासन्तास धुणी भांडी करायची हे प्रकार टाळायला हवेत. आज घरोघरी पाण्याची नासाडी सुरू आहे. विशेष म्हणजे एखाद्याने यावर विचार मांडले तर त्याला शत्रू मानले जाते किंवा राजकारण आणून पाणी वाचविण्यासाठी निघालेल्या व्यक्तीला गोत्यात आणले जाते. परिणामी तो स्वत:च कसे या संकटातून वाचायचे याचेच तंत्र समजून पाणी बचतीचा मंत्र बासनात गुंडाळून ठेवतो. आपल्या देशात नाल्यांद्वारे वाहत जाणाऱ्या सांडपाण्याचा पुर्नवापर वाढायला हवा. पूर्वी उन्हाळा येताच गावागावात टँकरद्वारे पाणी द्यावे लागायचे. त्यात आता घट झाली आहे. याकरिता जलस्वराज्य आणि मागेल त्याला शेततळे या योजना फलदायी ठरल्या आहेत. जेवढे पाणी जमिनीत जिरेल तेवढाच जलस्तर उंचावेल अन् उन्हाळ्यातही ते आपल्याला मुबलक प्रमाणात मिळेल. आजचा दिवस चांगला आहे. उद्याचाही दिवस चांगला करायचा असेल तर उन्हाळ्यात पेटणारा पाण्याचा प्रश्न पावसाळ्यात विझू न देता तेव्हाच पडणारा प्रत्येक थेंब जमिनीत कसा जिरेल यावर भर द्यायला हवा. याचा शुभारंभ प्रत्येकाने स्वत:पासून करायला हवा.

पाणी कधीच शिळे होत नसते. मात्र दररोज सकाळी घराघरांत एक दिवसांपूर्वी भरलेले पाणी दुसऱ्या दिवशी संडासात ओतले जाते. जे पाणी शिळे होत नाही, ते फेकण्याची गरज काय? भरपूर शिकलेल्या महिला आणि पुरुष ही कृती करतात. त्यांना पाहून मनात राग निर्माण होतो अन् डोळ्यात अश्रू येतात. पण हाती काहीच अधिकार नसल्याने गप्प बसावे लागते. विशेष म्हणजे शासनातर्फे पाणी बचत व्हावी याकरिता योजना तयार केल्या जातात. त्यांचा भरणा ग्रामीण भागावर अधिक असतो. मग शहरातील लोकांनी पाण्याची नासाडी करायची की काय, असाही त्यातून अर्थ काढावा का? पाणी बचतीची योजना आणायची असल्यास ती सरसकट सर्वांना लागू करायला हवी. ग्रामीण भागातील लोक सांडपाण्याचा उपयोग परसबागेत करून सकस आहार मिळवितात. शहरातील लोक नाल्याद्वारे ते पाणी सोडून आम्ही पुढारलेले असल्याचा आव आणतात. मग त्यांनी सदुपयोग करायचा आणि यांनी दुरुपयोग असा प्रकार आपणही किती दिवस खपवून घ्यायला हवा. शेवटी, आस धरा, कास धरा, पाणी बचतीचा आजपासून ध्यास धरा...! अन्यथा रणरणत्या उन्हात पाणी मिळविण्यासाठी तयार राहा.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# भय इथले संपत नाही

टीसीएस नाशिक या कंपनीमध्ये झालेल्या प्रकाराला आता एक नवीन नाव मिळालेले आहे ते म्हणजे "कॉर्पोरेट जिहाद." काही वर्षांपूर्वी जिहाद म्हणजे काय, त्याचा अर्थ काय, असे जर सर्वसामान्य हिंदू व्यक्तीला कोणी विचारले असते, तर त्याला याचा अर्थ बोध झाला नसता. हा शब्द सर्वाधिक 'लव्ह जिहाद'मुळे प्रचलित झाला. ज्या वेळेला इस्लामचे भारतामध्ये आक्रमण झाले, त्यावेळेला गावेच्या गावे धर्मांतरित करण्यात आली. युद्धामध्ये पराभूत झालेल्या सैनिकांना धर्मांतरित करण्यात आले. त्यांच्या महिलांना सैनिक आणि सरदारांमध्ये आपसात वाटून घेणे हीच त्यांची धर्म आज्ञा होती; त्यामुळे तसेच झाले. काही शतके हे अत्याचार सुरू होते. पुढे परिस्थिती पालटली, बादशहांच्या बादशाह्या उलथवल्या गेल्या आणि त्यानंतर हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. जिहाद्यांना व त्यांच्या कारवायांना लगाम बसला. पुढे इंग्रज आले, त्यांनी पण आपले धर्मांतरणाचे प्रयत्न शांती आणि सेवेच्या माध्यमातून सुरूच ठेवले. देश स्वतंत्र झाल्यावर संविधानाचे राज्य आले; त्यामुळे असे सर्व प्रयत्न संपतील असे वाटले, परंतु जिहादी मानसिकतेपुढे कायदे तकलादू आणि कुचकामी ठरले का असा प्रश्न पडतो.

कधी दहशतीच्या माध्यमातून, तर कधी प्रलोभनाच्या माध्यमातून, कधी प्रेमाच्या जाळ्यात अडकवून, तर कधी बहुसंख्येचा दबाव तयार करून, धर्मांतरणाचे हे प्रयत्न भारतामध्ये अनेक वर्षांपासून सुरू आहेत. बरेचदा यांच्या या सर्व प्रयत्नांचा बळी प्रामुख्याने महिला राहिलेल्या आहेत. परंतु आपली बदनामी होईल या भीतीने अनेक वेळा महिला तक्रार करायला समोर येत नाहीत, कारण त्यांना माहीत असते की आपली न्यायव्यवस्था आणि प्रशासन यांच्या भरवशावर आपण हे पाऊल उचलू शकत नाही. एखादा खटला किती वर्ष चालेल, त्यामध्ये किती वर्षे आपल्याला न्यायालयाचे हेलपाटे घालावे लागतील, या दरम्यान आरोपींकडून आपल्या जीवाला धोका होण्याचा संभव हा नेहमीच कायम राहील; त्यामुळे शक्यतो त्या तक्रार देत नाहीत.

मागे उत्तर प्रदेशमध्ये एका जिम ट्रेनरकडून अशा पद्धतीचा जो प्रयत्न झाला होता, त्यामध्ये बळी असलेल्या ५५ महिलांपैकी फक्त एक महिला तक्रार द्यायला समोर आली. यातून आपल्याला परिस्थितीची जाणीव होऊ शकते. २०२६ मध्ये समाजाची जर ही मानसिकता असेल, त्यांच्या मनामध्ये कायद्याबद्दल विश्वास नसेल, तर अजून खूप काम करणे बाकी आहे असे आपल्या लक्षात येते.

आज हजारो कंपन्यांमध्ये महिला या विविध निमित्ताने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे काम करीत असतात. अनेक वेळा सोबत काम करणाऱ्या लोकांकडून, ठेकेदाराकडून, कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून शोषणाचे अनेक प्रकार घडत असतात, परंतु त्याला धार्मिक किनार नसते. शोषण करणारा तिच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मध्ये येत नाही, तिच्या देवी-देवतांना काही बोलत नाही; त्यामुळे समाजामध्ये एखादी व्यक्ती वाईट आहे एवढीच भावना निर्माण होते. परंतु या प्रकरणांमध्ये मात्र टीसीएससारख्या नामांकित कंपनीत हा प्रकार व्हावा, हे रतन टाटांच्या आत्म्याला सुद्धा दुःखदायकच वाटत असेल. ज्या टाटा समूहाने इतकी मोठी प्रतिष्ठा कमावलेली आहे, त्यांच्याच कंपनीमध्ये असे प्रकार होणे ही संपूर्ण समूहाकरिता लाजिरवाणी गोष्ट आहे. इतरही कंपन्यांनी यापासून धडा घेण्याची आवश्यकता आहे. त्यांनी बनविलेल्या समित्या या कुचकामी ठरत असेल, तर त्यांची सिस्टिम म्हणजे व्यवस्था बरोबर नाही हे लक्षात येईल. कंपनीमध्ये घडणाऱ्या अशा गोष्टींना शोधणे, पीडितांना न्याय देणे हे जर काम कंपनी व्यवस्थापन करू शकत नसेल, तर ते आकाशात उडण्याचे व चंद्रावर जाण्याचे स्वतःचे स्वप्नही ते साकार करू शकणार नाहीत; हेही तेवढेच खरे आहे.

एका विदेशी प्रसिद्ध वृत्तवाहिनीने नेहमीप्रमाणे बातमीचा रंग पूर्णपणे बदलून वृत्त दिलेले आहे. त्यांनी पीडित लोकांच्या नातेवाईकांचे किंवा कंपनीतील इतर कर्मचाऱ्यांचे अभिप्राय सांगितलेले नाहीत, तर आरोपीच्या बायकोचा अभिप्राय सांगितलेला आहे. पीडितांची बाजू काय आहे हे सांगितलेले नाही, तर आरोपींचे वकील काय म्हणतात हे सांगितलेले आहे.

आज महाराष्ट्रातील आणि देशातील मानवाधिकार कार्यकर्ते व शनि मंदिरात आम्हाला प्रवेश मिळालाच पाहिजे, शबरीमलामध्ये आम्हाला प्रवेश मिळालाच पाहिजे अशा पद्धतीच्या गोष्टी आणि आंदोलन करणारे त्या प्रकरणावर चूप आहेत. पुरोगामी लोकांचे राजकीय नेते सुद्धा चूप आहेत. सर्वसामान्य जनतेने हे ओळखण्याची आवश्यकता आहे की मोठमोठी प्रतिष्ठित वृत्तपत्रे, टीव्ही वाहिन्या, ठरावीकच वेळी ओरडणारे नेते हे वास्तविकपणे हिंदू समाजाचे नेते नाहीत. यांच्या धार्मिक निष्ठा हिंदू धर्माबद्दल बिलकूल नाहीत. यांची नावं हिंदू जरी असली, तरी हिंदुत्व यांच्यात बिलकूल नाही. ते कोणत्याही पक्षाचे असो, परंतु हिंदुत्वाबद्दल कुचकामी पुळचट भूमिका घेणाऱ्या नेत्यांना जनतेने ओळखणे आणि हळूहळू त्यांना अस्ताकडे नेणे आवश्यक आहे.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे उघडकीस आलेला लैंगिक शोषणाचा प्रकार हा १०० टक्के लव्ह जिहादच आहे, असे म्हणावे लागेल. या प्रकरणात शेकडो मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्यांचे शोषण करणारा, त्यांचे बदनामी करणारे फोटो आणि व्हिडीओ काढणारा अयान अहमद व त्याच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केलेली आहे. हे सर्व एकाच धर्माचे आहेत, त्यावरून सुद्धा त्यांची धार्मिक मानसिकता आपल्या लक्षात येते. काँग्रेसच्या एका महिला नेत्याने म्हटले की याला धार्मिक रंग देण्यात येऊ नये.


टीसीएसमधील एक महिला चार वर्ष सर्व अत्याचार सहन करते. त्यांना समाजामध्ये कोणाला काही सांगावे असे वाटत नाही. स्वतःची बदनामी आणि नोकरी यामुळे कदाचित त्या असं करीत नसाव्या; परंतु समाजामध्ये अशा काही व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, संघटना नसाव्यात का, ज्यांच्याकडे अशा पीडित महिला स्वतःची आपबीती सांगून न्यायासाठी मदत मागू शकते याचा विचार समाजाने करणे आवश्यक आहे. अयान अहमदला कायदा जी शिक्षा करेल ती करेल, परंतु शेकडो मुलींना अशा पद्धतीचे लोक कसे काय फसवू शकतात याचाही विचार करणे गरजेचे आहे. घरातील संस्कार, शाळांमधील शिक्षण, सामाजिक प्रबोधन कमी पडत आहे याचेच हे लक्षण आहे. या दोन्ही प्रकरणांना घेऊन सामाजिक संस्था, कार्यकर्ते यांनी मुला-मुलींचे प्रबोधन करण्यासाठी शाळा, कंपनी इत्यादी ठिकाणी जाणे गरजेचे आहे. घटना घडत असतात, परंतु प्रत्येक वेळेस स्वतःला ठेच लागल्यावर शहाणे होणे हे काही बरोबर नाही; इतरांना लागलेल्या ठेचा बघून समाजाने शहाणे होणे गरजेचे असते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आयटी कंपन्यांतील कर्मचारी कपातीचा निर्णय चिंताजनक



अलिकडेच एका अमेरिकन आयटी कंपनीने तीस हजार कर्मचारी कमी करण्याचा निर्णय घेतला. ज्यात बारा हजार कर्मचाऱ्यांमध्ये भारतीयांचाही समावेश आहे. ही नामवंत कंपनी भरपूर नफा कमावत असल्याची आकडेवारी असूनही नोकर कपातीचा निर्णय का घेतला असावा असा प्रश्न निर्माण होतो. एखाद्या तोट्यात असलेल्या कंपनीने असे निर्णय घेणे योग्य ठरू शकते. परंतु प्रचंड नफा कमावत असलेल्या या आयटी कंपनीकडून कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड संगणन आणि डेटा सेंटर्स यासारख्या क्षेत्रात मोठी गुंतवणूक सुरू होती. यावरून तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप भयावह रूप धारण करत असल्याचे दिसून येते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित प्रणालीमुळे अनेक क्षेत्रांतील कामांचा वेग वाढत चालला आहे. त्याचबरोबर ही कामे कमी लोकांच्या मदतीने अधिक वेगाने व अचूकपणे केली जाऊ शकतात. असाही अनुभव अनेक आयटी कंपन्यांना येत आहे. पूर्वीच्या काळी ज्या कामासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ खर्ची पडत असे त्याऐवजी आता मोजक्या लोकांच्या साहाय्याने कामे पूर्ण केली जात आहेत. परिणामी मोठमोठ्या कंपन्यांना अवाढव्य खर्च कमी करून त्यांना कार्यक्षमतेकडे वळवले जात आहे. आयटी कंपन्यांमध्ये होत असलेला हा मानसिक बदल यापुढील काळात केवळ रोजगारापुरता मर्यादित राहणार नाही. तर त्याचे मोठे पडसाद आपल्या सामाजिक जीवनातही उमटतील असे दिसत आहे. कारण नोकऱ्या कमी झाल्यामुळे बेरोजगारांच्या आयुष्यात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होऊ शकते. शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करूनही मोठ्या आयटी कंपन्यांमध्ये नोकऱ्यांची संधी नसेल तर लोकांचा शिक्षणावरचा विश्वासच डळमळीत होऊ शकतो. नोकऱ्या नसल्यामुळे बेरोजगार तरुणांचे वैवाहिक जीवनही लांबणीवर पडत जाऊ शकते किंवा अडचणीत येऊ शकते. आपल्या वृद्ध पालकांची काळजी घेण्याचा मार्ग शोधण्यातच तरुणाईची ऊर्जा संपुष्टात येणार आहे काय, असाही प्रश्न निर्माण होतो. पूर्वीच्या पिढ्यांमध्ये आयुष्यभर एकच नोकरी करण्याचा ट्रेंड किंवा कल होता. आजच्या काळात ठरावीक वर्षानंतर नोकऱ्या आणि कंपन्या बदलत जाण्याचा ट्रेंड प्रचलित आहे. त्यामुळे धावपळीच्या किंवा धकाधकीच्या जीवनातील अनिश्चितता वाढीस लागली आहे. आजच्या काळात समाजाने नवनव्या समस्यांना तोंड देण्याची तयारी दाखवली पाहिजे. मोठ्या कंपन्या पूर्वसूचना न देता नोकऱ्या कमी करीत सुटलेल्या असताना तसेच यामुळे तरुण नोकरदारांचा आर्थिक आधार हिरावत चालल्याने सरकारपुढेही नवे प्रश्न निर्माण होत आहेत. यावर ठोस उपाययोजना करणे काळाची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

● ● ● ●

### शरद पवारांना झालेला साक्षात्कार

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी वारीविषयी केलेले वक्तव्य सध्या फारच वादग्रस्त झाले आहे. 'वारीत 'प्रतिगामी' लोकांचा शिरकाव झाला आहे' असे ते म्हणाले. याचा अर्थ असा होतो की, शिरकाव झालेले असे तथाकथित प्रतिगामी सोडून सारे वारकरी आधीपासूनच पुरोगामी आहेत, आणि हे शरद पवार यांना मान्य आहे. "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥" हा संत तुकाराम महाराजांचा अभंग मानवी समतेचा आणि विश्वबंधुत्वाचा पाया आहे.

प्रतिगामी आणि पुरोगामी या शब्दांचे अर्थ स्पष्ट व्हायला हवेत. अन्यथा कालपर्यंत प्रतिगामी वाटणारे वारकरी अचानक साक्षात्कार झाल्यासारखे पुरोगामी वाटायला लागले आहेत. मला वाटते, "ज्याने भेदाभेदांचे जोखड झुगारून दिले आहे आणि जो सर्वांना समानतेची वागणूक देतो तो पुरोगामी" अशी सुटसुटीत व्याख्या जर केली तर, आता वारीत असे कोण लोक घुसले आहेत की, ज्यांना समानता नको आहे आणि भेदाभेद आणायचा आहे?

शरद पवार यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी वारीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेऊन अशा सर्वांचा शोध घ्यावा व त्यांना वारीबाहेर काढावे. म्हणजे खऱ्या पुरोगामी वारकऱ्यांना आपली वारी संतांच्या सांगण्याप्रमाणे करता येईल. वारीमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेणारा कोणीही सांगेल की, त्याला वारीत कोठेही भेदभाव दिसत नाही, शिवाशिव दिसत नाही. सर्व वारकरी वारीत एकत्र राहतात, एकत्र जेवतात, एकत्र झोपतात. कोणासाठीही कोठेही वेगळी व्यवस्था नसते. कोणाला कोणाचा कधी विटाळ होत नाही. मग असे प्रतिगामी दिसले तरी कुठे? उगाच लोकांची दिशाभूल करायची, प्रत्यक्ष परिस्थितीच्या विपरीत काहीतरी बडबडायचे आणि नवीन वादंग निर्माण करायचे हा काही लोकांचा धंदाच होऊन गेला आहे. परंतु आता सगळा हिंदू जागा झाला आहे. तो अशा भूलथापांना कधीही बळी पडणार नाही. असा कोणी तथाकथित 'प्रतिगामी' वारीत घुसलाच तर त्याला सुद्धा हे पुरोगामी वारकरी सामावून घेतील व आपल्या सारखा 'पुरोगामी' करून टाकतील याविषयी काही शंकाच नाही.

**सुहास कुलकर्णी**/पिंपरी पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महत्वाचे...

### खून प्रकरणी दोघांना उच्च न्यायालयात जामीन

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

घटना पूर्व नियोजित नाही क्षणार्धात घडलेली आहे असे मत व्यक्त करून चिंचोली एमआयडीसी मध्ये घडलेल्या खुनाच्या प्रकरणात आरोपींचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाने मंजूर केला. आरोपी हे चिंचोली एमआयडीसी येथील एका कारखान्यात कामास होते. पाण्याच्या हौदाजवळ आंघोळ करण्याच्या किरकोळ कारणावरून आरोपी पंकज सिंग व मयत गुलशन कुमार यांच्यामध्ये भांडण झाले व या भांडणात आरोपी पंकज सिंग व बलराम पंडित यांनी लाकडाने गुलशन कुमार यांच्या डोक्यात मारहाण करून त्याचा खून केला, या आरोपावरून पोलिसांनी आरोपींना अटक करून न्यायालयात दोषारोप पत्रक दाखल केले होते. यातील आरोपी पंकज सिंग व बलराम पंडित यांचा जामीन अर्ज सोलापूर सत्र न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर आरोपींनी कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. या जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्यासमोर झाली. उच्च न्यायालयात जामीन अर्जाचे सुनावणी वेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तीवादामध्ये घटना पूर्व नियोजित नाही क्षणार्धात घडलेली आहे. केसचा तपास पूर्ण झाला आहे असा युक्तिवाद केला. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्तींनी आरोपी पंकज सिंग व बलराम पंडित यांची जामिनावर मुक्तता केली. या प्रकरणी आरोपींतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. ए. एस. साळगावकर यांनी काम पाहिले.



### रस्त्यावर विटा ठेवल्याच्या कारणावरून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

राहत्या घराजवळ बांधकामाच्या विटा ठेऊन रस्ता अडविल्याच्या कारणातून शेजारील तरुणाला विटाने, हाताने मारहाण केल्याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर वासु फुलारी, प्रकाश वासु फुलारी आणि रत्ना वासु फुलारी (रा. थोरली इरण्णा वस्ती, सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत उमेश सुरेश भंडारे ( वय ३६ वर्षे, रा. थोरली इरण्णा वस्ती, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या राहत्या घराजवळ बांधकाम करण्याच्या विटा आणून ठेवण्यात आल्या होत्या .यावरून झालेल्या वादात वरील आरोपींनी फिर्यादीला १२ एप्रिल रोजी वीट व हाताने मारहाण केली . यावेळी लक्ष्मी जंगेकर हिला तु आमच्या भांडणामध्ये का आली असे म्हणून विटावर जोरात ढकलुन दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .पोलीस नाईक चौधरी हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### गोठ्यात बांधलेल्या गायीची चोरी

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

गोठ्यात बांधलेली ४० हजार रुपये किमतीची खिलार जातीची गाय अज्ञाताने चोरून नेल्याची घटना १३ एप्रिल रोजी पहाटे उघडकीस आली . दरम्यान याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अब्बासअली मोहम्मदअली यादगीर (वय ३४, रा. समाधान नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीने त्यांच्या घरासमोरील गोठ्यात निम्मी प्रमाणे १२ एप्रिल रोजी गाय बांधून ठेवली असता अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीनंतर अज्ञात वेळी सदरची गाय फिर्यादीच्या नकळत चोरून नेली .ही चोरीची घटना पहाटे पाच वाजता फिर्यादीच्या निदर्शनास पडली . पोलीस हवालदार उबाळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

भर वेगात दुचाकी चालवत समोरील दुचाकीला धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका दुचाकीस्वाराविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .काशिनाथ बाबु सुतार असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत मयत इसमाचा मुलगा प्रसाद युवराज इंगळे (वय २८ वर्षे, रा. मु.पो. हजारे गल्ली, ता. मंगळवेढा ) यांनी फिर्याद दिली आहे . यातील फिर्यादीचे वडील युवराज इंगळे ( वय ५५ वर्ष ) हे सागर पेट्रोल पंपासमोरून दुचाकी वरून जाताना पाठीमागून आरोपीच्या दुचाकीने पाठीमागून जोराची धडक दिली होती . हा अपघात १२ एप्रिल रोजी घडला होता. जखमी झाल्याने युवराज इंगळे यांचा मृत्यू झाला . वडिलांच्या मृत्यूस दुचाकी स्वार काशिनाथ सुतार हा कारणीभूत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . फौजदार सुरज कुतवळ हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### कोल्ड्रिंक्स असल्याचे सांगून मित्राला पाजले लिक्विड

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

कोल्ड्रिंक्स आहे असे सांगून एका ९ वर्षाच्या मुलाला आला लिक्विड पाजल्याची घटना लष्कर भागात आज रविवारी दुपारी दोन वाजता घडली. रुद्र सागर मनसावाले ( वय ९ वर्ष , राहणार मुर्गीनाला, लष्कर सोलापूर ) असे त्या मुलाचे नाव असून तो आज रविवारी दुपारी घराजवळ खेळत असताना चेष्टा मस्करी मध्ये शुभम मनसावाले व इतर दोघा तिघांनी मिळून त्याला स्टिंग कोल्ड्रिंक्स असल्याचे सांगून आला नावाचे लिक्विड पाजले . याचा त्रास होऊ लागल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात आई ज्योती यांनी दुपारी दाखल केले.

### कमी दरात आंबे का विकतो म्हणून विक्रेत्याला मारहाण


**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

आंबे कमी दरात विकण्याच्या कारणावरून एका विक्रेत्याला लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना बाळीवेस येथील गणपती मंदिराजवळ शनिवारी सायंकाळी घडली . वसीम मलंग बागवान ( वय ४० वर्ष , राहणार बेगम पेठ , सोलापूर ) असे मारहाण झालेल्या त्या आंबे विक्रेत्यांचे नाव असून तो शनिवारी सायंकाळी बाळीवेस येथे आंबे विक्री करीत थांबला असताना त्याला आरिफ रफिक बागवान व इतर तिघा जणांनी मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने तो उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी स्वतः दाखल झाला .

# बार्शीत महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात; शिव-बसव मिरवणुकीने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १९ एप्रिल -**

थोर समाजसुधारक व लिंगायत धर्माचे संस्थापक महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती बार्शी शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मित्रप्रेम युवा ग्रुप व सकल लिंगायत समाज, बार्शी यांच्यावतीने महात्मा बसवेश्वर जयंती तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मूर्तिपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, लिंगायत बोर्डिंग ट्रस्टी रावसाहेब मनगिरे, भाऊसाहेब आंधळकर, विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब आडके, ॲड. वासुदेव ढगे, माजी नगरसेवक प्रशांत कथले, नगरसेवक नवनाथ माळगे, मुजम्मील पठाण, अजय भानवसे, प्रशांत जाधव,आर्यन पाचपुते,ॲड. माणिक धारुरकर, ॲड. संजय साखरे, कौस्तुभ पेटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



सायंकाळी पाच वाजता आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते शिव-बसव मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जगतज्योती महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास हभप शिवलीला पाटील, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, निरंजन भूमकर, युवराज काटे, गणेश जाधव, योगेश सोपल,बाळासाहेब आडके, राजाभाऊ रसाळ, नागजी नान्नजकर, उद्योजक कौस्तुभ पेटकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

मिरवणुकीच्या सुरुवातीला घोड्यावर स्वार छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या वेशभूषेत साकारलेले कलाकार आणि मावळ्यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. तसेच भगवान शिव शंकराचे 'महाकाल दर्शन' व 'महाकाल लीला' सादर करणाऱ्या पथकाने विशेष आकर्षण निर्माण केले.

याशिवाय दक्षिण भारतातील प्रसिद्ध बोलक्या बाहुल्यांचे पथक, वारकरी विद्यार्थिनींचे टाळ-मृदंग पथक, धनगरी गजाढोल, लेझीम पथक तसेच बँड पथकांनी मिरवणुकीत रंगत आणत बार्शीकरांचे लक्ष वेधून घेतले.

दरम्यान, सोमवार दि. २० एप्रिल रोजी मध्यवर्ती शिव-बसव जयंती उत्सव समितीच्यावतीने माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते आणखी एका भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी मित्रप्रेम युवा मंडळाचे शशिकांत दसंगे, विठ्ठल गुडे, प्रवीण गाढवे, प्रफुल्ल केसकर, गणेश निंबर्गी, अनिल चाबुकस्वार, जालिंदर देवकर, आण्णा घोटाळे, कल्पित आगळे, संकेत बेणे, केदार वाघुले, विशाल गाढवे, मनोज मुलगे, गणेश पुराणिक, आशिष वाकडे, संतोष शिराळ, बाळासाहेब मुंबरे, नागेश कारंजकर, रवींद्र केसकर, गोपाळ साखरे, पंकज लकशेट्टी आदींनी परिश्रम घेतले.

## भोंदूगिरीच्या विरोधातील लोकांना संपवण्यात आले : प्रा. डॉ. बेळंबे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल -**

१२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाजातील कर्मकांडातील भोंदूगिरी उघड करत देवाला म्हणजे ईस्टलिंगाला आपल्या हातात दिले. ज्या ज्या संतांनी भोंदूगिरीला विरोध केला त्यांना त्याकाळच्या प्रचलित समाजव्यवस्था व्यवस्थेकडून संपविण्यात आले असे प्रतिपादन प्रा. डॉ. गणेश बेळंबे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनच्यावतीने आयोजित केलेल्या बसव व्याख्यानमालेचे समारोपाचे पुष्प गुंफताना बेळंबे बोलत होते. 'ऐसे कैसे झाले भोंदू' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा परिषदेचे अर्थ व पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेट्टी, माजी नगरसेवक गुरशांत धुत्तरगावकर, भाजपा जिल्हा सदस्य जगन्नाथ गायकवाड, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार उपस्थित होते.

यावेळी प्रा. भीमाशंकर बिराजदार, प्रा संगमेश्वर नीला, प्रा शिवराज बिरादार, आनंद दुलंगे, संजय साखरे, सोमेश्वर याबाजी, नागेश बडदाळ, राजेश नीला, मनोज पाटील आदी उपस्थित होते.



### कर्माचे श्रेष्ठत्व सांगणारे बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

कर्माचे श्रेष्ठत्व सांगणारे आणि वीरशैव धर्माचे पुनरूज्जीवन करणारी थोर विभुती म्हणून विश्वविख्यात झालेले संत बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त कौंतम चौक येथील पूर्णाकृती पुतळ्यास राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते सुधीर व उद्योजक खरटमल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना खरटमल म्हणाले की, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांनी मंगळवेढा येथे तब्बल ३१ वर्षे वास्तव्य केले होते. बसवेश्वरांनी मंगळवेढ्यातूनच लिंगायत धर्माची स्थापना केली आणि धर्मप्रसारासाठी श्रवणबेळगोळा, बसवकल्याण या कर्नाटकातील प्रदेशांत गेले होते. लिंगायत समाज बसवेश्वरांना शिववाहन नंदीचा अवतार मानतात. बसव, बसवाण्णा, बसवराय अशा नावांनी ते प्रसिद्ध होते. भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष म्हणून संत बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते. सदरप्रसंगी सुरेश कुंभार, विठ्ठल व्हनमारे, सूर्यकांत शेरखाने, प्रा.राहुल बोळकोटे, सुनील इंगळे, पुरुषोत्तम श्रीगादी, बळीराम एडके, रामप्रसाद शागालोलू, ज्ञानेश्वर सोनवणे, द्वारकादास तावनीया, सोपान थोरात व शक्ती कटकधोंड आदी उपस्थित होते.

## भिगवण रेल्वे स्थानकावर आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्य व कल्याणाप्रती आपली कटिबद्धता कायम राखत, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने भिगवण रेल्वे स्थानकावर आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन केले.

शिबिरात विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा पुरवण्यात आल्या; यामध्ये सामान्य आरोग्य तपासणी, उंची-वजन व रक्तदाब मोजणी, ईसीजी तपासणी, रक्त नमुने संकलन, क्षयरोग तपासणी आणि मोफत औषध वाटप यांचा




समावेश होता. शिबिरादरम्यान अनेक आरोग्यविषयक समस्यांचे निदान झाले, ज्यामुळे संबंधित व्यक्तींना वेळीच वैद्यकीय उपचार आणि पुढील उपचारांची (फॉलो-अप) सुविधा उपलब्ध झाली. या शिबिरात १३१ व्यक्तींनी सहभाग नोंदवला; यामध्ये १०१ कर्मचारी आणि ३० कुटुंब सदस्यांचा समावेश होता. या शिबिरात आरोग्य शिक्षण आणि समुपदेशन सत्रांवर विशेष भर देण्यात आला. या सत्रांमध्ये गर्भधारणेपूर्वीचे समुपदेशन, गर्भनिरोधकाच्या तात्पुरत्या व कायमस्वरूपी पद्धती, गर्भाशय मुखाचा व स्तनांचा कर्करोग - प्रतिबंध आणि लवकर निदान, स्तनांची स्वयं-तपासणी तंत्रे, बालकांचे लसीकरण, क्ष्मत लसीकरणाबाबत जागृती, निमिया (रक्तक्षय) प्रतिबंध आणि संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व यांसारख्या विषयांचा समावेश होता. सोलापूर विभागाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक, डॉ. मंजुनाथ जी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. कृष्णा चांदक, फिजिशियन डॉ. सतीश बाबू, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. देवीलाल चव्हाण, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. रतन मेकाला आणि डॉ. सूर्य तेजा यांचा समावेश होता.



### अपघातग्रस्त कुटुंबाला धनश्री परिवाराचा आधार

**मंगळवेढा, १९ एप्रिल-**

मौजे आसबेवाडी गावातील कै.नारायण रतिलाल आसबे व कै.उमेश गमन खटकाळे यांचे मागील आठवड्यात मंगळवेढा मरवडे रोडवरील लक्ष्मी मंदिरा समोर झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी निधन झाले.

कै.आसबे यांची कन्या अधिरा आणि कै. कटकळे यांचा मुलगा आदर्श यांच्या नावावर प्रत्येकी दहा हजार रुपये इतकी दाम दुप्पट ठेव पावती धनश्री पतसंस्था येथे करण्यात आली. यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी मदत होणार आहे. या अनपेक्षित घटनेमुळे त्यांच्या कुटुंबाला धनश्री,सिताराम व आष्टी परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांच्याकडून या दोन्ही कुटुंबांची सांत्वनपर भेट घेतली. घरातील कर्ते पुरुष अचानक निघून गेल्याने कुटुंबीयांवर मोठा मानसिक आणि आर्थिक आघात झाला आहे. या ठेव पावत्या संस्थेचे संचालक यादाप्पा माळी व व्हा. चेअरमन श्रीशैल्य धायगुंडे यांच्या हस्ते कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी रतिलाल आसबे,महेश खटकाळे,तानाजी मोरे, राजेश गवळी, राजाराम आसबे आदी उपस्थित होते.

Classifieds

**विकणे आहे**

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.
मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## माढा नगरपंचायत, माढा

**ई-निविदा प्रसिध्दीकरण सुचना क्रं. MCMADHA/03/2024**

**जा.क्र.बांध/५५४/२०२६ दिनांक १७/०७/२०२६**

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत अ.क्र ०१ ते ०४ हाती घेण्यात आलेल्या विकासकामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकोदार-अर्हता प्राप्त निविदाधारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण ०४ कामे आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. २०/०४/२०२६ ते दि. २७/०४/२०२६ पर्यंत सायं ०५ वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादींची माहिती http//mahatenders.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध आहेत.

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माढा नगरपंचायत**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**मंडई, कोंडवाडा व लायसन्स विभाग, प्रशासकीय इमारत, तिसरा मजला**
**ई-मेल mandaivibhag124@gmail.com**

**जा.क्र. मंडई/१३/२५ दिनांक :- १७/०४/२०२६**

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**मंडई विभाग**
**ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहीर प्रसिध्दीकरण**

सोलापूर शहरातील सोलापूर शहर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या शहरातील विविध मंडईमध्ये ओटे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ याचे कलम ७९ अन्वये व मालमत्ता हस्तांतर नियमास अधिन राहून खुले ओटे निश्चती तारखेपासून ११ महिने करिता ओटे भाड्याने देण्याकामी ऑफलाईन लिलाव प्रक्रिया पध्दतीने करण्याकामी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर दि. / /२०२६ पासून पाहणेस उपलब्ध आहेत.

**कामाचे नाव :-** शहर सोलापूर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या शहरातील विविध मंडईमधील ओटे फेर ऑफ लिलाव प्रक्रिया जाहीर प्रसिध्द करणेबाबत.

| अ.क्र. | मार्केटचे नाव | रिकामे ओट्यांची संख्या | १ ओट्याचे क्षेत्रफळ | १ ओट्यासाठी दरमहा भाडे |
|---|---|---|---|---|
| १ | कस्तुरबा मंडई | ७७ | ओटा (४ फुट X ४ फुट) | ४००/- |
| २ | मुर्गीनाला मंडई | ४९ | ओटा (४ फुट X ६ फुट) | ५००/- |
| ३ | जोडबसवण्णा मंडई | ८६ | ओटा (४ फुट X ४ फुट) | ४००/- |
| ४ | देगाव मंडई | ६१ | ओटा (४ फुट X ६ फुट) | ५००/- |
| ५ | राणी लक्ष्मीबाई मंडई | १९० | ओटा (४ फुट X ६ फुट) | ५००/- |
| ६ | मांस मंडई | ६९ | ओटा (४ फुट X ४ फुट) | ५००/- |

सदरचे फेर ऑफलाईन ऑक्शन लिलाव प्रक्रिया दि. ३०/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते ०६.०० वाजेपर्यंत घेण्यात येईल. सदर ऑफलाईन ऑक्शन करीता लागणारे कागदपत्राची छाननी व प्रवेश शुल्क भरण्याचे दि. २१/०४/२०२६ ते दि. २९/०४/२०२६ रोजीपर्यंत सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत करणेत येईल.

**टिप : ओटे लिलावामध्ये भाग घेण्यासाठी प्रवेश शुल्क रक्कम रु. ५००/- इतकी राहील**

सही/-
**नियंत्रण अधिकारी**
**मंडई, कोंडवाडा व लायसन्स विभाग**
**सोलापूर महानगरपलिका, सोलापूर**

## महाराष्ट्र महसूल व वन विभाग
## तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात

**संकलन अभिलेख कक्ष**

दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यू/कावि/६८७/२०२६ दि. १७/०४/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्रीम. जगदेवी मनोहर बनसोडे** **- अर्जदार**
रा. भिमनगर, अक्कलकोट, ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म-मृत्यू नोंदणी, कार्यालय** **- सामनेवाला**
**नगरपरिषद, अक्कलकोट, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील श्री. जगदेवी मनोहर बनसोडे यांनी त्यांचे आजोबा कै. मसणप्पा कासप्पा महार यांचा मृत्यू दि. ०१/०६/१९४१ रोजी मौजे अक्कलकोट, ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे. जगदेवी मनोहर बनसोडे यांनी त्यांच्या आजोबाच्या मृत्यूची नोंद करुन घेऊन मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २१/०८/२०२५ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आजोबाच्या नावे मसणप्पा कासप्पा महार यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. १७/०४/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

**सही/-**
**(विनायक सुधीर मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**






## महत्त्वाचे

### वरुण चक्रवर्ती घडविला इतिहास

**कोलकाता :** वरुण चक्रवर्तीने रविवारी टी-२० क्रिकेटमध्ये २०० बळींचा टप्पा गाठणारा सर्वात वेगवान भारतीय फिरकी गोलंदाज होऊन इतिहासाच्या पानांवर आपले नाव कोरले. हा ऐतिहासिक टप्पा ईडन गार्डन्सवर आपल्या कोलकाता नाईट रायडर्स व राजस्थान रॉयल्सदरम्यान झालेल्या आयपीएल सामन्यादरम्यान गाठला गेला. चक्रवर्तीने आपल्या पहिल्याच षटकात यश मिळविले. त्याने युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीला बाद केले. या बळीमुळे केकेआरला केवळ सामन्याच्या सुरुवातीलाच यश मिळाले नाही, तर टी-२० क्रिकेटमधील सर्व भारतीय फिरकी गोलंदाजांमध्ये सर्वात कमी डावांमध्ये २०० बळींचा टप्पा गाठण्याचा विक्रमही चक्रवर्तीच्या नावावर जमा झाला.चक्रवर्तीने पुढेही आपली उत्कृष्ट गोलंदाजी कायम ठेवली व १४ धावांत ३ बळी अशी प्रभावी कामगिरी नोंदविली. त्याने रियान पराग व यशस्वी जयस्वालला सुद्धा बाद करत राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजीची कंबरच मोडली.

### दक्षिण आफ्रिकेचा भारतीय महिला संघावर दुसरा विजय

**डर्बन :** ट्रायॉन व वॉल्व्हाड्‌र्टच्या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर दक्षिण आफ्रिका महिला संघाने भारतावर ८ गडी राखून सहज विजय नोंदविला. या विजयाबरोबरच दक्षिण आफ्रिकेने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० ची आघाडी घेतली. शेफाली वर्माच्या (५७) अर्धशतकी खेळीच्या बळावर भारताने २० षटकांत १४७ धावा उभारल्या. दक्षिण आफ्रिकेने १७.१ षटकांत २ गडी गमावित विजयाचे लक्ष्य गाठले. भारताला १४७ धावांवर रोखताना दक्षिण आफ्रिकेच्या तुमी सेखुखुने आणि क्लो ट्रायॉनने प्रत्येकी तीन गडी बाद केले, तर नॉनकुलुलेको म्लाबाने आपल्या चार षटकांत १७ धावा देऊन १ गडी बाद केला. विजयाचे लक्ष्य गाठताना लूसने ५७ धावांची, तर वॉल्व्हाड्‌र्टने ५४ धावांची खेळी केली. भारताकडून श्रेयांका पाटीलला ३५ धावांत २ बळी टिपण्यात यश मिळाले.२० हून अधिक धावांची वैयक्तिक खेळी करणाऱ्या केवळ दोन भारतीय फलंदाजांपैकी होत्या. पदार्पण करणारी अनुष्का शर्मा (२८ धावा) ही अशी कामगिरी करणारी दुसरी फलंदाज ठरली; तर दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी वेगवान व फिरकी या दोन्ही प्रकारांत भारताला जोरदार धक्के दिले.

### भारत, ऑस्ट्रेलियाचा प्रस्ताव रशीद खानने नाकारला

**नवी दिल्ली :** रशीद खानला भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही देशांकडून नागरिकत्व आणि क्रिकेट खेळण्याचे प्रस्ताव मिळाले होते, परंतु त्याने ते नाकारले. मी केवळ अफगाणिस्तानसाठीच खेळेल, असे म्हणत रशीद खानने इतर देशांचे प्रतिनिधित्व करण्याचे प्रस्ताव फेटाळून लावले. अफगाणिस्तानमधील परिस्थिती पाहता, भारतीय क्रिकेट



मंडळाच्या एका अधिकाऱ्याने रशीद खानला भारतीय कागदपत्रे (नागरिकत्व) आणि भारतात राहून क्रिकेट खेळण्याची संधी देऊ केली होती. रशीद खानची अफगाणिस्तानप्रती असलेली निष्ठा हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. यापूर्वीच्या सोशल मीडिया मोहिमा आणि सरकारी स्तरावरून मिळालेल्या सन्मानांतून ही निष्ठा स्पष्ट झाली आहे. अफगाणिस्तानचा लकी चार्म मानला जाणारा लेग-स्पिनर रशीद खान याला केवळ एकाच नव्हे, तर दोन देशांनी, ज्यामध्ये भारताचाही समावेश होता असे सोमवारी प्रकाशित होणाऱ्या रशीद खान : फ्रॉम स्ट्रीट्स टू स्टारडम या पुस्तकात नमूद केला आहे, असे लेखक मोहम्मद हांद जाफर यांना सांगितले आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही देशांनी त्याला अशा प्रकारचे प्रस्ताव दिले होते, जे त्याने नाकारले.

# कोलकात्याचा पहिला विजय

## वरुण चक्रवर्तीची प्रभावी गोलंदाजी, रिंकू सिंगची जबरदस्त फलंदाजी

**कोलकाता, १९ एप्रिल**

ईडन गार्डन्सवर रविवारी आयपीएल सामन्यात कार्तिक त्यागी व वरुण चक्रवर्तीने प्रभावी गोलंदाजी आणि रिंकू सिंग (५३) याच्यासह कॅमेरॉन ग्रीन, रोवमन पॉवेल व अनुकूल रॉयने जबरदस्त फलंदाजी करून कोलकाता नाईट रायडर्सला १९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात पहिला विजय मिळवून दिला. केकेआरने दोन चेंडू शिल्लक ठेवित राजस्थान रॉयल्सवर ४ गड्यांनी मात केली. केकेआरचा आतापर्यंतच्या सात सामन्यातील हा पहिला विजय आहे. या बरोबरच केकेआरने ३ गुणांसह गुणतालिकेत मुंबई इंडियन्सला खाली खेचत नववे स्थान मिळविले आहे. दुसऱ्या पराभवानंतरही राजस्थान ८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर कायम राहिला. १४ धावांत ३ बळी टिपणारा वरुण चक्रवर्ती सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.



**संघासाठी विजयी खेळी करताना रिंकू सिंग**
**नाबाद ५३**
**चेंडू ३४**
**चौकार ५**
**षट्कार २**

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार ईशान किशनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांना अपेक्षेनुसार फलंदाजी करता आली नाही. केकेआरच्या गोलंदाजांनी अचूक मारा करीत राजस्थानला मर्यादित २० षटकांत ९ बाद १५५ धावांवर रोखले. त्यामुळे केकेआरसमोर विजयासाठी १५६ धावांचे सोपे लक्ष्य राहिले व ते त्यांनी १९.४ षटकांत ६ बाद १६१ धावा काढून काढले.

यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशी या युवा सलामी जोडीने नेहमीप्रमाणे राजस्थान रॉयल्सला डावाची उत्तम सुरुवात करून दिली. या दोघांनी पहिल्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी केली. वरुण चक्रवर्तीने ही जमलेली जोडी फोडली. सूर्यवंशीने २८ चेंडूंत ६ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ४१ धावांचे योगदान दिले. नंतर वरुण चक्रवर्तीने जयस्वालला साथ देण्यास आलेल्या ध्रुव जुरेललही (५) लवकरच तंबूत परत पाठविले. यशस्वी जयस्वालने कर्णधार रियान परागच्या साथीने संघाला शंभर धावांच्या जवळपास आणले. याचवेळी सुनील नरेनने जयस्वालला आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकविले. जयस्वालने २९ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह ३९ धावांचे योगदान दिले. चार महत्त्वपूर्ण फलंदाज बाद झाल्यामुळे राजस्थान रॉयल्स दबावाखाली आला. तिकडे केकेआरच्या गोलंदाजांनी आपल्या आक्रमकतेची धार वाढविली, त्यामुळे राजस्थान रॉयल्सची नियमित अंतराने घसरगुंडी उडाली. रियान पराग (१२), शिमरॉन हेटमायर (१५) व रवींद्र जडेजाने (९) केकेआरच्या गोलंदाजांचा कसा-बसा सामना केला आणि राजस्थान रॉयल्सला २० षटकांत ९ बाद १५५ धावांचा टप्पा गाठून दिला.



सलामी जोडी फोडल्यानंतर सामनावीर वरुण चक्रवर्तीचे कौतुक करताना केकेआरचे खेळाडू

केकेआरकडून कार्तिक त्यागी व वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी ३ बळी, सुनील नरेनने २ बळी घेतले. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना केकेआरची त्रेधातिरपीट उडाली. राजस्थानच्या गोलंदाजांनी पहिल्या दोन षटकांतच टिम सेफर्ट व अजिंक्य रहाणे या सलामी जोडीला भोपळा फोडण्याआधीच तंबूत परत पाठविले. मात्र त्यानंतर कॅमेरॉन ग्रीन (२७), अंगकृश रघुवंशी (१०) व रोवमन पॉवेलने (२३) छोट्या-छोट्या भागीदारी करीत केकेआरचा डाव सावरण्याचा चांगला प्रयत्न केला. पॉवेल बाद झाला, तेव्हा केकेआरसी स्थिती १०.१ षटकांत ५ बाद ७० धावा अशी होती. बऱ्याच सामन्यानंतर रिंकू सिंगची बॅट मोक्याच्या क्षणी तळपली आणि केकेआरने जोरदार मसुंडी मारली. रिंकू सिंगने रमणदीप सिंग (१०) व अनुकूल रॉयच्या (नाबाद २९) केकेआरला विजयश्री मिळवून दिली. रिंकू सिंगने ३४ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ५३ धावांची विजयी खेळी केली. अनुकूल रॉयने १६ चेंडूंत एक चौकार व २ षट्कारांच्या मदतीने नाबाद २९ धावांची भर घातली.

राजस्थानकडून रविंद्र जडेजाने २ बळी, तर जोफ्रा आर्चर, नांद्रे बर्गर, रवी बिश्नोई व यश राज पुंजाने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# मुंबई इंडियन्ससमोर गुजरात टायटन्सचे आव्हान

**अहमदाबाद, १९ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि संघर्षरत मुंबई इंडियन्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

पाच वेळचा विजेता मुंबई इंडियन्सची सध्या स्थिती बिकट असून त्यांना गत चार सामन्यात लागोपाठ पराभव पत्करावा लागला होता. सलामीच्या सामन्यातून मिळविलेल्या दोन गुणांसह ते दहा संघांच्या गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. गुजरात टायटन्सची स्थिती फारशी वेगळी नाही. गुजरातने पाच सामन्यातून तीन विजय नोंदविले व ते ६ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. सध्या कमकुवत दिसत असलेल्या मुंबई संघावर वर्चस्व गाजवून गुजरात टायटन्स अव्वल चार क्रमांकात स्थान मिळवू इच्छित असणार आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स आपल्या पराभवाची मालिका खंडित करू इच्छित आहे, तेव्हा शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्सचे आव्हान ते कसे उधळून लावतात, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आपल्या मोहिमेची सुरुवात दोन पराभवांनी केल्यानंतर गुजरात टायटन्सने सलग तीन सामने जिंकले



शुभमन गिल



हार्दिक पांड्या

आहेत. त्यांच्या गोलंदाजी आक्रमणाने गत हंगामाच्या तुलनेत संतुलन साधले असून, डावाच्या सर्व टप्प्यांमध्ये प्रभावी योगदान दिले आहे. प्रसिध कृष्णा पुन्हा एकदा सर्वाधिक बळी घेणाऱ्यांच्या यादीत सहभागी झाला आहे, तर पुनरागमन केलेला रशीद खान मधल्या षटकांमध्ये वर्चस्व गाजवित आहे. मोहम्मद सिराज व कॅगिसो रबाडाने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या आपल्या शेवटच्या सामन्यात नव्या चेंडूने उत्कृष्ट कामगिरी केली, तर नवोदित अशोक शर्माच्या भेदक वेगाने सर्वांना सतर्क ठेवले आहे.

गुजरात टायटन्सच्या तिन्ही विजयांमध्ये शुभमन गिलने अर्धशतके झळकावली आहेत; तर दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या अर्धशतकीय खेळींमध्ये जोस बटलर आपल्या नेहमीच्या आक्रमक आणि भेदक शैलीत खेळताना दिसून आला.

दुसरीकडे, गत १३ वर्षांतील सलामीचा सामना न जिंकण्याचा अशुभ योग मोडून काढल्यानंतरही मुंबई इंडियन्स सलग चार पराभवांमुळे आता गुणतालिकेच्या अगदी तळाशी फेकले गेले आहेत. जसप्रीत बुमराहने अत्यंत काटकसरीने गोलंदाजी केली असली, तरीही त्याला खेळलेल्या पाचही सामन्यांमध्ये एकही बळी मिळविता आलेला नाही. त्यांच्या गोलंदाजीवर प्रतिस्पर्ध्यांनी भरपूर धावा कुटल्या आहेत.

सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा या दोघांनाही धावा उभारण्यात अपयश आले असून, या जोडीच्या खात्यावर केवळ एकच अर्धशतक जमा आहे. पायाच्या दुखापतीतून सावरत असलेल्या रोहित शर्माच्या जागी संघात स्थान मिळाल्यानंतर, क्विंटन डी कॉकने पंजाब किंग्जविरुद्ध नाबाद ११२ धावांची खेळी केली. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**गुजरात टायटन्स**
**वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ :** नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

### क्षुल्लक चुकांमुळे पराभव : रियान पराग

**कोलकाता :** आमच्या संघाने जिंकण्यासारखा सामना हातातून निसटू दिला. क्षेत्ररक्षणातील क्षुल्लक चुका आणि अंमलबजावणीतील त्रुटींमुळे आम्हाला पराभवाला सामोरे जावे लागले, असे राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग म्हणाला. रविवारी ईडन गार्डन्सवर आयपीएल सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सकडून राजस्थान रॉयल्सचा पराभवानंतर पराग बोलत होता. पहिल्या चार-पाच षटकांमध्ये आम्ही जे काही पाहिलं, त्यानुसार खेळपट्टी १७० धावांची होती, त्यामुळे सुरुवातीलाच आम्ही अपेक्षेपेक्षा १० धावा कमी होतो.

## केकेआरचा कर्णधार म्हणून रहाणेची गंभीरच्या नकोशा विक्रमाशी बरोबरी



**कोलकाता, १९ एप्रिल**

राजस्थान रॉयल्सविरुद्ध १५५ धावांचा पाठलाग करताना अजिंक्य रहाणेने केकेआरसाठी डावाची सुरुवात केली, पण त्याला आपले खातेही उघडता आले नाही. बर्गरने त्याला दोन चेंडूंत शून्यावर बाद करून तंबूमध्ये परत पाठविले.

आयपीएलमध्ये केकेआरचा कर्णधार म्हणून अजिंक्य रहाणेने गौतम गंभीरच्या नको असलेल्या विक्रमाची बरोबरी केली.

रहाणेने आयपीएल २०२६ च्या सातव्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्ससाठी आपल्या पूर्वीच्या संघ राजस्थान रॉयल्सविरुद्ध डावाची सुरुवात केली. तथापि, रविवारी ईडन गार्डन्सवर झालेल्या या सामन्यात त्याला आपले खाते उघडता आले नाही. केकेआरच्या डावातील दुसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर नंद्रे बर्गरने रहाणेला बाद केले.

राजस्थान रॉयल्सविरुद्ध शून्यावर बाद होणे हे रहाणेचे या वर्षीच्या आयपीएलमधील सलग दुसरे शून्य होते. १७ एप्रिल रोजी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्ध झालेल्या केकेआरच्या मागील सामन्यातही तो शून्यावर बाद झाला होता.

सलग दोन डावांत शून्य धावांवर बाद झाल्यामुळे, रहाणेने गौतम गंभीरच्या नावावर असलेला एक नकोसा विक्रम गाठला. गंभीरनंतर, सलग दोन डावांत शून्यावर बाद होणारा तो केकेआरचा केवळ दुसरा कर्णधार ठरला.

विशेष म्हणजे, २०१४ च्या आयपीएल हंगामात गंभीरने कोलकातास्थित या संघासाठी सलग तीन वेळा शून्यावर बाद होण्याची नोंद केली होती. (वृत्तसंस्था)

# आगरकर राष्ट्रीय निवड समितीच्या अध्यक्षपदी कायम

**नवी दिल्ली, १९ एप्रिल**

२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकावर लक्ष ठेवून भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अजित आगरकर यांचा करार आणखी एका वर्षासाठी वाढवण्याचा निर्णय घेतल्याने ते राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष म्हणून कायम राहतील.

अगरकर यांच्या अध्यक्षतेखाली ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२६ दरम्यान निवडलेल्या भारतीय संघाने चार आयसीसी स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला व त्यापैकी तीन स्पर्धा जिंकल्या- दोन टी-२० विश्वचषक व एक आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी. त्यामुळे त्यांचा करार चौथ्या वर्षासाठी वाढवला जाईल हे निश्चित होते.

अगरकर यांनी मुदतवाढ मागितली नाही. एक निवडकर्ता कनिष्ठ किंवा वरिष्ठ निवड समितीत चार वर्षांपर्यंत व दोन्ही समित्यांमध्ये मिळून पाच वर्षांपर्यंत काम करू शकतो. त्यामुळे अजित



यांचा करार वाढवला जात नसून तो नूतनीकरण केला जात आहे, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितले.

स्वतः नूतनीकरणाची मागणी करण्याऐवजी, निर्णय घेणाऱ्यांना आपल्या समितीच्या कामगिरीचे मूल्यांकन करू देणे त्यांना अधिक पसंत होते, असे आगरकर यांच्या जवळच्या सूत्रांनी नेहमीच सांगितले.

५० षटकांच्या विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर सातत्य राखणे, हा मंडळाच्या या निर्णयामागील एक महत्त्वाचा घटक आहे.

त्यांच्या कार्यकाळात, समितीने अनेक कठीण निर्णय घेतले आहेत, ज्यात विराट कोहली व रोहित शर्माच्या कसोटी निवृत्तीवर देखरेख करणे, आणि ज्येष्ठ वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून हळूहळू बाहेर काढणे यांचा समावेश आहे. या समितीने आणखी एक धाडसी निवड निर्णयही घेतला, यात कसोटी व वन-डे कर्णधार शुभमन गिलला टी-२० विश्वचषक संघातून वगळून त्याच्या जागी फॉर्मात असलेल्या ईशान किशनला संधी दिली. (वृत्तसंस्था)

# सामन्याचा शेवट गोड करण्याचे ध्येय होते : रिंकू सिंग

**कोलकाता, १९ एप्रिल**

सामना शेवटपर्यंत नेण्यावरच माझे संपूर्ण लक्ष केंद्रित होते, असे कोलकाता नाईट रायडर्सचा उपकर्णधार रिंकू सिंग विजयानंतर म्हणाला. रविवारी ईडन गार्डन्सवर केकेआरने राजस्थान रॉयल्सचा चार गडी राखून पराभव करत आयपीएल २०२६ हंगामातील आपला पहिला विजय नोंदवला.

रिंकू सिंगने आपल्या सामना-विजयी खेळीचे श्रेय आपल्या शांत आणि विचारपूर्वक दृष्टिकोनाला दिले. लक्ष्याचा पाठलाग करताना जेव्हा परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती, अशा नाजूक क्षणी फलंदाजीला आलेल्या रिंकूने डावाची सूत्रे हाती घेतली. आपल्या आजूबाजूला गडी बाद होत असतानाही त्याने एका टोकाकडून किल्ला लढवत डाव सावरला आणि अखेरीस एका संयमी अर्धशतकाच्या जोरावर केकेआरला विजय मिळवून दिला.

मी माझे फटके खेळताना संकोच करत होतो किंवा माझ्या मनात काही साशंकता होती. सामना शेवटपर्यंत नेण्याचेच माझे ध्येय होते, कारण मी प्रशिक्षकांशी आणि माझ्या फलंदाजीतील जोडीदाराशी याबद्दल चर्चा केली होती. सामना एका कठीण परिस्थितीत असल्याने, तो शेवटपर्यंत नेण्याचीच आमची रणनीती होती, असे त्याने सांगितले.

या डावखुऱ्या फलंदाजाला आपल्या खेळीच्या सुरुवातीलाच एका धोक्याचा सामना करावा लागला होता. तो क्षण कोणत्याही दिशेने झुकू शकला असता, असे त्याने मान्य केले.


हंगामाच्या सुरुवातीला सलग काही डावांमध्ये कमी धावा केल्यामुळे, आपल्या स्वतःच्या आत्मविश्वासासाठी ही खेळी महत्त्वाची आहे, असेही तो म्हणाला. हा विजय केकेआरसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला; कारण या सामन्यापूर्वी त्यांना विजयाची चव चाखता आली नव्हती आणि ते सलग पराभवांच्या मालिकेतून जात होते. या निकालामुळे त्यांच्या मोहिमेला एक नवी दिशा मिळेल आणि परिस्थिती पालटेल, अशी आशा २८ वर्षीय रिंकूने व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

# आर्य-कूपरची ‘सुपर’ खेळी

### पंजाब ७ बाद २५४

**मुल्लानपूर, १९ एप्रिल**

१९ व्या आयपीएल हंगामात आपल्या घरच्या मैदानावर लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध खेळताना सलामीवर प्रियांश आर्य (९३), कूपर कोनोलीने (८७) केलेल्या झंझावाती खेळी तसेच मार्कस स्टोइनिसने अखेरच्या क्षणी केलेल्या जोरदार फटकेबाजीच्या बळावर पंजाब किंग्सने लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्धच्या सामन्यात २० षटकांत ७ बाद २५४ धावा उभारल्या. पंजाबने लखनौ सुपर जायण्ट्ससमोर विजयासाठी २५५ धावांचे आव्हान ठेवले.



प्रियांश आर्य व कूपर कोनोलीची १८२ धावांची भागीदारी

या तिघांच्या आक्रमक फटकेबाजीच्या जोरावर पंजाब किंग्सने या हंगामातील सर्वोच्च धावसंख्येची नोंद केली. त्यांनी आरसीबीने सीएसकेविरुद्ध) उभारलेल्या २४९ धावांच्या धावसंख्येला मागे टाकले.

लखनौ सुपर जायण्ट्सचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून पंजाब किंग्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित मोहम्मद शमीने पहिल्याच षटकांत हुकमी खेळाडू प्रभसिमरन सिंगला शून्यावर बाद करून पंजाब किंग्सला पहिला धक्का दिला. मात्र त्यानंतर पंजाबने जोरदार मुसंडी मारली. सलामीवीर प्रियांश आर्य व कूपर कोनोलीने लखनौच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला व आपल्या संघाचा डाव सावरला. या दोघांनीही चौफेर फलंदाजी करीत आपापली वैयक्तिक अर्धशतके साजरी केली आणि दुसऱ्या गड्यासाठी १८२ धावांची भागीदारी केली. प्रिन्स यादवने वेगवान मारा करून कूपरला रोखले. कूपर कोनोलीने ४६ चेंडूंत ८७ धावांची खेळी केली, यात त्याने ८ चौकार व ७ षट्कार हाणलेत. पुढे प्रियांश आर्यने श्रेयस अय्यरच्या साथीने आपले शतक साजरे करेल असे वाटत होते, परंतु तो डावखुरा मणिमारन सिद्धार्थच्या फिरकीला बळी पडला. सात धावांनी प्रियांशचे शतक हुकले. प्रियांश आर्यने अवघ्या ३७ चेंडूंत ४ चौकार व ९ षट्कारांच्या मदतीने ९३ धावांची मोठी खेळी केली. पंजाबला दोनशे धावांच्या जवळपास पोहोचविले असताना श्रेयस अय्यर (५) मोहसीन खानच्या गोलंदाजीला बळी पडला, मात्र त्यानंतर मार्कस स्टोइनिसने नेहल वढेरा (१३), शशांक सिंग (१७) व मार्को जॅनसेनच्या ( नाबाद १) मदतीने संघाला मर्यादित २० षटकांत ७ बाद २५४ धावांचा टप्पा गाठून दिला. अखेरच्या चेंडूवर झटपट धाव घेताना स्टोईनिस धावबाद झाला. मार्कस स्टोईनिसने अवघ्या १८ चेंडूंत प्रत्येकी २ चौकार व षट्कारांसह २९ धावांची भर घातली. लखनौकडून प्रिन्स यादव व मणिमारन सिद्धार्थने प्रत्येकी २ बळी, तर मोहम्मद शमि व मोहसीन खानने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# गीता फोगट, स्वीटी बूराचा सायकल मोहिमेत सहभाग

### फिट इंडिया संडेज ऑन सायकल

**नवी दिल्ली, १९ एप्रिल**

फिट इंडिया संडेज ऑन सायकल मोहिमेत रविवारी महिला विशेष आवृत्तीत राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी आणि ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवणारी भारताची पहिली महिला कुस्तीपटू गीता फोगट व मुष्टियोद्धा स्वीटी बूरा प्रामुख्याने सहभागी झाल्या. या रॅलीमध्ये दिल्लीतील मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियमवर १,००० महिलांनी भाग घेतला.

हा कार्यक्रम केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांनी सुरू केलेल्या फिट इंडिया संडेज ऑन सायकल या विशेष उपक्रमाचा एक भाग होता.

मला वाटते की मी आणखी वारंवार सायकल चालवली पाहिजे. आज मला खरोखरच खूप आनंद मिळाला. लहान मुलांना सोबत घेऊन सायकल चालवणाऱ्या अनेक तरुण मातांना, तसेच माझ्यासोबत सायकल चालवणाऱ्या ज्येष्ठ महिलांना पाहून मला खूपच उत्साह वाटला. आपल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा फिट इंडिया उपक्रम सुरू केला होता आणि आज येथे




फिट इंडिया संडेज ऑन सायकल मोहिमेत सहभागी झालेल्या गीता फोगट व स्वीटी बूरा

उपस्थित राहिल्यावर माझ्या लक्षात आले की, हा उपक्रम खरोखरच एक लोकचळवळ बनला आहे आणि लोकांनी आता तंदुरुस्तीला (फिटनेसला) अत्यंत गांभीर्याने घेण्यास सुरुवात केली आहे, असे गीता फोगट म्हणाली. विकसित भारत उभारणीतील महिलांच्या योगदानाचा गौरव करणाऱ्या या विशेष आवृत्तीमध्ये, देशभरातील फिट इंडिया संडेज ऑन सायकल उपक्रमावर महिलांचेच वर्चस्व दिसून आले. देशभरात एकाच वेळी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात २,००० हून अधिक ठिकाणी सहभाग नोंदविला गेला. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



### कासेगाव येथे महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी

**कासेगांव,दि.१९ एप्रिल-**
महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती पंढरपूर तालुक्यातील कासेगांवमध्ये साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. त्यानंतर लिंगायत समाज बांधवांच्या वतीने प्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमासाठी महालिंग लिगाडे, मोहन खताडे, सिद्धेश्वर लिगाडे, रेवणसिद्ध साखरे, नानासो साखरे, रामलिंग लिगाडे साठे, सागर लिगाडे, समाधान साखरे, विशाल कुंभार, उमेश गोटे, लखन दहिहांडे, वीरेंद्र शेंडे, मंगेश कुंभार, नागनाथ नष्टे, नागराज लिगाडे उपस्थित होते.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**सांगोला, दि.१९ एप्रिल-**
कायकवे कैलास अर्थात कामातच ईश्वर आहे. हा विचार देऊन समाजातील जातिभेद नष्ट करण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांच्या जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त सांगोला विद्यामंदिर प्रशालाव ज्यु. कॉलेज येथे संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांचे हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस व सचिव मल्लिकार्जुन घोंगडे यांचे हस्ते संस्थेचे संस्थापक कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### अनुराधा काबरा



**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**
बाळीवेस जैन गुरुकुल शाळे समोरील रहिवासी अनुराधा आनंद काबरा (वय ४८) यांचे दीर्घ आजाराने शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. अंत्यसंस्कार मारवाडी स्मशानभूमी येथे करण्यात आले.

### कृष्णाहरी सब्बन



**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**
नीलम श्रमजिवी नगर भाग ३ येथील रहिवासी कृष्णाहरी सायण्णा सब्बन यांचे दीर्घ आजाराने शनिवार दि. १८ एप्रिल २०२६ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, तीन नातू असा परिवार आहे. पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या शांतीधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### श्रीनिवास कोडम



**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित बेत रात्र महाविद्यालयचे माजी प्राचार्य श्रीनिवास व्यंकटनरसू कोडम यांचे रविवार दि. १९ एप्रिल रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या शांतीधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### बाळकृष्ण माने-शेंडगे



**अकलूज, दि.१९ एप्रिल-**
वाघोली (ता.माळशिरस) येथील प्रगतशिल शेतकरी बाळकृष्ण शंकरराव माने-शेंडगे यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृधपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, नातवंडे, परतवंडे असा परिवार असून वाघोली येथे चंद्रभागा नदीच्या काठावर असलेल्या स्मशानभुमीत अत्यसंस्कार करण्यात आले. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक सतीश शेंडगे यांचे ते वडील होते तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी भारत शेंडगे यांचे ते चुलते होते.

### रमेश मिठ्ठापल्ली



**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**
होमकर नगर येथील रमेश लक्ष्मणराव मिठापल्ली (वय ७९) वर्ष यांचे शनिवारी (दि. १८ एप्रिल) रोजी निधन झाले. रविवारी त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोडवरील पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. पोलिस उपनिरीक्षक मिलिंद मिठ्ठापल्ली यांचे ते वडील होत. ते राज्य मार्ग परिवहन महामंडळातून २००६ मध्ये सेवानिवृत्त झाले होते.

### सरस्वती उदगिरी



**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**
शेळगी येथील नटराज सोसायटी मधील ज्येष्ठ नागरिक कै. सरस्वती सिद्राम उदगिरी (वय ७५) यांचे दि. १६ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

# धस पिंपळगावचा रामचंद्र कांबळे संत बाळूमामा केसरीचा मानकरी

**पानगावमध्ये कुस्तीचा थरार : दीड किलोची चांदीची गदा आणि ६१ हजारांचे बक्षीस पटकावले**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १९ एप्रिल-**
बार्शी तालुक्यातील कापसे मळात (पानगाव) येथे संत बाळूमामा भंडारा यात्रेनिमित्त आयोजित 'संत बाळूमामा केसरी' कुस्ती मैदानात प्रथम क्रमांकाच्या कुस्तीत धस पिंपळगाव येथील पैलवान रामचंद्र कांबळे याने आपल्या प्रतिस्पर्ध्याला चितपट करत 'संत बाळूमामा केसरी' किताबावर आपले नाव कोरले.




मैदानातील मुख्य कुस्ती जिंकणाऱ्या रामचंद्र कांबळे याला पै. मारुती जाधव (अध्यक्ष, पैलवान ग्रुप महाराष्ट्र राज्य) यांच्यावतीने दीड किलो चांदीची गदा देऊन गौरवण्यात आले. तसेच पै. दादा सरनोबत उद्योजक, जामखेड यांच्या वतीने ६१ हजार रुपये रोख आणि ट्रॉफी देण्यात आली. उपविजेता पैलवान मशीद शेख यास ३१ हजार रुपये व ट्रॉफी सुनील भराडिया यांच्याकडून, तृतीय क्रमांकाचा पैलवान रविराज निंबाळकर यास २१ हजार रुपये व ट्रॉफी भाऊ पांडुरंग गाडे यांच्याकडून तर चौथा क्रमांकाचा पैलवान अमोल चव्हाण यास ११ हजार रुपये व ट्रॉफी गणेश गाडे यांनी मिळविला.

या कुस्ती मैदानाचे उद्घाटन माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे चिरंजीव मल्हार पाटील, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. रणवीर राऊत, बार्शी बाजार समितीचे सभापती विजय गरड, आणि संत बाळूमामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याला बाळासाहेब कापसे, प्रकाश पवार, चंद्रकांत पवार, राजूदेव आवारे, बापूसाहेब कापसे यासह मान्यवर उपस्थित होते. कुस्ती निवेदक म्हणून मोहसीन आत्तार यांनी आपल्या शैलीत मैदान गाजवले. बाळूमामांच्या भंडारा यात्रेनिमित्त आयोजित या कुस्ती सोहळ्याला शौकिनांनी मोठी गर्दी केली होती.

## महिमला बुधवारी कुस्ती मैदान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१९ एप्रिल-**
महिम येथील श्री सिद्धनाथ यात्रा महोत्सवात निकाली कुस्त्यांचे आयोजन बुधवार २२ एप्रिल रोजी केले असून ४ लाख रुपयांच्या इनामासाठी महाराष्ट्र केसरी दादासाहेब शेळके विरुद्ध इराणचा मल्ल मिर्झा इराणी यांच्यात लढत होईल.

या मैदानात ईश्वरी ठवरे, प्रगती पाटील, साक्षी धोत्रे या महिला पैलवानांची उपस्थिती लक्षवेधी असणार आहे. इच्छुक मल्लांनी सोमनाथ मरगर (मो.नं. ९९२२२०८२८०) अथवा सिताराम शिरगिरे (९९७०९७४६०१) या क्रमांकावर संपर्क साधावा.

**अशा होणार कुस्त्या**

**२ लाख :** महाराष्ट्र चॅम्पियन समीर शेख (खडकी) विरुद्ध मलिंग ठाकूर (पुणे), १ लाख : सागर काळेबाग (महिम) विरुद्ध सुरेश बघेल (हरियाणा).

**७५ हजार :** सचिन काळे (आटपाडी) विरुद्ध ओंकार माने (खुडूस), विनायक भुजबळ (आटपाडी) विरुद्ध आशुतोष गायकवाड (कुर्डूवाडी), मसीद शेख (कुर्डूवाडी) विरुद्ध पप्पू देशमुख (पुणे).

**५१ हजार :** रोहित जाधव (महूद) विरुद्ध प्रशांत चंदनकर (कुर्डूवाडी), राजू कोळी (पुणे) विरुद्ध पृथ्वीराज मरगर (महिम), अविराज माने (खुडूस) विरुद्ध मिनीनाथ बोडरे (आटपाडी).

**२५ हजार :** जयेश कारंडे (महिम) विरुद्ध नाना पवार (सांगली), अजय भुसनर (जांबूड) विरुद्ध विजय बोडरे (खवासपूर).

**२१ हजार :** इनामासाठी करण नागणे (महूद) विरुद्ध सुजित अटकळे (खवासपूर), अक्षय गायकवाड (नेवरे) विरुद्ध माऊली पाटील (निमगाव), सार्थक वाघमोडे (सोनके) विरुद्ध किरण सत्रे (नांदुरे).

**११ हजार :** ओमकार लिंगे (सुपली) विरुद्ध शुभम हाके (सोनके), ओंकार लोखंडे (पळशी) विरुद्ध समर्थ नागटिळक (पंढरपूर) व सृष्टी गावडे (व्हळे) विरुद्ध श्रद्धा खरात.

## मुंबईत राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा थरार

**कामगार कल्याण मंडळाचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल-**
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २९ व्या पुरुष आणि २४ व्या महिला खुल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन २१ ते २५ एप्रिल दरम्यान मुंबई येथे केले आहे.

मुंबईतील प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळील सेनापती बापट मार्ग येथील हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन येथे या स्पर्धा रंगणार आहेत. राज्यातील कामगार खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यातील क्रीडागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने या भव्य स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे.

विजेत्यांना ५० हजार, उपविजेत्यास ३५ हजार रुपये उपांत्य उपविजेत्या दोन संघास प्रत्येकी २० हजार रुपये रोख, पदके आणि प्रमाणपत्रे देण्यात येणार आहे.



इच्छुक कबड्डी संघांनी सहभागासाठी आपल्या नजीकच्या कामगार कल्याण केंद्रात तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन कामगार कल्याण अधिकारी समाधान भोसले यांनी केले आहे.

## सोलापूरच्या अनुष्का घोडकेची महाराष्ट्रच्या संभाव्य बास्केटबॉल संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल -**



नाशिक येथे झालेल्या १८ वर्षांखालील आंतरजिल्हा बास्केटबॉल स्पर्धेत आपल्या खेळाची चमक दाखवणाऱ्या सोलापूरच्या अनुष्का घोडके हिची महाराष्ट्र राज्याच्या २० सदस्यीय संभाव्य संघात निवड झाली आहे. ही निवड ७६ व्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. ७६ वी १८ वर्षांखालील मुला-मुलींची राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा पांडिचेरी येथे २२ मे ते २९ मे २०२६ दरम्यान पार पडणार आहे. या मुख्य स्पर्धेपूर्वी निवड झालेल्या २० खेळाडूंसाठी दोन विशेष सराव शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिले सराव शिबिर: २२ एप्रिल ते २ मे फादर एग्नेल बास्केटबॉल क्रीडांगण, वाशी, नवी मुंबईत तर दुसरे सराव शिबिर ९ मे ते २० मे (धरमपेठ क्रीडा मंडळ, नागपूर येथे होईल. दुसरे सराव शिबिर संपल्यानंतर महाराष्ट्र राज्याचा अंतिम संघ नागपूरवरूनच थेट राष्ट्रीय स्पर्धेसाठी पांडिचेरीला रवाना होईल.

## विद्यार्थ्यांनी अंगभूत कौशल्य विकसित करणारे शिक्षण घ्यावे

**शांभवी कल्याणशेट्टी; कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १९ एप्रिल-**
विद्यार्थ्यांनी दहावीनंतर आयुष्याची दिशा ठरविण्यासाठी स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्याचा विचार करून विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांमधून आपला मार्ग निवडला पाहिजे तसेच त्या जोडीला अंगभूत कौशल्य विकसित करणाऱ्या कोर्सेसचे ज्ञान घेतले पाहिजे असे प्रतिपादन शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाने आयोजित केलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेचा शुभारंभ करताना त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, विवेकानंद प्रतिष्ठानचे सदस्य गुरुपादप्पा आळगी उपस्थित होते.प्रास्ताविक पूनम कोकळगी यांनी केले. सूत्रसंचलन शिवकुमार मठदेवरु यांनी केले आभार प्रा सलोनी शहा यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापिका हर्षदा गायकवाड, शितल टिंगरे, मधुबाला लोणारी, शितल फुटाणे, सौरभ भस्मे, गुरूसिध्द हपाळे यांनी प्रयत्न केले.

**कौशल्याभिमुख शिक्षणातून रोजगाराची संधी**

दहावीनंतर डिप्लोमा, आयटीआय आणि कौशल्याभिमुख कोर्सेसद्वारेही विद्यार्थी लवकर नोकरी मिळवू शकतात. इलेक्ट्रिशियन, मेकॅनिक, संगणक ऑपरेटर अशा क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसायही सुरू करता येतो असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले.



## 'उत्कर्ष' मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ एप्रिल-**
सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयात मंथन, अक्षरगंगा, अभिरूप, ऑलिम्पियाड व डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या संस्थापिका डॉ.संजीवनी केळकर, संस्थाध्यक्षा प्रा.नीलिमा कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, कोषाध्यक्षा डॉ.शालिनी कुलकर्णी, माध्यमिकचे प्राचार्य सुनील कुलकर्णी, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका संध्या शास्त्री, पर्यवेक्षक प्रशांत भोसले उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सातत्याने परिश्रम करून आपल्या यशाची उंची गाठावी व शाळेचे नाव उज्वल करावे असे आवाहन प्रा.नीलिमा कुलकर्णी यांनी यावेळी मनोगतात केले. प्रास्ताविकात प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व अधोरेखित केले. सूत्रसंचालन शिक्षिका स्नेहल रसाळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**या विद्यार्थ्यांचा झाला सन्मान**

प्रत्युष माळी, तनुष गोडसे, विराज फुले, वैष्णवी कोळेकर, तेजस गोडसे, अनन्या भंडारी, अंशिका ननावरे, अनविका ननवरे, श्रीतेज घोडके, अभंग जाधव, आराध्या शिंदे, श्रीहरी भाकरे, स्वराज ककमरे, सारंग राऊत, राजवीर शेळके, अभिराज सप्ताळ, राज शिंदे, पंकजा वाघमोडे, आयमन मणेरी, मनस्वी कुलकर्णी, श्रेया जाधव

## नवीन घराचे आमिष दाखवत पंढरपुरात महिलेची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ एप्रिल-**
तालुक्यातील गोपाळपूर येथील एका महिलेस नवीन घर कमी किंमतीमध्ये देतो, असे सांगून चार महिला व एका पुरुषाने तिच्या घरात घुसून तब्बल १८ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला होता. मात्र येथील तालुका पोलिसांनी या चोरीचा बारा तासांमध्ये छडा लावीत यामधील तीन महिलांना जेरबंद करीत संपुर्ण मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. प्रशांत डगळे यांनी दिली.

डॉ. डगळे यांनी सांगितले की, गोपाळपूर येथे राहणाऱ्या नंदाबाई भोई (वय ५० वर्षे) या मासे विक्रीचा व्यवसाय करून आपली उपजीविका चालवतात. गोपाळपुरातीलच चार महिला व एका पुरुषांनी १६ एप्रिल २०२६ रोजी त्यांचे घराचे दार वाजवून जुनी ओळख काढून त्यांना नवीन घर कमी किमतीमध्ये विकत घेऊन देतो अशी माहिती देत असताना इतर तीन महिला व एक आरोपी तिच्या घरात प्रवेश करून त्यांच्या घरातील सोने-चांदी व रोख रक्कम असा १८ लाखांचा मुद्देमाल चोरून नेला.

याची फिर्याद पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनला दिल्यानंतर पोलिसांनी फिर्यादीने दिलेल्या वर्णनानुसारगावातील महिलांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. सर्व महिलांनी गुन्हा केल्याचे कबूल करत बारा तोळे सोने तसेच तीनशे ग्रॅम चांदी, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व फिर्यादीचे अर्बन बँकेचे पासबुक आणि एफडी कार्ड व तीन लाख ७८ हजार रोख रक्कम असा एकूण १८ लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

दरम्यान या घटनेतील तीन आरोपींचा शोध अजून सुरू असून तपासामध्ये चार महिला व एक पुरुष असे पाच आरोपी निष्पन्न झाले आहेत. यापैकी तीन महिला आरोपींना ताब्यात घेवुन इतर दोन आरोपीबाबत तपास सुरु आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अ. पोलीस अधीक्षक, प्रीतम यावलकर, स. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, सपोनि अक्षय सोनवणे, शहाजी गोसावी, विभावरी रेळेकर, पोसई विक्रम वडणे, पोसई भारत भोसले, दत्तात्रय तोंडले, पोहेकॉ सचिन आटपाडकर, प्रमोद साळुंखे, बाजीराव काकडे, सागर गवळी, मंगेश रोकडे, सज्जन भोसले, स्वप्निल वाडदेकर, विजयकुमार आवटी, मपोहेकॉ सुवर्णा कदम, चालक पोकॉ हसन नदाफ गोडसे यांच्या पथकाने केली.

# संतांचिया गावा प्रेमाचा सुकाळ : इंद्रजित देशमुख

**प्रा. स्वामीराज भिसे लिखीत जाता संतांच्या गावा या पुस्तकाचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ एप्रिल-**
तरुणांनी ज्या वयात पत्नी समवेत निसर्ग सौंदर्याचा आनंद घ्यावा, मौजमजा करावी, निसर्गात रमाव त्या वयात प्रा. स्वामीराज भिसे यांनी देश पादाक्रांत करुन संतांचा शोध घेतला. त्यांचा शांती, समता व बंधुता हा विचार जाता संतांच्या गावा या पुस्तकाच्या माध्यमातून समाजा समोर मांडण्याचा प्रयत्न केला. संताचिया गावा प्रेमाचा सुकाळ याची अनुभूती घेतली. आज याच विचारांची जगाला गरज आहे असे मत संत साहित्याचे अभ्यासक व माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी व्यक्त केले.




अकलूज येथील रुपा बॅंकवेट हॉल मध्ये आनंदमूर्ती पब्लिकेशन व मराठी साहित्य परिषद शाखा अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. स्वामीराज भिसे लिखीत जाता संतांच्या गावा या पुस्तकाचे प्रकाशन संत साहित्याचे अभ्यासक इंद्रजित देशमुख यांच्या हस्ते व संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे माजी अध्यक्ष हभप बापूसाहेब मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या प्रकाशन समारंभास शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते-पाटील, सचिन परब, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, मराठी साहित्य परिषद शाखा अकलूजचे अध्यक्ष डॉ विश्वनाथ आवड, आनंदमूर्ती पब्लिकेशनचे औदुंबर भिसे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. स्वामीराज भिसे यांनी केले. परंतु यातून खरां आनंद प्राप्त झाल्याचे ते म्हणाले. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सौ शितलदेवी मोहिते पाटील म्हणाल्या,वास्तविक पाहता आपण सर्वजणच दैनंदिन जीवन जगत असतो परंतु भिसे परिवार हा खऱ्या अर्थाने जीवनाचा आनंद घेत आहे. विविध क्षेत्रांमध्ये त्यांचे काम चालू असते . भिसे परिवार म्हणजेच शिवरत्न परिवार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. सूत्रसंचालन व आभार प्रा. रोहित देशमुख यांनी मानले.

## महत्वाचे...



सोलापूर : अक्षय तृतीयानिमित्त श्री तोगटवीर क्षत्रिय समाजाची कुलदेवता श्री चौडेश्वरी देवी मंदिरात शतक आंब्याचा सजावट करण्यात आली. दत्तात्रय बडगंची यांनी हे आंबे अर्पण केले.




सोलापूर : जोडभावी पेठ येथील अशोक जागृती तरुण मंडळाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयासमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळ्याचा देखावा सादर करण्यात आला होता.

### 'गोष्ट छबीची' या बाल कादंबरीला राज्यपुरस्कार जाहीर




तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ एप्रिल-

येथील ज्येष्ठ साहित्यिका, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेच्या अध्यक्षा प्रा.डॉ.श्रुतीश्री वडगबाळकर यांच्या 'गोष्ट छबीची' या बालकादंबरीला अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला, असे या संस्थेचे अध्यक्ष राजन लाखे व कार्यवाह डॉ. दिलीप गरुड यांनी कळविले आहे.

मधुश्री प्रकाशन पुणे यांनी हे पुस्तक प्रकाशित केले. गोष्ट छबीची या बालकादंबरीला राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल दत्ता सुरवसे, किशोर चंडक, डॉ.नरेंद्र काटीकर, वंदना कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे, मारुती कटकधोंड, नितीन वैद्य आदींनी प्रा.डॉ.श्रुतीश्री वडगबाळकर यांचे अभिनंदन केले.







# महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त पारंपारिक वाद्यांसह मिरवणूक

● वारकरी पथक, महिलांच्या लेझीम पथकाने वेधले लक्ष
● भर पावसात मान्यवरांचा उत्साहात सहभाग

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ एप्रिल-

जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाच्या वतीने रविवारी पारंपारिक वाद्यांसह दिमाखात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत सहभागी झालेल्या वारकरी पथक, महिलांच्या लेझीम पथकाच्या बहारदार सादरीकरणाने सोलापूरकरांचे लक्ष वेधले. बाळी वेस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिर येथून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. विधानसभेचे उपसभापती अण्णा बनसोडे, अक्कलकोट नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे, डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या हस्ते महात्मा श्री बसवेश्वर महाराजांच्या पूर्णाकृती मूर्तीचे पूजन करण्यात आले.

श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून सुरुवात झालेली ही मिरवणूक विजय चौक, चाटी गल्ली, मंगळवार पेठ पोलीस चौकी, मीठ गल्लीमार्गे महात्मा बसवेश्वर सर्कल इथे विसर्जित झाली. भर पावसातही मान्यवरांनी आणि सोलापूरकरांनी महात्मा श्री बसवेश्वर जयंती निमित्त निघालेल्या या मिरवणुकीत मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. मिरवणुकीच्या अग्रभागी हलगी पथक होते. त्यामागे आळंदी देवाची येथील वारकरी पथक, महिलांचे लेझीम पथक होते. टाळ आणि मृदंगाच्या तालावर सादरीकरण केलेल्या वारकरी पथकाचे सोलापूरकरांनी कौतुक केले. तसेच यावेळी महिलांच्या लेझीम पथकानेही विविध भक्ती गीतांवर लेझीम सादरीकरण केले.

याप्रसंगी मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील, उत्सव समितीचे अध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांच्यासह बसवराज सावळगी, केदार वनारोटे, अनिल परमशेट्टी, रेवणसिद्ध आवजे, गणेश चिंचोळी, आनंद मुस्तारे, सुदीप चाकोते, सिद्धेश थोबडे, विजय कुलथे, सचिन शिवशक्ती, मल्लिनाथ सोलापूरे, गुरुशांत मोकाशी, दिलीप पाटील, सुमित पारटील, गिरीष आकरे, राजाभाऊ आलूरे, ॲड.मल्लिनाथ शहाबादे, नागनाथ मेंगाणे, धनराज कोळकुर, धर्मराज केंगनाळकर, युवराज केंगनाळकर उपस्थित होते.

# अक्षय्य तृतीयेनिमित्त श्री भगवंतास आंब्यांची आरास; मंदिरांत भक्तांची गर्दी

तभा वृत्तसेवा,
बार्शी दि. १९ एप्रिल -

आज रविवार दि. १९ एप्रिल वैशाख शुद्ध तृतीया अर्थात अक्षय्य तृतीया हा हिंदू धर्मातील अत्यंत शुभ आणि मंगल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या दिवशी बार्शी शहरासह ग्रामीण भागात धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक वातावरण पाहायला मिळाले.

अक्षय्य तृतीयाच्या या मुहूर्तावर श्री भगवंत मंदिरात, श्री भगवंत तसेच महालक्ष्मी देवीच्या मूर्तींना आकर्षक आंब्यांची आरास करण्यात आली होती. आंब्याच्या पानांचे तोरण, फुलांची सजावटीने मंदिराचा गाभारा लक्ष वेधून घेत होता. मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केलेली दिसून आली.



### घरोघरी आमरस-पोळीचा गोड सुवास

याचबरोबर अक्षय्य तृतीया म्हटले की, आजच्या दिवशी विशेषतः आंब्याच्या आमरस-पोळीचा स्वयंपाक घरोघरी करण्यात आला होता. कुटुंबीयांनी एकत्र येऊन पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा केला.एकूणच, अक्षय्य तृतीया हा सण धार्मिक श्रद्धा, खरेदीचा उत्साह आणि पारंपरिक संस्कृती यांचा वारसा आहे. शहरासह ग्रामीण भागात हा सण आनंद, उत्साह आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

अक्षय्य तृतीया हा दिवस 'अक्षय' म्हणजे कधीही न संपणारे पुण्य देणारा मानला जातो. त्यामुळे या दिवशी दानधर्म, जप-तप आणि धार्मिक विधींना विशेष महत्त्व दिले जाते. अनेकांनी अन्नदान, वस्त्रदान यासारख्या उपक्रमांत सहभाग घेतला.

या शुभमुहूर्तावर बाजारपेठांमध्ये मोठी उलाढाल पाहायला मिळाली. सोने-चांदीच्या दागिन्यांच्या खरेदी, नवीन घरगुती वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, मोबाईल, तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांच्या खरेदीलाही नागरिकांनी प्राधान्य दिले. व्यापाऱ्यांनीही आकर्षक सवलती व ऑफर्स जाहीर केल्यामुळे खरेदीचा उत्साह अधिकच वाढला होता.

### श्री भगवान भावनाऋषींचा जन्मोत्सव कार्यक्रम आज, उद्या मिरवणूक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ एप्रिल-

अशोक चौक परिसरातील भावनाऋषी पद्मशाली ट्रस्ट सोलापूर यांच्या बोल्ली मंगल कार्यालयाच्या आवारात वस्त्रनिर्माता श्री भगवान भावनाऋषींचे मंदिराचे जिर्णोद्धार करून सदर मंदिरात श्री भगवान भावनाऋषींचे सुबक मुर्तीचे प्रतिष्ठापना झालेली आहे.

त्यांच्या जन्मदिवसानिमित्त गेल्या २७ वर्षापासून जन्मोत्सव व रथ पालखी मिरवणूक पुर्व भागातून निघत असते . हा जन्मोत्सव कार्यक्रम सोमवारी (दि. २०) सकाळी आयोजित केला आहे.

श्री गणेश व श्री भगवान भावनाऋषींचे महाअभिषेक, अखंड दिपाराधना, इंद्रध्वजपूजन श्रीगणेश पुण्यावाचन, नक्षत्र, नवग्रह पुजा, ईशान्य कलश पुजा, श्री विष्णूपंचायतन, देवता आवाहन व सायंकाळी ५ वा. यज्ञ आरंभ होणार आहे.

दि. २१ एप्रिलला सकाळी श्री भगवान भावनाऋषी जन्मोत्सवानंतर महाअभिषेक, यज्ञ पूर्णाहुती व प्रसाद वाटप . सायंकाळी ५ वा. श्री भगवान भावनाऋषींचे रथातून मिरवणूक काढण्यात येईल. मिरवणूक भावनाऋषी मंदिर, पोशम्मा मंदिर, हनुमान मंदिर, अशोक चौक, अशोक चौक पोलिस चौकी समोरून वालचंद कॉलेज, पंचमुखी हनुमान मंदिर, ७० फूट रोड, साई बाबा चौक ते भावनाऋषी मंदिरात रात्री ९ वाजता विसर्जन होईल. या कार्यक्रमात भक्तगणांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भावनाऋषी पद्मशाली ट्रस्ट विश्वस्त मंडळाने केले आहे.

### पद्मशाली पुरोहित संघम्च्या अध्यक्षपदी मनोहर जडल

सेक्रेटरीपदी भानुचंद्र चिप्पा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ एप्रिल-





पद्मशाली पुरोहित संघम्च्या अध्यक्षपदी मनोहर मार्कंडेय जडल तर सेक्रेटरीपदी भानुचंद्र नारायणशास्त्री चिप्पा यांची एकमताने निवड करण्यात आली.

अन्य पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष-रविंद्र विश्वनाथ श्रीपती, उपसेक्रेटरी-व्यंकटेश श्रीनिवास जिल्ला, खजिनदार-नरसय्या राजय्या अल्ली, कार्यकारिणी सदस्य-श्रीनिवास नारायण म्याडम, नागेश श्रीहरी अंकम, राजू भुमय्या कोडम, रामकृष्ण रामलु श्रीराम, सुधीर श्रीनिवास सोमा.

सरल्लागार-हरिकृष्ण सत्यनारायण नल्ला, राघवेंद्र श्रीनिवास आरकाल, अरविंद मार्कंडेय जिल्ला, नरेंद्र कांतय्या अलवाल, अविनाश नरेंद्र श्रीमल.

### ब्राम्हण महासंघ शाखा बार्शीच्यावतीने श्री परशुराम जयंती उत्साहात

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १९ एप्रिल -

बार्शी येथील ब्राम्हण महासंघाच्यावतीने प्रभू श्री परशुराम जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी ब्राम्हण महासंघाचे सर्व पदाधिकारी तसेच ब्राम्हण समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ब्राम्हण महासंघाचे खजिनदार व्यंकटेश कुलकर्णी यांनी केले .

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जयंतीच्या औचित्याने सुरुवातीला प्रभू श्री परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन ब्राम्हण महासंघाचे जेष्ठ मार्गदर्शक मुकुंदशेठ कुलकर्णी, शहराध्यक्ष एम .डी . कुलकर्णी, प्रा. किरण देशमुख यांच्या हस्ते करुन प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली.



यावेळी श्री परशुरामांच्या जीवन चरित्रावर सुप्रसिद्ध व्याख्याते अमोल कुलकर्णी यांनी आपले विचार मांडले. श्री परशुरामांच्या जीवनातील अनेक प्रसंग, त्यांच्या अंगी असणारे शौर्य, धाडस याची अनेक उदाहरणे सांगत, आजच्या परिस्थितीत समाजाला प्रभू परशूरामांच्या अंगी असणाऱ्या या गुणांची खूप गरज आहे, असे मत व्यक्त केले. ब्राम्हण समाजातील प्रत्येक घरात श्री परशुरामाचे चरित्र सांगणारे पुस्तक व त्यांची प्रतिमा प्रत्येकाच्या देवघरात असणे आजच्या काळाची गरज आहे, असे त्यांनी बोलताना सांगितले. कार्यक्रमाची सांगता प्रसन्न दिवाणजी यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. यावेळी कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात ब्राम्हण समाजबांधव उपस्थित होते.

# पाणीपुरवठा योजना प्रस्तावासंदर्भात महापालिकेच्या आजच्या सभेकडे लक्ष

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ एप्रिल-

करवाढीच्या मुद्द्यावरून गत दोन दिवसांपासून महापालिकेच्या पाणीपुरवठ्यासंदर्भातील सुमारे १४०० कोटींची योजना सर्वत्र चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर सोमवार, दि. २० एप्रिल रोजी महापालिकेची सर्वसाधारण सभा होणार असून या सभेत या पाणीपुरवठ्याच्या योजनेबाबत काय निर्णय घेण्यात येणार, याकडे राजकीय गोटासह जनसामान्यांचे लक्ष लागले आहे.



सोलापूर शहरातील अंतर्गत जलवितरण व्यवस्था सुधारण्यासाठी सुमारे १४०० कोटींच्या योजनेचा प्रस्ताव प्रशासनाकडून महापालिकेच्या सभेपुढे ठेवण्यात आला आहे. या संदर्भातील अजेंडा गत आठवड्यात प्रसिद्ध झाला होता. या योजनेतील अटी व शर्ती पाहता आगामी काळात महापालिका शहरवासीयांना भांडवली मूल्यावर आधारित करप्रणाली लागू करणार, यामुळे करवाढ होऊन तो शहरवासीयांवर लादला जाणार, असा समज सत्ताधारी भाजपच्या आमदार विजयकुमार देशमुख व आमदार सुभाष देशमुख गटामध्ये निर्माण झाला होता. या योजनेसंदर्भातील अजेंड्यावरील काही मजकूर इंग्रजीमध्ये असल्याने संभ्रमावस्था निर्माण झाली होती. यासंदर्भात या दोन्ही आमदारांनी आपल्या समर्थक नगरसेवकांसह शुक्रवारी महापालिका आयुक्तांची भेट घेतली होती. यामुळे भाजपमधील गटबाजीचे प्रदर्शन झाले होते.

दरम्यान या भेटीपूर्वीच महापौर विनायक कोंड्याल, सभागृहनेता नरेंद्र काळे, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी शुक्रवारी तातडीची पत्रकार परिषद घेऊन या योजनेमुळे करवाढ होणार नाही, असा खुलासा केला होता. यानंतर शनिवारी झालेल्या भाजपच्या पार्टी मीटिंगमध्ये शहरवासीयांवर कोणताही कर अथवा दरवाढीचा बोजा न टाकता १४०० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेला मनपा सभेत मान्यता देण्यावर एकमत झाले होते. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. २० एप्रिल) होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतया ज्वलंत विषयावर सत्ताधारी काय निर्णय घेणार, याकडे नागरिकांसह राजकीय मंडळींमध्ये विलक्षण उत्सुकता आहे.

# प्रबुध्द भारत तरुण मंडळाची सोलापुरात लक्षवेधक मिरवणूक

चवदार तळे सत्याग्रह, ऐतिहासिक क्षणाच्या बैलगाडी देखाव्याने स्फुलिंग चेतविले

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या हस्ते उद्घाटन

सोलापूर, दि. १९ एप्रिल-

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणुकीमध्ये मिलिंद नगर येथील प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी. बी. ग्रुप) तर्फे कसबे तडवळे येथील ऐतिहासिक बैलगाडी मिरवणूक देखावा आणि शतकोत्तर महोत्सव वर्ष चवदार तळे सत्याग्रह ऐतिहासिक क्षणाचा देखावा लक्षवेधक ठरला. मार्गदर्शन तथा माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या दोन्ही देखाव्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरक जीवन कार्याचे दर्शन घडविले. उपस्थितांमध्ये नवे स्फुलिंग चेतविले.

महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या हस्ते या देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले. भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो यांची मंगल उपस्थिती होती. यावेळी खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, बाळासाहेब वाघमारे, आंबेडकरी चळवळीतील नेते नागसेन कांबळे, डॉ. नितीन ढेपे, चंद्रकांत मडीखांबे, दशरथ कसबे, पुरुषोत्तम धूत, इंदरमल जैन, भारत बाबरे, लालू खंडेलवाल, काशिनाथ गड्डम, राजू हौशेट्टी, महेश सावंत, इरफान शेख, बापू जाधव, सुहास सावंत, श्रीमंत जाधव, सिद्धार्थ कसबे, बबन शिंदे, सोमेश शिरसागर, डॉ. संघप्रकाश दुड्डे, अश्विन सोनवणे, रोहन गायकवाड यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी १९४१ मधील ऐतिहासिक कसबे तडवळे परिषदेला केंद्रस्थानी ठेवत ऐतिहासिक बैलगाडी मिरवणुकीचा देखावा आणि २० मार्च १९२७ रोजी रायगड जिल्ह्यातील महाड येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ऐतिहासिक चवदार तळे हा सत्यागृह केला होता. त्या क्षणाच्या आठवणीला उजाळा दिला आहे, असे मार्गदर्शक तथा माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.



### भीम जयंतीमुळे नवीन ऊर्जा मिळते : अण्णासाहेब बनसोडे

सोलापुरातील भीम जयंती आणि मिरवणूक ही सर्वात मोठी मानली जाते. मी सोलापूर जिल्ह्यातील सुपुत्र आहे. प्रत्येक भीम जयंती मिरवणुकीला मी सहकुटुंब उपस्थित राहतो. डॉ. आंबेडकरांचे विचार हे जगाला तारणारे आहेत. या मिरवणुकीमुळे नवी ऊर्जा मिळते. प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे, अशी भावना विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी यावेळी व्यक्त केली.

### डॉ. आंबेडकरांचे विचार कृतीत आणण्यासाठी कटिबद्ध : चंदनशिवे

१९५२ मध्ये या मंडळाची स्थापना झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ जयंतीपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष कृतीत उतरवणे, हीच आमची भूमिका आहे. सामाजिक एकता, शिक्षण आणि संघटनेच्या बळावर समाज उभारणीचा संदेश या देखाव्यातून दिला आहे. तरुण पिढीने इतिहासातून प्रेरणा घेऊन पुढे यावे, हा आमचा प्रामाणिक उद्देश आहे, असे माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रविवारी सायंकाळी लातुरात ढगाळ वातावरण

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १९ एप्रिल :** मागच्या दोन दिवसांपासून लातूर शहर परिसरात उष्मा मोठ्या प्रमाणात वाढला होता. त्यातच रविवारी सायंकाळी ढगाळ वातावरणाने धग वाढविण्याचे काम केले.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार येत्या काही दिवसात अवकाळी पाऊस पुन्हा होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांना शेतीची कामे तत्पूर्वी उरकून घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. सध्या वातावरणातील उष्मा अगदी असह्य झाल्याची प्रचिती येत आहे. सकाळी आठपासून सुरु झालेला उष्मा सायंकाळी सहानंतरही जाणवताना दिसतोय. त्यातच मध्येच वीज पुरवठा खंडित झाला की नागरिकांचे होणारे हाल कथन करायला शब्द कमी पडतात. रविवारी दिवसभर लातूर शहर परिसरात उष्म्याचा कहर अनुभवायला आला. सायंकाळी चार नंतर वातावरणात बदल झाला. उन्हाची तीव्रता कमी होऊन आकाशात ढगांनी गर्दी केल्याचे दिसून आले. सायंकाळच्या सुमारास आकाशात आलेले ढग पाहता रात्री उशिरा पावसाचे आगमन झाल्यास नवल वाटू नये. यावर्षी पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस होणार असल्याचे संकेत प्रत्यक्षात उतरताना दिसत आहेत.



## विविध वृत्त...

### लातूर लातूर सायकलिस्ट क्लबतर्फे बक्षीस वितरण

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १९ एप्रिल :** लातूर सायकलिस्ट क्लबच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित 'शिवजन्मोत्सव फिटनेस चॅलेंज २०२६' स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.

या स्पर्धेत क्लबच्या १९० सभासदांपैकी १३० जणांनी सहभाग घेतला होता. स्पर्धकांना ४५ दिवसांपर्यंत दररोज ५ किलोमीटर रनिंग/वॉकिंग किंवा २५ किलोमीटर सायकलिंगचे उद्दिष्ट देण्यात आले होते. हे आव्हान यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या ५१ सभासदांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मानवंदना देऊन करण्यात आली. अध्यक्षस्थानी शिवराज मोटेगावकर हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्योती सुळ, डॉ. राहुल सुळ, पुरुषोत्तम रुक्मिणी व डॉ. धर्मवीर भारती उपस्थित होते. यावेळी लातूर ते पंढरपूर सायकल वारीचे उद्घाटन करण्यात आले. ही वारी १२ जुलै रोजी पंढरपूर येथे सायकल रिंगणाने संपन्न होणार आहे.

चालू वर्षासाठी कोर कमिटीमध्ये श्रीराम येलगटे (अध्यक्ष), विकास कातपुरे (उपाध्यक्ष), गणेश हाके (सचिव), विवेक नरहारे (सहसचिव) आणि श्याम शेटे (कोषाध्यक्ष) यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थापक अध्यक्ष सतीश खोबरे, संचालक प्रतापसिंह बीसेन, श्रावण उगले, विष्णू मदने, श्रीरंग मद्रेवार, अमृत निळकुंदे, शशिकांत औसेकर, संदेश महिंद्रकर, अभिजीत सरसंबेकर तसेच श्रीराम येलगटे, विकास कातपुरे, गणेश हाके, श्याम शेटे आणि विवेक नरहारे यांनी परिश्रम घेतले.

### मुरुड ग्रा. पं .ची नगरपरिषद होणार ?

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १९ एप्रिल :** तालुक्यातील सर्वातमोठी ग्रामपंचायत व मोठे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुरुड ग्रामपंचायतला ग्रामपंचायतीऐवजी नगरपरिषद दर्जा मिळवून देण्यासाठी महत्त्वाच्या हालचाली सुरू झाल्या असून प्रशासनाने या प्रक्रियेला गती दिली आहे. १५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना आकृषिक रोजगाराचे सर्वेक्षण आठ दिवसांत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे मुरुडकरांच्या अपेक्षा पुन्हा उंचावल्या आहेत. मुरुडची वाढती लोकसंख्या आणि अपुरा विकासनिधी या पार्श्र्वभूमीवर नगरपरिषद स्थापन करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. स्थानिक पातळीवर गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. २०१९ साली आकृषिक रोजगाराच्या सर्वेक्षणासाठी अधिसूचना काढण्यात आली होती; मात्र त्यावेळी आकृषिक रोजगाराचे प्रमाण कमी असल्याचा अहवाल आल्याने प्रस्ताव पुढे सरकू शकला नव्हता. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनीही मुख्यमंत्री यांच्याकडे मुरुडला नगरपरिषद दर्जा देण्याबाबत पत्र पाठवले होते. त्यानंतर या प्रक्रियेला नव्याने वेग मिळाल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस मुख्य कार्यकारी आठ अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार (लातूर), गटविकास अधिकारी, पंचायत समिती तसेच नगररचना विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करून आकृषिक रोजगाराचे सर्वेक्षण आठ दिवसांत पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्र्वभूमीवर मुरुडमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषद स्थापन होण्याची आशा पुन्हा पल्लवित झाली आहे. लातूर - पुणे महामार्गावरील मुरुड हे कायम वर्दळीचे शहर राहिले आहे.

# लातुरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

**लातूर दि.१९ एप्रिल :** जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर महाराजांचा जयघोष करत संपूर्ण लातूर शहरात बसवेश्र्वर महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागातही महात्मा बसवेश्र्वर यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त ठिकठिकाणी भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आझाद चौकातून महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली.
महात्मा बसवेश्र्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




शनिवारी रात्री महात्मा बसवेश्र्वर चौक रिंग रोड येथील बसवेश्र्वरांच्या अश्र्वारूढ पुतळा समोर पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या शुभ हस्ते नाम फलकाचे थाटामाटात अनावरण करण्यात आले. तर नंतर भव्य अतिषबाजी करण्यात आली. यावेळी आ. अभिमन्यू पवार, भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, उपमहापौर ड. स्नेहल उटगे,स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले,भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर,ऋषिकेश राजे, सत्यवती चेवले,आदिती पाटील कव्हेकर, कॉंग्रेसचे प्रदेश प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, विकास कांबळे,शोभा पाटील,संगीता मिरचे,राम स्वामी,ड,गंगाधरप्पा हामणे, बाबुअप्पा सोलापूरे,बसवंतप्पा भरडे, श्रीकांत रांजणकर,ओमप्पा धरणे, राजश्री धोत्रे, विनय जाकते,मीना गायकवाड आदिसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.तसेच
मध्यरात्री महात्मा बसवेश्र्वर कॉलेज समोरील बसवेश्र्वरांच्या पुतळ्यास गवळी समाजाच्या वतीने दुग्धाभिषेक करण्यात आले. रविवारी सकाळी महात्मा बसवेश्र्वरांच्या अश्र्वारूढ पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तदनंतर मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. दुपारी पाचशे घर मठ येथे बसव जन्मोत्सव साजरा करण्यात आला.
सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आझाद चौक ते महात्मा बसवेश्र्वर कॉलेज येथील बसवेश्र्वरांच्या पुतळापर्यंत महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेची भव्य-दिव्य शोभा यात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते.

महात्मा बसवेश्र्वरांच्या पुतळ्यास खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष ड. किरण जाधव, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, कैलास कांबळे, विजयकुमार साबदे, दगडूआप्पा मिटकरी आदिसह कॉंग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महात्मा बसवेश्र्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ड.निलेश मुचाटे,स्वागताध्यक्ष प्रा.भालचंद्र येडवे पाटील यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक सिद्रामआप्पा पोपडे,माजी अध्यक्ष केदारआप्पा रासुरे,उपाध्यक्ष विश्र्वास आंबेकर,सचिव बालाजी झिपरे, सहसचिव रोहीत चवळे,कोषाध्यक्ष लखन कावळे, कार्याध्यक्ष मुकेश उटगे,बालाजी पाटील रायवाडीकर,गणेश हेरकर,संयोजक नितीन मोहनाळे,जगदीश येरटे,बसवेश्र्वर हेंगणे,प्रा. ओमप्रकाश झुरुळे,ड.निखिल काळगे,सोमेश्र्वर ईश्र्वरशेटे,शिवकुमार रोडे,प्रमोद धुपे,लक्ष्मीकांत रासुरे, मन्मथ सोरटे, सुशील वेळापुरे, निखिल शेटकार,शरणाप्पा अंबुलगे, कल्याण लातूरे, मेंगशेट्टे, सुनील ताडमाडगे,किरण खोबरे आदिसह समाज बांधवांनी परिश्रम घेतले.
सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमांचे नागरीकातून स्वागत करण्यात आले. जयंतीचे औचित्य साधून शहरात ठिकठिकाणी शरबत, मठ्ठा वितरित करण्यात आला. संपूर्ण लातूर शहर व जिल्ह्यात रविवारी बसवमय वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

## कार्यकर्ता, जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

लातूर : महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. विठ्ठल मोरे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक चळवळीत निष्ठाभावाने काम करणाऱ्यांना दिला जाणारा 'कार्यकर्ता'
व 'जीवनगौरव' पुरस्कार वितरण सोहळा नुकताच लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील किलातरी येथे पार पडला. यावर्षी 'कार्यकर्ता' पुरस्काराने कॉ. सुधाकर शिंदे यांना तर मराठवाडा शिक्षक संघटनेचे नेते पी. एस. घाडगे यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले.
या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे आणि वक्ते म्हणून प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव हे उपस्थित होते. विचार पिठावर प्राचार्या डॉ. कुसुमताई मोरे, सुधाकर शिंदे, पी.एस घाडगे, किल्लारीच्या सरपंच सौ. सुलक्षणा बाबळसुरे व प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांची उपस्थिती होती. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना इंद्रजित भालेराव यांनी 'माकप विचारांचा प्रभाव असलेल्या कॉ. विठ्ठल मोरे यांनी कष्टकरी शेतकरी, कामगार, दलित, वंचित, विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांच्या चळवळी उभ्या करून 'नाहीरे' वर्गाचा लढा तेवत ठेवला. चळवळी निरोगी, निकोप समाजाच्या उभारणीत मोलाचा वाटा उचलतात. अलीकडे चळवळी संपविण्याचे असंख्य षडयंत्र रचले जातात. अभिव्यक्ती स्वातंत्र्यांची गळचेपी केली जाते. अशा अस्वस्थ व अभावग्रस्त काळात प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे यांनी करून ठेवलेले काम लाखमोलाचे होते, असे प्रतिपादन केले.
. इंद्रजित भालेराव यांनी 'माणूसवेडा कॉम्रेड' या पुस्तकातील भावस्पर्शी आठवणी उजागर केल्या. विठ्ठल मोरे यांच्या लेखणीतून साकारलेल्या 'कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे' व 'कॉ. विठ्ठलराव नाईक' यांच्या चरित्रलेखनाला उजाळा दिला. शहीद भगतसिंगाचा प्रभाव असलेल्या विठ्ठल मोरेंनी हयातभर 'देव' मानला नाही; पण रंजल्या-गांजल्याच्या न्याय मागण्यात 'देवत्व' शोधले. विविधांगी संघटनेच्या माध्यमातून लढत व लढवत राहिले. त्यांच्या पश्र्चात कुसूमताई मोरे यांनी सुरू केलेला 'कार्यकर्ता' व 'जीवनगौरव' पुरस्काराचा संकल्प चळवळी जीवंत ठेवण्याचाच प्रकार असल्याचे गौरवोद्गार इंद्रजित भालेराव यांनी काढले. याप्रसंगी कॉ. सुधाकर शिंदे व पी. एस घाडगे यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कुसूमताई मोरे यांनी पुरस्काराचा हेतू उजागर केला. अशा चळवळीत काम करणाऱ्या
प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा आत्मविश्र्वास वाढीस लागेल, अशी भावना व्यक्त केली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. अनिलकुमार राठोड यांनी मानले. याप्रसंगी माकप, डाव्या-पुरोगामी विचारांचे असंख्य कार्यकर्ते, किल्लारी येथील ग्रामस्थ, शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शहीद भगतसिंग महाविद्यालयातील शिक्षपुरस्कारातूनाक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

## खरीप हंगाम पूर्व नियोजन कार्यशाळा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १९ एप्रिल :** बदलत्या हवामानाचा शेतीवर होत असलेल्या प्रतिकूल परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीस शाश्र्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ संपूर्ण महाराष्ट्रात राबविला जात आहे. त्याअनुषंगाने विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय लातूर व मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित कृषि विज्ञान केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प हवामान अनुकूल तंत्रज्ञान व खरीप हंगाम पूर्व नियोजन करिता विभागस्तरीय कार्यशाळेचे कृषी विज्ञान केंद्र लातूर येथे दि. १७ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.
सदरच्या कार्यशाळेमध्ये हवामानअनुकूल तंत्रज्ञानमध्ये कापूस व तूर पिकातील जास्त उत्पादन देणारी व हवामान बदलास अनुकूल नवीन वाणाची लागवड तंत्रज्ञाना विषयी माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील अरुण गुट्टे यांनी दिली. तसेच डॉ. अनंत लाड यांनी कीड व रोग नियंत्रणा विषयी मार्गदर्शन केले. डॉ. वसंत सूर्यवंशी यांनी सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञाना विषयी सविस्तर मार्गदर्शन केले तसेच रुंद सरी वरंबा व टोकण पेरणी पद्धती, सीआरए लागवड पद्धत व फळबाग लागवडीमध्ये विड मॅटचा वापर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे केंद्रातील तज्ञा डॉ. शिंदे सचिन व डॉ. उलेमाले पी. एच. यांनी माहिती दिली.

# जिल्हा रुग्णालय इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

## लातूर येथे ५०० खाटांचे अद्ययावत जिल्हा रुग्णालय उभारणार-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ एप्रिल : लातूरकरांचे गेल्या अनेक वर्षांचे स्वप्न मूर्त स्वरूपात येत असून काही तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित असलेला जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न मार्गी लागला आहे. आज १०० खाटांच्या रुग्णालयाचे भूमिपूजन होत असले तरी याठिकाणी ५०० खाटांचे अद्ययावत जिल्हा रुग्णालय उभारण्यात येईल. यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासह पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिली.

लातूर शहरातील नांदेड रोडवरील कृषि महाविद्यालय परिसरात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नवीन जिल्हा रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील होते. यावेळी विधानपरिषद सदस्य तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उषाताई पाटील, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, महापौर जयश्री सोनकांबळे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, महाराणा प्रतापनगरच्या सरपंच संगीता पतंगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व नागरिकांची उपस्थिती होती.

पालकमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर लातूरला येण्यापूर्वीच जिल्हा रुग्णालयाचा विषय माझ्यापर्यंत आला होता. यासाठी येथील लोकप्रतिनिधी व माझं लातूर परिवाराने सातत्यपूर्ण आग्रही मागणी मांडली. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये हा मुद्दा मांडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन वित्त मंत्री तथा उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक पावले उचलली. सर्वांच्या प्रयत्नातून रूग्णालयाच्या जागेचा विषय मार्गी लागला. आता रुग्णालय इमारतीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असून इमारतीचे काम दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण होईल, याची खबरदारी संबंधितांनी घ्यावी. या कामामध्ये कोणत्याही प्रकारची कुचराई होता कामा नये. इमारतीचे काम विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी सातत्याने आढावा घेण्यात येईल. या रुग्णालयाच्या माध्यमातून लातूरकरांना अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

जिल्हा रुग्णालयाचा विषय मार्गी लागल्यामुळे आपल्याला आनंद झाला असून या रुग्णालयाच्या



रूपाने आपल्या कामाची आठवण कायमस्वरूपी राहील, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. तसेच लातूर ते कल्याण द्रुतगती महामार्गाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यामुळे लातूर ते कल्याण हे अंतर पाच तासात गाठता येईल, हा महामार्ग लातूर जिल्ह्यासाठी गेमचेंजर ठरेल, असा विश्र्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. यासोबतच लातूर येथे जुन्या सर्किट हाऊसच्या जागेवर नवे सुसज्ज सर्किट हाऊसची उभारणी केली जाईल, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

अनेक वर्षांपासूनची प्रलंबित असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन आज होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन वित्त मंत्री तथा उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे रुग्णालयाच्या जागेसाठी निधी उपलब्ध झाला. महामार्गाच्या लगतची जागा जिल्हा रुग्णालयाला मिळाली असून याठिकाणी मिळणाऱ्या आरोग्य सुविधा दर्जेदार असाव्यात. ही इमारत आरोग्य मंदिर असून इमारतीचे बांधकाम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. आरोग्य विभागाने कोविडच्या कठीण काळात समाजाची चांगली सेवा केली, त्याचप्रमाणे यापुढेही रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत, असे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यावेळी म्हणाले.

बदलत्या जीवनशैलीमुळे नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्र्न निर्माण होत असून त्यांना चांगल्या आरोग्य सेवा पुरविण्यासाठी जिल्हा रुग्णालयाची गरज होती. गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेला जिल्हा रुग्णालयाचा विषय मार्गी लागल्याने जिल्ह्यातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यास मदत होईल, असे विधानपरिषदेचे आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे म्हणाले.

लातूरच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात लिहावा, असा आजचा दिवस आहे. लातूरकरांची गेल्या अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या जिल्हा रुग्णालयाची मागणी आता पूर्ण होत आहे. या रुग्णालयाचे काम दर्जेदार व्हावे. तसेच लातूरच्या सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे आमदार संजय बनसोडे म्हणाले.

लातूर जिल्हा रुग्णालयाला कृषी महाविद्यालयाची जागा देण्यामध्ये तत्कालीन कृषिमंत्री स्वर्गीय पांडुरंग फुंडकर यांचे महत्वाचे योगदान आहे. कृषि महाविद्यालयाची जागा रुग्णालयाला अपवादात्मक बाब म्हणून मंजुरी देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. यासोबतच जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न सोडविण्यामध्ये पत्रकार, माझं लातूर परिवाराचा मोठा वाटा आहे. मोठ्या प्रतिक्षेनंतर उभा राहत असलेले जिल्हा रुग्णालय ५०० खाटांचे करावे. यासाठी आशियाई विकास बँकेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले. यासोबतच लातूर शहरातील वाहतूक कोंडी, जुन्या सर्किट हाऊसच्या जागी नवीन सर्किट हाउस उभारणीचा मुद्दाही त्यांनी मांडला.

जिल्हा रुग्णालयाचे काम कालबद्ध स्वरुपात पूर्ण होण्यासाठीआवश्यक पाठपुरावा केला जाईल. तसेच या रुग्णालयाची क्षमता १०० वरून ५०० खाटांची करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सांगितले.
प्रास्ताविक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले.
त्यानंतर प्रस्तावित रुग्णालय इमारतीच्या आराखड्याची माहिती देणारी चित्रफीत दाखविण्यात आली. प्रारंभी पालकमंत्री भोसले, सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते कुदळ मारून आणि कोनशीला अनावरण करून जिल्हा रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

# समाधान शिबीर' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १९ एप्रिल :** लातूर : छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत आयोजित 'समाधान शिबीर' (टप्पा क्र. १) कासारखेडा येथील महमदापूर पाटी मंगल कार्यालयात उत्साहात व यशस्वीपणे पार पडले. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेला साकार रूप देत विविध शासकीय सेवा नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्यात आल्या.

या शिबिरात महसूल विभागासह इतर शासकीय विभागांच्या योजना व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे, रेशन कार्ड दुरुस्ती, नाव समाविष्ट वगळ-णे, मतदार यादी सुधारणा, शेतरस्ते व पांदन रस्त्यांचे प्रश्न्न, आरोग्य सेवा, आधार दुरुस्ती तसेच श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला आमदार रमेशआप्पा कराड, तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंखे, पं. स. पांडूरंग बालवाड, परमेश्र्वर कांबळे, प्रताप पाटील, आदिनाथ मुळे, विक्रम शिंदे, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक तह-सीलदार सौदागर तांदळे यांनी केले. शिबिरात १५ हून अधिक स्टॉल उभारण्यात आले होते. एकूण १४६९ लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडळ अधिकारी महेश हिप्परगे, तलाठी स्वप्निल बेंबडे, योगेश मिश्रा, शितल वंगवाडे, अनुराधा पन्हाळे, मीना गुंडरे, शुभांगी कुलकर्णी, सहाय्यक महसूल अधिकारी शिवनंदा राठोड, संपत माने, रवी वावरे, सुनील चनवाड, कोतवाल प्रियंका तेलंगे, ज्ञानेश्र्वर काळे, मस्के, जयेश जगताप आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

# उदगीरमध्ये गुटखा पकडला

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ एप्रिल : साडे चौदा हजारांचा गुटखा पकडला उदगीर : येथील बसस्थानकात गुरुवारी (दि. १६) सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास एका व्यक्तीकडे १४ हजार पाचशे रुपयांचा प्रतिबंधित गुटखा पोलिसांनी पकडला आहे. याप्रकरणी उदगीर शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत फिर्यादी पोलीस अंमलदार संजीव परशुराम मुंढे यांनी पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, आरोपी विठ्ठल माधवराव शिंदे (रा. जांब ता. मुखेड) याने महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला सुगंधीत पान मसाला व तंबाखूजन्य गुटखा जवळ बाळगलेला पोलिसांना मिळून आला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही. १ तंबाखू, सागर पान मसाला, एस. आर. सुगंधित तंबाखू, रजनीगंधा सुगंधित पान मसाला, बाबा १२० सुगंधी तंबाखू असा एकूण १४ हजार पाचशे रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला आहे. तर आरोपीविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हातपंप दुरूस्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. १९ एप्रिल :** सध्या जळकोट तालुक्यात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. यासोबतच पाणीटंचाईची तीव्रताही वाढलेली आहे. जळकोट तालुक्यातील माळहिपरगा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या शिवाजीन-गर तांडा येथील हातपंप नादुरुस्त झाला आहे. यामुळे या तांड्यावर प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात या तांड्यावरील नागरिकांना पाण्यासाठी वण - वण भटकंती करावी लागत आहे. बंद हातपंपाची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी अशी मागणी वाढीस लागली आहे.

शिवाजीनगर तांड्यावर दोन हात पंप आहेत. यातील एका हातपंपाचे पाणी पूर्णपणे कमी झाले आहे तर एक हातपंप आहे तो मागच्या काही दिवसांपासून नादुरुस्त झाला आहे. या हातपंपाचा वरच्या बाजूकडील जिथून पाणी येते तो भाग खराब झाला आहे. येथील लोकप्रतिनिधींनी पंचायत समितीकडे हातपंप दुरुस्तीची मागणीही केली. मात्र पंचायत समितीकडे ना साहित्य आहे ना मनुष्यबळ त्यामुळे येथील नागरिकांना अशा पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

जळकोट येथील हातपंप दुरुस्त करणाऱ्या वाहनावर तीन लोक कार्यरत होते. त्यापैकी दोघे आता कामावर नसल्याने एकाच कर्मचाऱ्यावर ही जबाबदारी येऊन पडली आहे. आता उन्हाळ्याचे दिवस असल्याने याच गावातील नाही तर तालुक्यातील कोणत्याही गावचा हातपंप खराब होण्याची, बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही गरज लक्षात घेऊन वारंवार जळकोट पंचायत समितीकडे मनुष्यबळ देण्याची मागणी केली असतानाही लातूर जिल्हा परिषदेचे याकडे दुर्लक्ष होत आहे. याचा परिणामी जळकोट तालुक्यात नागरिकांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे.

# पत्रकार परिषदेच्या अधिवेशनात उदगीर जिल्हा मागणीचा जोर; पालकमंत्री सकारात्मक

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ एप्रिल : जिल्हा व्हावा ही उदगीरकरांची तसेच आमदार संजय बनसोडे यांची मागणी असून, त्या दृष्टीने सरकार सकारात्मक असल्याचे संकेत लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले उदगीर जिल्हा व्हावा ही उदगीरकरांची तसेच आमदार संजय बनसोडे यांची मागणी असून, त्या दृष्टीने सरकार सकारात्मक असल्याचे संकेत लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दिले. उदगीर येथे आयोजित अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



पालकमंत्री म्हणाले की, उदगीर जिल्हा व्हावा यासाठीची जबाबदारी माझ्यावर टाकली आहे. मात्र आमदार संजय बनसोडे हे थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचू शकतात. त्यांनी पुढाकार घेतल्यास आम्हीही त्यांच्यासोबत जाण्यास तयार आह-ेत. त्यांच्या ताकदीमुळे उदगीरकरांची जिल्हा निर्मितीची अपेक्षा निश्र्चित पूर्ण होईल. त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे उदगीर जिल्हा निर्मितीबाबत सकारात्मक आहेत. आवश्यक सर्व मूलभूत सुविधा तयार करण्यात आल्या असून, सरकार या विषयावर गंभीरपणे पाठपुरावा करत आहे.

उदगीर येथील स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार परिषदेचे विश्र्वस्त एस. एम. देशमुख होते, तर उद्घाटक म्हणून राजेंद्र दर्डा उपस्थित होते. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी भारत बाष्टेवाड, पोलिस अधीक्षक अमोल तांबे, नगराध्यक्षा स्वाती हुडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, तहसीलदार राम बोरगावकर, विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन राजेंद्र दर्डा, शिवेंद्रसिंह राजे भोसले, बाबासाहेब पाटील आणि एस. एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्री भोसले यांनी पत्रकारांच्या प्रश्र्नांवर भाष्य करताना सांगितले की, सरकार पत्रकारांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असून, त्या पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून तपश्र्चर्या आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी पत्रकारितेची पायाभरणी केली, तर लोकमान्य टिळकांनी तिला बळ दिले. पत्रकारांचे लेखन सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षण करायला भाग पाडते. त्यांनी लातूर सिव्हिल हॉस्पिटलच्या कामातही पत्रकारांच्या आंदोलनाचा मोठा वाटा असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमात माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि एस. एम. देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अधिवेशनाच्या निमित्ताने सकाळी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेसह प्रभात फेरी काढून सर्वांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सचिन शिवशेट्टे, युवराज धोतरे, बिभीषण मद्देव-ाड, सिद्धार्थ सूर्यवंशी, अर्जुन जाधव यांच्यासह स्थानिक पत्रकारांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता यलमटे, श्रीपाद सिमंतकर व रसूल पठाण यांनी केले, तर प्रस्ताविक सचिन शिवशेट्टे यांनी मांडले आणि आभार बिभीषण मद्देवाड यांनी मानले.

या अधिवेशनात उदगीर जिल्हा कृती समितीने पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्यासह उपस्थित मान्यवरांना निवेदन देत उदगीर जिल्हा निर्मितीची मागणी केली. यावेळी मोठ्या संख्येने उदगीरकर उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनीही या मुद्द्यावर जोर देत पालकमंत्र्यांनी जिल्हा निर्मितीसाठी सक्रिय प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. यावर प्रतिसाद देताना पालकमंत्री भोसले म्हणाले, सरकार सकारात्मक आहे. जिल्हा झाला तरी मी मंत्री असताना मीच पालकमंत्री असेन. तेव्हा मला विसरू नका, मी दोन्ही जिल्ह्यांचा पालकमंत्री असेन. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

एकूणच, या पत्रकार अधिवेशनात उदगीर जिल्हा निर्मितीचा मुद्दा केंद्रस्थानी राहिला असून, सरकार सकारात्मक असल्याचे संकेत मिळाल्याने उदगीरकरांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आ-हेत.

अनेकांनी शब्द दिला पण पाळला नाही - एस. एम. देशमुख कार्यक्रमात बोलताना एस. एम. देशमुख यांनी अनुपस्थित राहिलेल्या निमंत्रितांवर नाराजी व्यक्त केली. अनेकांनी उपस्थित राहण्याचे आश्र्वासन दिले, मात्र ते पाळले नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी अनेकांना निमंत्रण देण्यात आले होते, मात्र काही मान्यवर अनुपस्थित राहिल्याने त्यांनी खंत व्यक्त केली.

# केन्द्रीय विद्यालय बीएसएफ सीबीएसई १० वी चा निकाल शंभर टक्के

## ९० टक्के पेक्षा जास्त ८ ८० टक्के पेक्षा जास्त २४ विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. १९ एप्रिल :** पीएम श्री.केन्द्रीय विद्यालय, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स चाकूर दहाविचा निकाल शंभर टक्के लागला असून,आपल्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीने पुन्हा एकदा एक नवीन आदर्श निर्माण केला आहे. शाळेने २०२६ च्या इयत्ता १० वी सीबीएसई बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल मिळवून एक अभिमानास्पद टप्पा गाठला आहे. हे यश विद्यालय मजबूत शैक्षणिक प्रणाली, शिस्तबद्ध वातावरण आणि समर्पित शिक्षकांच्या अविरत मार्गदर्शनाचा परिणाम आहे. विद्यालय प्राचार्य, श्री. हरीश कटारिया यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी अपवादात्मक कामगिरी करून शाळेला गौरव मिळवून दिला आहे.







यावर्षी एकूण ६० विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्वजण ६० ही उत्तीर्ण झाले. यापैकी ०८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण आणि २४ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत, जे शाळेच्या दर्जेदार शिक्षणाचा पुरावा आहे. गुणवंत विद्यार्थी (टॉपर्स): पहिला क्रमांक हुडगे आरुषी संजय (९७.४%) हिने, दुसरा क्रमांक कोटलापुरे प्रणव संजीव (९६.४%) याने आणि तिसरा क्रमांक तनिष्का माणिक पवार (९५.४%) याने पटकावला.याशिवाय, पलमाटे उत्कर्ष भागवत (९२.८%), अनिशा (९२.२%), रुंझुन रामप्रसाद गित्ते (९१%), कुंवर सलोनी रविशिंग (९०.२%) आणि नातू श्रद्धा (९०%) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.विद्यालयाच्या या उत्कृष्ट निकालावर प्राचार्य हरीश कटारिया, मुख्याध्यापक गोविंद सूर्यवंशी यांच्यासह सर्व शिक्षक- कवितेश भारद्वाज, पन्नालाल इंगोले, प्रतिभा तोमर, सोनू शर्मा, सौरभ वर्मा, सुचिता चंदनशिवे, सतीश फुलारी, जयसिंग राठोड, संतोष नर्ले, प्रभाकर साहू , राकेश महावर, मोहितकुमार, प्रदीप यादव,शैलजा सिंग, ऋतिक माली , श्र्वेता पाटील, गौतम अवसरमोल, कुशालसिंग हजारी, मच्छिंद्र बडे, देशमुख हणमंत, गजानन माने, रियाझ शेख, राजेंद्र अंधारे, अशोक बडे, सचिन गित्ते, कुलकुले खुदबोदीन , राजश्री इंगळे, मोहन गित्ते,शेख नईम यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांच्या पालकांनी आनंद व्यक्त केले असून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खत विक्रीत अनियमितता केल्याने

## २३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने तात्पुरते रद्द

जळकोट : सध्या जळकोट तालुक्यात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. यासोबतच पाणीटंचाईची तीव्रताही वाढलेली आहे. जळकोट तालुक्यातील माळहिपरगा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या शिवाजीनगर तांडा येथील हातपंप नादुरुस्त झाला आहे. यामुळे या तांड्यावर प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात या तांड्यावरील नागरिकांना पाण्यासाठी वण - वण भटकंती करावी लागत आहे. बंद हातपंपाची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी अशी मागणी वाढीस लागली आहे.

शिवाजीनगर तांड्यावर दोन हात पंप आहेत. यातील एका हातपंपाचे पाणी पूर्णपणे कमी झाले आहे तर एक हातपंप आहे तो मागच्या काही दिवसांपासून नादुरुस्त झाला आहे. या हातपंपाचा वरच्या बाजूकडील जिथून पाणी येते तो भाग खराब झाला आहे. येथील लोकप्रतिनिधींनी पंचायत समितीकडे हातपंप दुरुस्तीची मागणीही केली. मात्र पंचायत समितीकडे ना साहित्य आहे ना मनुष्यबळ . त्यामुळे येथील नागरिकांना अशा पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

खरीप हंगाम तोंडावर असतानाच गुण नियंत्रण विभाग ॲक्टिव झाला आहे. १ मार्च ते ९ एप्रिल या कालावधीत युरिया व डीएपी खत विक्रीत अनियमितता केल्याने २३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. या मोहिमेत १०९ दुकानांची तपासणी करण्यात आली होती.

कृषी विभागाच्या मोहिमेदरम्यान, ई-पॉसद्वारे २० व २० बॅगपेक्षा जास्त युरिया व डीएपी खताची विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना विक्री केली. ज्या दुकानांची तपासणी कृषी अधिकाऱ्यांनी केली त्याअनुषंगाने शुक्रवारी (दि. १७) येथील जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी कार्यालयात जिल्हा कृषी अधीक्षक राजेंद्र कदम यांच्या उपस्थित सुनावणी पार पडली. परवानाधारक रासायनिक खतसाठा रजिस्टर एन फॉर्म न ठेवणे, असलेला साठा आणि रजिस्टरमधील साठा यामध्ये तफावत,

# जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती विशेष



**चाकूर :** शिवकुमार ऊस्तुर्गे,हेमलता गुणाले,अब्दुलकरीम शेख, रोहिदास मद्रेवार, प्रकाश तेलंग, रमेश वाघमारे, महेश जानकर, पद्माकरराव जोशी, कर्मचारी शेषराव साळी सह विविध मान्यवर उपस्थित होते.



महालक्ष्मी मंदिर लातूर- मठ्ठा,शरबताचे वाटप करण्यात आले.

# तांबाळा पाटीवर अडीच लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १९ एप्रिल :** बंदी असलेल्या गुटख्याची कारमधून वाहतूक करीत पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने टाकलेल्या धाडीत सुगंधित तंबाखू, पानमसाला, व गुटख्याचा २ लाख ५९ हजार रुपयांचा साठा पकडला आहे. पोलिसांनी कारसह एकूण साडेआठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. निलंगा तालुक्यातील तांबाळा पाटीवर शनिवारी (दि.१८) सकाळी पावणे दहा वाजेच्या सुमारास ही कारवाई केली.



शनिवारी, पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकास मिळालेल्या माहितीच्या आधारे निलंगा तालुक्यातील तांबाळा पाटी येथे सापळा रचण्यात आला. यात पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची वॅगनर कार (एम एच २४ सी डी ३५९३) थांबवून तप-ासणी करण्यात आली. वाहनात गुटखा व सुगंधित पानमसाल्याचा साठा आढळून आला. वाहन चालक संजय काशिनाथ कन्ना (रा. उस्तुरी, ता. निलंगा) यास ताब्यात घेऊन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करण्यात आली. विविध प्रकारच्या सुगंधित तंबाखू, पानमसाला असा २ लाख ५९ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. त्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ६ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी वॅगनर कार जप्त करण्यात आली. एकूण मुद्देमाल अंदाजे ८ लाख ५९ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी विठ्ठल सटवाजी लोंढे यांनी फिर्याद दिली. त्यावरून आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ तसेच भान्यासंअंतर्गत कलम १२३, २७४, २७५, २०(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकातील प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी अक्षय जाधव, उपनिरीक्षक आयूब शेख, उत्तम जाधव, रामहरी भोसले, यशवंत घुगे, कासार शिरसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गर्जे, अंमलदार तपसे, नागमोडे यांनी बजावली.

# गरीबांच्या फ्रिजची मागणी वाढली

**तभा वृत्तसेवा** ( शंकर मिटकर )

**शिरूर अनंतपाळ** दि. १९ एप्रिल : तालुक्यात सध्या उन्हाची तीव्रता लक्षात घेता थंडगार व आरोग्यदायी पाण्यासाठी मातीच्या माठांना पसंती बरोबरच कुंभार समाजालाही रोजगार मिळाला आहे.



उन्हाची तीव्रता वाढताच अनेकांचे पाय गरीबाचे फ्रिज म्हणून ओळखले जाणाऱ्या माठाकडे वळत असल्याचे सध्या बाजारपेठेत चित्र दिसून येत आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाणारे माठ ठीक- ठिकाणी बाजारात विक्रीस आले-ले दिसत आहेत. माठाचे पाणी आरोग्यास लाभदायक असून यापासून अनेक फायदे होतात. यामुळे अनेक जण माठ खरेदी करीत असताना दिसून येत आहेत. होळीच्या नंतर उन्हाची दाहकता एकदम तीव्र होते. त्यामुळे या माठाचे महत्व आजही अबाधित आहे. दरवर्षी उन्हाळ्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्वसामान्यांची तहान भागवण्यासाठी तसेच वरदळीच्या ठिकाणी सार्वजनिक पानप-ोई म्हणून भला मोठा रांजण किंवा माठाचा उपयोग होतो. या माठाचा उपयोग हॉटेल तसेच विविध ठिकाणी थंड पाण्याचा वापर होत आहे.

**उन्हाळ्यात प्रत्येकाला आपली तहान भागवण्यासाठी थंड पाण्याचे आवश्यकता भासत असते. त्यामुळे सर्वसामान्य माणूस चविष्ट आणि थंड पाण्यासाठी मातीचाच माठ वापरत असतो. जुन्या काळातील माठ हा सध्या गरीबाचा फ्रीज म्हणून ओळखला जातो. त्यामुळे मातीच्या माठात पाणी थंड करून घेतलेले शरीरासाठी हितकारक असल्यामुळे ग्रामीण भागात आजही माठाला मोठी मागणी आहे.**

सध्या शिरूर अनंतपाळ तालुक्यात उन्हाच्या झळा चांगल्याच जानवु लागल्या आ-हेत. फेब्रुवारी च्या शेवटच्या आठवड्यात उन्हाच्या झळा सौम्य स्वरूपाच्या होत्या मात्र होळीच्या नंतर दिवसेंदिवस उन्हाचा दाह वाढत आहे. त्यामुळे पुढचे दीड ते दोन महिने उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही असे तर्क वितर्क नागरिकांतून वर्तवले जात आहेत. उन्हाच्या तीव्रतेमुळे आपली तृष्णा थंड करण्यासाठी अनेक जण थंड पेयाच्या दुकानाकडे आकर्षित होतात. फ्रिजचे पाणी अनेक जणांना अपायकारक असल्यामुळे प्रत्येक जण माठ खरेदी करताना दिसून येतो. यामुळे कुंभार समाजाला व्यवसाय मिळतो. माठाची दरवर्षी उन्हाळ्यात मागणी वाढते.त्यामुळे भाव मिळतो. श्रीमंत वर्गात सुद्धा या माठाला आकर्षण आहे. माठातील पाणी थंडगार आणि मधुर लागते. यामुळे माठाला गरिबाचे फ्रिज असे संबोधले जाते.

# कल्याण वाघमारे यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १९ एप्रिल :** लातूर : लातूरच्या नाट्यविश्र्वाला मोठा धक्का देणारे नाट्यवेडे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांना लातूरच्या रंगकर्मीकडून दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील हॉटेल पंचवटीमध्ये झालेल्या सभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, सुषमा अंधारे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, एम. आर. पाटील, डॉ. अशोक आरदवाड, प्रदीप पाटील खंडापूरकर, संजय आयाचित, सु-रेखा मदने, प्रा. सुधीर देशमुख, अनिल कांबळे, पांडुरंग वाघमारे, अजय पांडे, भास्कर माने, अतुल देऊळगावकर, संजय जमदाडे, प्रा. सुधीर अनव-ले, मोहन माने, अरुणा वाघमारे आदी उपस्थित होते.

## केज येथे विजय स्पोर्ट्स क्रीडा अकॅडमीचे वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**केज/प्रतिनिधी** | केज शहर व तालुक्यातील खेळाडूंसाठी विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने विविध खेळांच्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अकॅडमीचे संचालक विनोद गुंड यांनी दिली आहे. विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने १ मे2026 ते १ जून 2026 या दरम्यान एक महिन्याचे फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, योगा, बुद्धीबळ, खेळाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने क्रीडा प्रशिक्षण दिले जाणार असून या शिबिरात १४ वर्षाखालील मुला - मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. हे शिबिर स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या मैदानावर सकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. या शिबिरात केज तालुक्यातील खेळाडूनी सहभाग व्हावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

## भैरवनाथ नगरातील शिवमहापुराण कथेचा आज समारोप

**बीड/प्रतिनिधी** | बहिरवाडी परिसरातील भैरवनाथ नगर येथे श्री भैरवनाथ चैत्र अष्टमी उत्सवानिमित्त आयोजित शिवपुराण कथेचा आज सोमवार दि. 20 एप्रिल रोजी काल्याच्या कीर्तनाने समारोप होणार असून याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. भैरवनाथ नगर येथे श्री भैरवनाथ चैत्र अष्टमी उत्सवानिमित्त जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथील आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते, बालकथा सेवक, गोवत्सल ह. भ. प. प.पू. शिरीष महाराज बारी (व्यास) यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन सोमवार दि. 13 एप्रिल 2026 पासून करण्यात आले होते. या शिवमरापुराण कथेचा समारोप धारूर तालुक्यातील सोनी मोहा येथील ह. भ प. प्रकाश महाराज साठे यांच्या काल्याचे किर्तनाने सोमवार दि. 20 एप्रिल 2026 रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत होणार आहे. दि. 13 एप्रिल पासून सायंकाळी सात ते दहा या वेळेत सुरू असलेल्या या शिवमहापुराण कथेच्या संचामध्ये अरुण महाराज (व्हिडिओग्राफर, हिंगोली), भागवत महाराज घुगे (आर्गन वादक, पुणे), रोशन महाराज (तबला व ढोलक वादक), मुकेश महाराज (गवाई बँजो वादक, पुणे), भागवत बाबुळगावकर (गायनाचार्य) शिवा महाराज गिरी (पॅड वादक, शेगाव संस्थान) यांचा समावेश होता. कीर्तनाची साथसंगत महाराष्ट्रातील ख्यातनाम मृदंगाचार्य ह. भ. प. कृष्णाजी महाराज बोरखडे, गायनाचार्य ह. भ. प. ओंकार महाराज जगताप, गायनाचार्य ह. भ. प. कैलास महाराज पवार, गायनाचार्य ह. भ. प. अभिमान महाराज ढाकणे, गायनाचार्य ह. भ. प. सुग्रीव महाराज डाके यांनी दिली.

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये 'नारी शक्ती कौशल्य अभियान' संपन्न

बीड (प्रतिनिधी) - देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे 'नारी शक्ती कौशल्य अभियान व जागरूकता सत्र' गुरुवार दि.१६ रोजी उत्साहात पार पडले. महिलांना त्यांचे घटनात्मक अधिकार आणि करिअरच्या संधींबाबत जागरूक करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध विधीज्ञ ॲड.आदर्श जाधव उपस्थित होते. तर, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे हे होते. यावेळी प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे, उपप्राचार्या सय्यद शहाना लियाकत अली, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुलेखा डोले, विभागप्रमुख सौ. विद्या आवघाडे व एचआर सौ. स्वरूपा कैवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक ॲड.आदर्श जाधव यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधताना महिला सक्षमीकरणाच्या विविध कायदेशीर पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले.

# महात्मा बसवेश्वर महाराजांच्या विचारांची आज समाजाला मोठी गरज : जयदत्त क्षीरसागर



बीड : महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जातीभेद मोडून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्याची दखल आजही जग घेत आहे. अशा महापुरुषांचे विचार समाजाला दिशा देणारे असून, आजच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. वीरशैव समाजाच्या वतीने आयोजित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सवानिमित्त ते बोलत होते. यावेळी समाजातील विविध मान्यवर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याला डॉ योगेश क्षीरसागर,हर्षद दादा क्षीरसागर,भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धूत, बबनराव गोरे,राजेंद्र बनसोडे,निवासी जिल्हाधिकारी (विभागीय), शिवकुमार स्वामी,नगरसेवक राकेश जाधव,राणा चव्हाण यांच्यासह वीरशैव समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून लोकशाही आणि समतेची पायाभरणी केली.सामाजिक एकता निर्माण करून समाजात पसरलेली अंधश्रद्धा,विषमता आणि जातीच्या भिंती तोडून सर्वांनी एक समाज म्हणून एकत्र येणे आणि विकास साधणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे, हे बसवेश्वरांच्या कार्याचे प्रमुख सूत्र होते. आजही महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या विचारांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.असे ते म्हणाले

या जयंती निमित्त आयोजित या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साही आणि भक्तिमय वातावरणात हा जयंती उत्सव संपन्न झाला.

या कार्यक्रमास शिवाप्पा भुरे,अशोक शहागडकर अशोक आप्पाची पाटील अनिल मिटकरी बाळू शेठ मिटकरी उत्तरेश्वर आप्पा कानडे कुंभेश्वर विभुते संदीप शेटे राजेंद्र राजमाने बंडू शेटे पंकज पायगुडे दादा स्वामी अनंत शहागडकर दिलीप ढेपे सचिन परंडकर चंद्रकांत कानडे अमर ढेपे अमोल होनराव गणेश स्वामी अमर शेटे सतीश आप्पा नगरे सचिन आप्पा शहागडकर उत्तरेश्वर स्वामी काळेगावकर गुरुलिंग आप्पा बेदरकर आंधळकर आप्पा,महेश शेटे सिद्धेश्वर शहागडकर,संजय घाळे,विलास आप्पा रवींद्र स्वामी,बेदरकर सचिन,रेगुडे पशुपती मिटकरी व समाज बांधव उपस्थित होते.

## भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त पेशवा प्रतिष्ठान तर्फे रक्तदान शिबिर संपन्न



**अंबाजोगाई** | भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त पेशवा प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या शिबिराचे उद्घाटन मकरंद सोनेसांगवीकर, डॉ. सुधीर धर्मपात्रे, ॲड. विश्वजित जोशी, विशाल जहागिरदार, संजय देशपांडे व अनिता औटी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी पेशवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, स्वयंसेवक तसेच रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात एकूण ३२ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

या रक्तदान शिबिरात डॉ महेश अकोलकर, डॉ संकेत तोरंबेकर,पार्थ कुलकर्णी,सचिन भातलवंडे,प्रमोद नांदगावकर,विशाल जहागिरदार,स्वप्नील कुलकर्णी,डॉ प्रिया मुळे,स्वप्ना देशपांडे,किशोर जोशी,राहुल कुलकर्णी,सारंग इवरकर,राघव कुलकर्णी,कविता किरण कुलकर्णी,किरण कुलकर्णी ,वल्लभ पिंगळे,वामन खोत,वामन मुळी,वेदांत जोशी,अनघा अविनाश लहुरीकर,आश्लेषा कळंबकर,पार्थ देशपांडे, डॉ मयुर सोनवळकर,शेखर देशपांडे,आनंद जोशी, संभाजी केंद्रे,पवन गिरवलकर आदींनी पुढाकार घेतला.

# बोबडेवाडीच्या शंकर करपे महाराजावर केज अंनिस ची कार्यवाही




केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथील शंकर करपे महाराज गेली कांही वर्षांपासून लोकांना वेगवेगळया आजारावर इलाज करतो, लहान मुले व महिलावर उपचार करून त्यांच्या समस्या सोडवतो असे सांगून सामान्य लोकांना गंडविण्याचे काम करत होता. यापूर्वी चार महिन्यापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बीड जिल्ह्यातील अशा तक्रार प्राप्त भोंदू लोकांची नावासह यादी जाहीर करून कार्यवाहीचा इशारा दिला होता. त्यानंतर बऱ्याच ठिकाणच्या अशा भोंदू महाराज बाबांनी लोकांना फसवण्याचे धंदे बंद केले होते. मात्र जिल्ह्यातील कांही ठिकाणची भोंदूगिरी बंद झालेली नव्हती. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला जिल्ह्यातून अशा भोंदू महाराजांची माहिती व तक्रारी भेटल्या आहेत. त्यानुसार 17 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले, केज शाखेचे कार्याध्यक्ष गौतम बचूटे आणि बुवाबाजी संघर्ष समितीचे सचिव हनुमंत सौदागर यांनी बोबडेवाडी येथील शंकर करपे महाराज याच्याकडे भेट देऊन जाब विचारला असता संबंधित भोंदू महाराजाने आपणांस कांहीही येत नसल्याची कबुली दिली तसेच यापुढे आपण अशी भोंदूगिरी कधीही करणार नाही अशी कबुली ही दिली आहे. आपणांस कसलीही रिद्धी सिद्धी नसून लोकच स्वतः होऊन येऊन भाग पाडत होते. मात्र यापुढे भविष्यात आपण कोणतीही अशी कृती करणार नाही अशी कबुली दिली. समितीचे सदस्य भोंदू महाराजाच्या अर्धा तास समवेत असताना अमावस्याचे अवचित्य साधून अनेक लोक आपल्या समस्या घेवून या महाराजाकडे आलेले दिसले.

## जन शिक्षण संस्थानच्या विश्वकर्मा प्रशिक्षणार्थ्यांना आता 'AI' चे धडे



कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय ,भारत सरकार अंतर्गत कार्यरत असलेल्या जन शिक्षण संस्थान, बीड च्या वतीने जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षणातून स्वावलंबनाचे मोठे काम सुरू आहे. पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी, पी. एम. विश्वकर्मा योजनेच्या प्रशिक्षणार्थ्यांना जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ, बीड च्या वतीने 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) विषयाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

**आधुनिक मार्केटिंगसाठी तंत्रज्ञानाची गरज** | गेल्या दोन वर्षांत पी. एम. विश्वकर्मा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सुमारे ११०० कारागिरांना विविध ट्रेडमध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. मात्र, बदलत्या काळानुसार आपल्या उत्पादनांची मार्केटिंग आणि ब्रँडिंग करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झाला आहे. हेच ओळखून, एआय च्या माध्यमातून साहित्याची मांडणी, उत्पादनांची गुणवत्ता वाढवणे आणि मार्केटिंग सुलभ करणे यावर या सत्रात भर देण्यात आला. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. डोंगरे सर आणि श्री. गालफाडे सर यांनी प्रशिक्षणार्थ्यांना एआय ॲप्स कसे वापरावे, यातून नवनवीन माहिती कशी मिळवावी आणि आपल्या व्यवसायाची जाहिरात कशी करावी, याचे सविस्तर प्रात्यक्षिक दाखवले.

## प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त: धारूरमध्ये 'आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा एल्गार! गट विकास अधिकारी लोखंडे यांच्या उपस्थितीत कार्यशाळा; 70 टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या ग्रामपंचायतींना मिळणार 'आरोग्य संपन्न'चा किताब



किल्ले धारूर (प्रतिनिधी )

राज्यातील नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागाला सुदृढ बनवण्यासाठी शासनाने कंबर कसली असून, याअंतर्गत 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' कार्यशाळा आज पंचायत समिती धारूर येथे उत्साहात पार पडली. आरोग्य विभाग आणि पंचायत समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला गट विकास अधिकारी मा. लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आरोग्य ही वैयक्तिक नव्हे, तर सामाजिक बाब!

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब सोळंके यांनी या अभियानाची प्रस्तावना मांडली. आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती सार्वजनिक आणि पर्यावरणीय घटकांशी जोडलेली आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे यांनी अभियानाची सविस्तर रूपरेषा सांगताना, ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देऊन संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार मुळापासून संपवण्याचा मानस व्यक्त केला. माता व बाल मृत्यूदर कमी करणे आणि आरोग्य हा विषय लोकचळवळ बनवणे. १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या अभियानात ग्रामपंचायत, महिला बचत गट आणि युवक मंडळांचा सक्रिय सहभाग असणार आहे. क्षयरोग, कुष्ठरोग यासह मधुमेह, उच्च रक्तदाब आणि कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवणे.

या अभियानात उत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी राज्यस्तरावर ५ कोटी (प्रथम), ३ कोटी (द्वितीय) आणि २ कोटी (तृतीय)** रुपयांची भरघोस बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, या रकमेचा विनियोग केवळ स्वच्छता, शुद्ध पाणी आणि आरोग्य सुविधांसाठीच करता येणार आहे. ७० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्य संपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येईल.

या कार्यशाळेला तालुका स्तरावरील सर्व अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. "आपले गाव आरोग्य संपन्न बनवण्यासाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन सामूहिक बदल घडवून आणावा," असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त; प्रतिबंधित सुगंधी तंबाखूपासून बनवला जात होता मावा



**गेवराई** | जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध गुटखा विक्रीविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. या मोहिमेअंतर्गत एका बेकायदा मावा कारखान्यावर कारवाई करत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित सामग्री जप्त केली आहे. शहरात एका रहिवासी घराच्या परिसरात सुरू असलेल्या या अवैध धंद्याचा पर्दाफाश करण्यात आला असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन करत पोलिसांनी राबवलेल्या या विशेष मोहिमेमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीवरून पोलिसांनी शहरातील एका संशयिताच्या घराची तपासणी केली. संशयिताने आपल्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमधील खोलीत प्रतिबंधित सुगंधी तंबाखू आणि इतर घातक घटकांचे मिश्रण करून मावा तयार करण्याचा कारखाना थाटला होता. मानवी आरोग्यास अपायकारक ठरणारे हे पदार्थ तयार करून त्याची सर्रास विक्री केली जात होती. छापा टाकल्यानंतर तिथे मोठ्या प्रमाणावर साठा करून ठेवलेला सुगंधी तंबाखू, सुपारी, मावा तयार करण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी मोठे यंत्र, मिक्सर आणि इतर साहित्याचा साठा आढळून आला. अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सर्व मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. जप्त केलेल्या साहित्याची एकूण किंमत दोन लाख बारा हजार सातशे रुपये इतकी आहे.

या कारवाईत संबंधित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्यावर अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिबंधात्मक आदेश झुगारून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या धडक कारवाईत पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि त्यांच्या विशेष पथकाचा समावेश होता. तसेच अन्न सुरक्षा विभागाच्या पथकानेही या कारवाईत सक्रिय सहभाग घेतला. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्तरावरील अधिकारी करत आहेत. सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या अशा अवैध कारखान्यांविरुद्धची ही कारवाई पोलीस प्रशासनाची धडाकेबाज कामगिरी म्हणून पाहिली जात आहे.

# वडीलोपार्जित ७/१२ असलेल्या लाभार्थ्यांना 'पीएम आवास'साठी बांधकाम परवानगी मिळणार?

### सुधीर शिनगारे यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी; १० फेब्रुवारीच्या शासन निर्णयाचा आधार घेत जाचक अटी शिथिल करण्याचे साकडे

किल्ले धारूर: (प्रतिनिधी ) शहरातील ज्या नागरिकांकडे स्वतःची वडीलोपार्जित मालमत्ता आहे आणि ज्यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर वारसा हक्काने लागलेले आहे, अशा लाभार्थ्यांना 'प्रधानमंत्री आवास योजने'चा लाभ मिळवताना येणारे तांत्रिक अडथळे दूर करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुधीर वसंतराव शिनगारे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद किल्ले धारूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या १० फेब्रुवारी २०२६ रोजीच्या नवीन महसूल व वन विभागाच्या तरतुदींचा वापर करून या लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी द्यावी, जेणेकरून गरिबांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होईल, असा महत्त्वपूर्ण मुद्दा या निवेदनात मांडण्यात आला आहे.

काय आहे नेमकी अडचण?

किल्ले धारूर शहरात अनेक अर्जदारांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ऑनलाइन अर्ज करून मंजुरी मिळवली आहे. मात्र, प्रत्यक्ष बांधकाम परवानगी घेताना मालमत्ता कर आकारणी रजिस्टरमध्ये नाव असणे आणि 'गुंठेवारी' असणे अनिवार्य केले जाते. अनेक मालमत्ता या वडीलोपार्जित असून त्यांच्याकडे नोंदणीकृत दस्त (Sale Deed) नसल्याने गुंठेवारी अधिनियमातील अटींची पूर्तता करण्यात अडचणी येत आहेत. तसेच, २०२० पूर्वीचे खरेदीखत नसल्याने भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी नकाशे मिळण्यासही तांत्रिक बाधा येत आहे. परिणामी, पात्र असूनही अनेक नागरिक घराच्या हक्कापासून वंचित राहत आहेत.



नवीन शासन निर्णयाचा आधार (GR १०/०२/२०२६) सुधीर शिनगारे यांनी आपल्या पत्रात महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचा (GR) दाखला दिला आहे. या निर्णयानुसार, अकृषिक (NA) परवानगी आणि सनद प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा अधिनियम २०२५ मधील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.

> "राज्यातील सामान्य नागरिकांना स्वतःच्या हक्काचे घर मिळावे हे शासनाचे उदात्त हेतू आहे. तांत्रिक कारणांमुळे आणि कागदपत्रांच्या गुंतागुंतीमुळे गोरगरीब लाभार्थ्यांचे नुकसान होऊ नये. महसूल विभागाच्या नवीन नियमावलीचा आधार घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलली, तर शेकडो नागरिकांच्या स्वप्नातील घरकुल प्रत्यक्षात उतरू शकेल."
> — सुधीर वसंतराव शिनगारे (अर्जदार)

निवेदनातील मुख्य मागण्या:

शासन निर्णयातील अनुक्रमांक ५ मधील तरतुदीनुसार, भूखंडधारकाकडून एकरकमी रूपांतरण अधिमूल्य (Conversion Premium) भरून घ्यावे.

मालमत्ता कर आकारणी रजिस्टरला नाव नोंदवून घेऊन ७/१२ व फेरफार नोंदीच्या आधारे त्वरित बांधकाम परवानगी देण्यात यावी.

गुंठेवारी आणि जुन्या खरेदीखताची जाचक अट शिथिल करून 'सर्वांसाठी घरे' या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी.

या मागणीमुळे आता नगर परिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि नवीन शासन निर्णयाची अंमलबजावणी करून सर्वसामान्य धारूरकरांना दिलासा मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माजलगाव मठातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



माजलगाव : येथील श्री संस्थान मठात श्री सद्गुरू मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहात झाले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त व भरघोस प्रतिसाद लाभला.

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी (चैत्र अमावस्या) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने युवक, नागरिक व भाविकांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. समाजोपयोगी या उपक्रमातून अनेक रूग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. लिंगैक्य श्री गुरू तपोरत्न प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशिर्वादाने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थान मठाचे स्वयंसेवक व सर्व सहकार्य करणाऱ्यांचा श्रीगुरूंच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये भाविकभक्तांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

# हिंगोली, औंढा नागनाथ येथे भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

श्री भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्ताने सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने रविवारी हिंगोली आणि औंढा नागनाथ येथे भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

दरवर्षी सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने श्री भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्ताने अनेक धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. तसेच शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्राही काढली जाते. त्या निमित्ताने यावर्षीही आज १९ एप्रिल रोजी हिंगोली शहरातील मंगळवारा दत्त मंदिर भागातून दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रा प्रारंभ झाला. यावेळी श्री भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ही शोभायात्रा माहेश्वरी भवन, मसान-पेठ, मारवाडी गल्ली, कपडा गल्ली, महात्मा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक, नांदेड नाका ते एनटीसी भागा-तील परशुराम उद्यानात विसर्जित करण्यात आली. या शोभायात्रेत भगवान परशुरामासह अनेक सजीव देखावे सादर केले होते. बँन्ड, ढोलताशाच्या गजरात लेझिम व टाळ मृदंगाचा निनाद करीत ही शोभायात्रा परशुराम उद्यानात विसर्जित करण्यात आली. या ठिकाणी शोभायात्रा आल्यानंतर रात्री ७ वाजता महाआरती, महाआरती नंतर रात्री १० वाजेपर्यंत उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. आजच्या भगवान परशुराम जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत सकल ब्राह्मण समाज उत्सव समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

औंढा नागनाथ येथेही श्री भगवान परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भगवान श्री परशुराम व महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस नगराध्यक्ष कपिल खंदारे व उपनगराध्यक्ष मनोज देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख, नगरसेवक राहुल दंतवार ,प्रदीप कनकुटे, अनिल देव, विजय महामुने, पत्रकार दत्तात्रय शेगुकर, गजानन नाईक, विलास काचगुंडे, सतीश रणखांबे, मनोहर रणखांबे, नलिनी मलमवार, नंदा अभोरे, मंजुषा जाधव यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व नगरपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन पाहण्यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी रात्री साडेआठ वाजता नारी शक्ती वंदन विधेयकाबद्दल देशातील जनतेला संबोधित केले. याचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी येथील राजयोग मेडीकलवर भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधीसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

देशातील अर्धी लोकसंख्या असलेल्या महिलांना त्यांचे हक्क मिळावा यासाठी केंद्र सरकारने संसदेत नारी शक्ती विधेयक आणले होते परंतु काँग्रेस, समाजवादी पार्टी, डीएमके आणि तृणमुल काँग्रेससह त्यांच्या मित्र पक्षांनी विधेयकाविरोधात मतदान करीत हे विधेयक नामंजूर केले. याबद्दल जनते-शी संवाद साधण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी रात्री साडेआठ वाजता टीव्हीवरून देशा-तील महिलांना संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांनी देशातील नारी शक्तीचा अपमान केला असून त्याना त्यांच्या हक्कापासून वंचीत ठेवण्याचे काम केले आहे. परिसीमन हा टेक्नीकल मुद्दा समोर करून या विधेयकाला विरोध केला. वास्तविक काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षाला महिलांना अधिकार द्यावयाचे नाहीत. यापूर्वीही अनेकवेळा काँग्रेस पक्षाने महिला विधेयकाला विरोध केला आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के वाटा देणाऱ्या या विधेयकाला काँग्रेस आणि इतर पक्षांनी विरोध केला आहे. येणाऱ्या काळात महिला काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन यावेळी पंतप्रधान मोदी यांनी केले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, के के शिंदे, मिलींद यंबल, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, महिला आघाडीच्या सुनीता मुळे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, क्रिष्णा रूहीटीया, नगरसेवक हमीद प्यारेवाले, कैलाश शहाणे, बाबा घुगे, संजय ढोके, लखन कुरील, कैलाश श्रीनाथ, महेश शहाणे, संजय खंडेलवाल, श्रीरंग राठोड, सदाशिव सूर्यतळ, नितीन राठौर, सचिन शिंदे आदीची उपस्थिती होती.

## हिंगोलीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

शहरात कायकवे कैलास म्हणजेच काम हीच आ-पली पूजा हा संदेश देणारे समता नायक जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची ९२१ वी जयंती आमदार तान्हाजीराव मुटकुळे, शिवसेनेचे गटनेते श्रीराम बांगर, माजी नगराध्यक्ष व जिल्हा वीरशैव सभेचे अध्यक्ष सुधीरअप्पा सराफ यांच्या प्रमुख उपस्थितीत जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत असताना आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या वचन स्तंभाचे सुशोभीकरण करून, महात्मा बसवेश्वराचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले. श्रीराम बांगर यांनीही महात्मा बसवेश्वरांचा पूर्ण कृती पुतळा बसवण्याच्या अनुषंगाने नगरपालिकेच्या वतीने प्रशासकीय स्तरावर लागणारी आवश्यक ती मदत आम्ही करून देऊ आश्वासित केले. त्यासोबतच याप्रसंगी नगरसेवक नाना नायक, विशाल गोटरे, कपिल खंडेलवार, रामरतन शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी महिला प्रतिनिधी म्हणून सौ. सविताताई सराफ, सौ. ज्योती मदाम, सौ.मीराबाई टाले उपस्थित होत्या, तसेच ज्येष्ठ समाज बांधव शिवशंकर अप्पा सराफ, माळोदे आप्पा, प्राचार्य रामदास मुकटे, भीमाशंकर आप्पा सराफ, श्याम स्वामी, दरगु अप्पा, शिवानंद आप्पा होकर्णे उपस्थित होते.या जयंती महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पिंटू टाले, महेश जैनापुरे,नागेश सराफ, प्रा. बस्वर-ाज लक्षटे, प्रा. महेश्वर मंगनाळे, चंदू उबाळे तसेच जिल्हा वीरशैव लिंगायत सभा, जिल्हा शिवा संघटना, जिल्हा बसव ब्रिगेड व सर्व लिंगायत बांधव यांनी एकत्रित येऊन एकजुटीने या जयंती उत्सवात सहभाग नोंदवला.



**हिंगोली– साडे तीन मुहुर्तापैकी एक असणाऱ्या अक्षय तृतीयेनिमित्त शहरातील बाजारपेठेत आज आंबे खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती तसेच अक्षय तृतीयेनिमित्त मातीच्या कळसा, बिनगीची खरेदी करण्यासाठीही नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### रमादेवी श्रीनाथ भट्ट यांचे निधन



हिंगोली– शहरातील भट्ट कॉलनी येथील रहिवासी सौ. रमादेवी श्रीनाथ भट्ट यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी रविवारी, १९ एप्रिल रोजी पहाटे ३:४० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. भारतीय विद्या मंदिर विद्यालयातील क्रीडा शिक्षक दिवंगत श्रीनाथ यांच्या पत्नी सौ.रमादेवी भट्ट यांचे पार्थिवावर शहरातील कयाधू नदीच्या काठावर असलेल्या मोक्षधाम येथे रविवारी दुप-ारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत रमादेवी भट्ट यांच्या दुःखद निधनानंतर चार मुलगे प्रेमनाथ, जितेंद्र, आनंद, पप्पू, दोन मुली आणि जावई, सून, नात, नातू आणि पणतू असा परिवार आहे.

### भाजप जनसंपर्क कार्यालयात जयंती साजरी



हिंगोली– भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात भगवान परशुराम आणि थोर समाजसुधारक, क्रांतीयोगी महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे,माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर,जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, शिवा घुगे,जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, नगरसेवक हमीद प्यारेवाले, रामरतन शिंदे,नगरसेवक कैलाश शहाणे, मनोज शर्मा, श्रीरंग राठोड, माजी नगरसेवक सदाशिव सुर्यतळ, दिपक शेठ्ठी, बाळासाहेब नाईक, गुड्डू देवकते, हरी लेकूळे, आशिष जैस्वाल, राहुल शिंदे, गोविंद करहाळे, मंहमद रमजान प्यारेवाले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उप-स्थित होते.

### आदर्शमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

हिंगोली–येथील आदर्श महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मुलींच्या भव्य कबड्डी सामन्यांचे उद्‌घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हिंग-ोली जिल्हा हौशी सायकलिंग असोसिएशन व बहुजन क्रिडा शिक्षक संघटनेच्यावतीने मुलींचे भव्य कबड्डी सामन्यांचे उद्‌घाटन शिवसेना आ. संतोष बांगर यांचेहस्ते करण्यात आले.

येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर रविवारी या सामन्यांचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, युवा जिल्हा प्रमुख राम कदम, शिवाजी इंगोले प्राध्यापक बंकटलाल यादव, दत्तराव बांगर, गजानन आडे यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते. कबड्डीच्या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील विविध मुलींच्या संघानी सहभाग घेतला आहे. प्रथम बक्षीस माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांचेतर्फे ११३५ तर द्वितीय बक्षीस जगजीत खुराणा यांचेतर्फे ७१३५, तृतीय बक्षीस अनिल नेनवाणी यांचेतर्फे ५१३५ रूपये देण्यात येणार आहेत. याशिवाय इतरही बक्षीसे प्रदान करण्यात येणार आहेत. या कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी इंगोले, रामदास हनुमंते, गजानन आडे यांनी परिश्रम घेतले.

## अत्याचाराच्या खोट्या गुन्ह्यात गोवेन म्हणणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

अत्याचाराच्या खोट्या गुन्ह्यात गोवण्याची धमकी देत पैशाची मागणी करणाऱ्या नांदेड जिल्ह्या-तील एका महिलेवर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीन-ुसार हिंगोली येथील बळसोंड भागातील आशिष वाजपेयी हे युवा विकास सोसायटी अंतर्गत शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेमध्ये काम करतात. बेरोजगार तरूणांना रोजगारक्षम बनविण्यासाठी त्यांनी नांदेड जिल्ह्यात काम सुरू केले होते. यामध्ये त्यांनी नांदेड जिल्ह्या-तील एका महिलेची समन्वयक म्हणून नियुक्ती केली होती. या नियुक्तीनंतर मागील दोन वर्षापासून त्यांच्यात जवळीक निर्माण झाली. त्यानंतर ते लिव्ह इनमध्ये आले. या जवळीकतेचा गैरफायदा घेत त्या महिलेने आशिष यांचेकडे सतत पैशाची मागणी सुरू केली. त्यानंतर त्यांनी महिलेस वीस लाख रूपये व पाच तोळे सोने दिले. त्यानंतरही पुन्हा पैशाची मागणी केली जात असल्याने त्यांनी एका वेळी एक लाख, तीन लाख व सहा ला रूपयांच्या रकमेचे धनादेश त्या महिलेला दिले.

दरम्यान, त्या महिलेकडून वारंवार पैशाची मागणी केली जात होती. काही दिवसांपूर्वीच तिने पैशाची मागणी केली. पैशासाठी ती महिला दि १५ एप्रिल रोजी बळसोड येथील घरी देखील आली होती. त्या महिलेकडून वारंवार होणाऱ्या पैशाच्या मागणीला कंटाळून आशिष यांनी पैसे देण्यास नकार दिला. यामुळे महिलेने समाजात बदनामी करेल तसेच अत्याचाराचा गुन्हा दाखल करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे आशिष यांनी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी त्या महिलेविरूध्द गुन्हा अदखल पात्र गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक शामकुमार डोंगरे, जमादार बाळासाहेब खोडवे हे करीत आहेत.

## वसमत रेल्वे स्टेशन परिसरात नागरिक, पत्रकाराकडून पोलिस चौकीची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १९ एप्रिल**

वसमत शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वा-तावरण निर्माण झाले असून, या ठिकाणी कायमस्वरूपी पोलिस चौकी स्थापन करण्याची मागणी जोर धरत आहे.

वसमत रेल्वे स्टेशन हे शहराबाहेर असल्यामुळे रात्रीच्या वेळेस, विशेषतः रात्री नऊनंतर, या परिसरात लुटमारीसारख्या घटना घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे नागरिक व रेल्वे प्रवासी असुरक्षित वाटत असल्याचे चित्र आहे. परिणामी, अपरात्री रेल्वेने येणाऱ्या प्रवाशांना गावात जाण्यास धाडस होत नाही.

सध्या पोलिस गस्त पथकाकडून नियमित गस्त घालण्यात येत असली तरीही गस्तीची गाडी एका ठिकाणी जास्त वेळ थांबू शकत नसल्याने या समस्येवर प्रभावी तोडगा निघत नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे.

दरम्यान, या परिसरात महादेव मंदिर, ईदगाह, चिमनशाहा वली यांची दर्गा, शीख बांधवांचे ऐतिहासिक गुरुद्वारा दमदमा साहेब, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि बौद्ध विहार असल्यामुळे येथे नागरिक व भाविकांची सतत वर्दळ असते. विविध धार्मिक स्थळांच्या उप-स्थितीमुळे हा परिसर सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो.

या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी रेल्वे स्टेशन चौकात कायम स्वरूपी पोलिस चौकी स्था-पन करून गुन्हेगारीवर आळा घालावा, तसेच भाविक व प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी मागणी केली आहे. पोलिस अधीक्षकांनी याकडे लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी नम्र विनंतीही स्थानिकांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही मागणी अत्यंत महत्त्वाची असून, प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कळमनुरी– बाळापूर मार्गावर दोन ट्रकची धडक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

कळमनुरी ते आखाडा बाळापूर मार्गावर कामठा फाटा शिवारामध्ये दोन ट्रकची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एक जण ठार तर तिघेजपण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कळमनुरी ते आखाडा बाळा-पूर मार्गावर डोंगरगाव पूलाजवळ पुलाच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. त्यामुळे या महामार्गावर एकाच बाजूने वाहतुक सुरू आहे. रविवारी पहाटे हिंगोलीहून ट्रक क्र आरजे ०९ जीसी ०९६७ नांदेडकडे जात होता. हा ट्रक कामठा फाटा शिवारात आला असतांना नांदेडकडून येणाऱ्या ट्रकची समोरासमोर धडक झाली. सदर अपघातामध्ये चालक आसीम सलीम घाची रा अरव-ली गुजरात जागीच ठार झाले. तर तुफान गवारवाल राठोड, बाबुलला मकवाना, हफीज मुलतानी हे गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहीती मिळताच महामार्ग पथकाचे सपोनि साईनाथ अनमोड, जमादार सोपान थिटे, गजानन कोरडे, प्रवीण राठोड यांनी धाव घेतली. पोलिसांनी जखमींना तातडीने आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रूग्णालायात उपचारासाठी दाखल केले प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे नांदेड येथील रूग्णालयात हलविण्यात आले आहे. अपघात एवढा भीषण होता की दोन्ही ट्रकच्या केबीनचा चुराडा झाला होता.